# जयदेव गीतगोविंद

## आनंद साधले

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य.
सं. क्र. २०१८.
REFBK-0016972



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
संमृद्धी योजना

# गीत गोविंद

जयदेवाच्या विश्वविख्यात शृंगारकाव्याची
मूळ संहिता, पदपरिच्छेद व भावानुवाद.

१६९६२
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना
अनुक्रम ५४३५८ वि. काव्य
आ.क्र. २०१५ नों. दि. २६/३/६९

आनंद साधले

REFBK C016972
REFBK-0016972

मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई ४

प्रकाशक :
केशव विष्णु कोठावळे
मॅजेस्टिक बुक स्टॉल
गिरगांव, मुंबई ४

प्रथमावृत्ति :
श्रीकृष्णजन्माष्टमी
१५ ऑगस्ट १९६८

लेखनकाल :
१३-१०-६६ ते २७-१०-६६

किंमत पांच रुपये

© सर्वाधिकार सुरक्षित

मुद्रक :
चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय
" शिव-पार्वती "
४६१/४ सदाशिव पेठ
टिळक रस्ता, पुणें २

शब्दातीत स्नेहानें बांधलेले सुहृद्—
**चित्रकार दीनानाथ दलाल**
यांस—

आनंदनिधान अशी कलाकृती
आनंदनिधान अशा कलाकारास—

# कुंजवनाची वाट

मधुरकोमलकान्तपदावलिम्
शृणु तदा जयदेवसरस्वतिम्

हिमालय हाच जगांतील सर्वांत उंच पर्वत होय. गंगा हीच जगांतील शुचितम नदी होय. शुक्र हीच आकाशांतील सर्वांत अधिक तेजस्वी चांदणी होय. त्याचप्रमाणें जयदेव कवीचें गीतगोविंद हीच संस्कृतांतील शृंगारपर भावकवितांतील सर्वांत मधुर कविता होय. जगांतील सर्व भाषांत संस्कृत हीच सर्वांत अधिक श्रवणमधुर भाषा आहे हा दावा सिद्ध झाला तर गीतगोविंद हीच जगांतील मधुरतम भावकविता ठरेल. निदान संस्कृत आणि संस्कृतनिष्ठ भाषा यांतील सर्वाधिक मधुर भावकविता हें गीतगोविंदाचें स्थान आजवर अबाधित आहे. भविष्यांतसुद्धां या स्थानाला धक्का बसण्याचा संभव कमीच आहे. हिमालयापेक्षां अधिक उंच पर्वत निर्माण होण्याची जी शक्यता तीच गीतगोविंदापेक्षां अधिक मधुर काव्य निर्माण होण्याची शक्यता.

काव्याची सर्वमान्य व्याख्या अद्याप ठरलेली नसली तरी रसाळ वाक्य ते काव्य ही व्याख्या रसिकमान्य आहे. गीतगोविंद जी जगन्मान्यता पावलेलें आहे तिच्या कारणांतील सर्वांत प्रमुख कारण त्याची अत्युत्कट अशी रसवत्ता होय. टपोर द्राक्षांत ओथंबावा तसा गीतगोविंदांत रस ओथंबलेला आहे. शिवाय मधुर आणि रसवाही भाषा, ललितकोमल अशी शब्दयोजना, अतिशय सुगम अशी गेयता, मनाला नाचविणारी तालबद्धता, रमणीय अलंकारांचा खच आणि विषयाची सर्वांगीण अशी अंगभूत गोडी यांचेंहि रसायन क्रियेप्रमाणें गीतगोविंदांत साधलेलें आहे. जयदेवानें जणू कविता लिहिली नाहीं.

ती त्याला स्फुरली. जणू कृष्णाची मुरलीच जयदेवाच्या करांगुलीचें रूप घेऊन ही माधुरी स्रवली. तीहि वेणुगीताप्रमाणें गीतरूप घेऊन आकारली. अनेकांगी सौंदर्यमाधुरीचा गीतगोविंदाच्या ओळीओळींतून पुष्ट होत जाणारा अविरत प्रवाह पाहिला कीं ईश्वरी साक्षात्कार हें प्रतिभेचें रूप मनोमन पटल्यावांचून राहात नाहीं.

राधाकृष्णाचें प्रणयमीलन म्हणजे जिवाशिवाची एकता अशी दृढ श्रद्धा असणाऱ्या भक्तिपंथाचें उपासनागीत म्हणून गीतगोविंदाची मुळांत रचना झाली असें म्हटलें जातें. पण या पंथीय प्रतिष्ठेच्या कक्षांतून गीतगोविंद विश्वमान्यतेत झेपावलें आहे तें शृंगारगीत म्हणूनच. मुळांत गीतगोविंदाच्या प्रस्तावनेंत खुद्द जयदेवहि हरीचें स्मरण हा काव्यरचनेमागील उद्देश प्रकट करीत असला तरी तें स्मरण तो कामविलासांतील कलेच्या अनुरोधानें करणार आहे हेंहि असंदिग्धपणें सांगत आहे. कामिनीचें विलास वर्णन करण्यांत आणि त्या वर्णनाचा रसास्वाद घेण्यांत कोणतेंहि अकृत्य नाहीं अशी त्या कविराजाची धारणा आहे. एखाद्या काव्यांत रसिकांना शृंगाररसाची अनुभूती मिळाली तर भक्तिगीताच्या तुलनेनें त्याच्या शुचितेत उणीव येते अथवा त्याची प्रतिष्ठा खालावते असें नाहीं. रतिभावना हीच अशुचि असा वेडा विचार मनांत नसल्यास ती प्रतिष्ठा खालावणार नाहीं; आणि ती भावना अशुचि आहे हा विचार कुठल्याहि निरामय चित्तांत रुजणार नाहीं. एकरूप अनंताला स्वतःचेंच दर्शन अनेकांत घ्यावें असें वाटलें तेव्हां त्यानेंच रतिभावना निर्मिली. सृजन हें ईश्वरी सामर्थ्याचेंच दर्शन आहे. रतिभावना ही सृजनाची गंगोत्री आहे. ती नसेल तर गंगेचा हा प्रवाहच थांबेल. निसर्गशुचि अशी ही भावना स्वार्थाच्या चिखलानें गढूळली नसेल तोंवर ती अशुचि असूंच शकणार नाहीं, आणि कोणत्याहि कलाकृतीच्या श्रेष्ठतेला कमीपणा आणणार नाहीं. रतिभावनेला आत्मप्रकटीकरणाचें, आत्मार्पणाचें साधन असें न मानतां जे आत्मभोगाचें साधन मानतात, त्यांच्या मनांत रतिभावनेच्या दर्शनानें संकोच उत्पन्न होतो. रतिभोग आणि रतिदान यांत महदंतर आहे. किल्मिष कांहीं असेल तर तें रतिभोगांत आहे. रतिदानांत सृष्टीचें सातत्य राखणारें सारें मांगल्य आहे. दानमंगला स्त्रीच्या ठायीं सृजनाचें अधिष्ठान आहे तें उगाच नाहीं. आत्मप्रकटीकरणाची आणि

आत्मदानाची प्रेरणा म्हणून जेव्हां रतिभावनेची अनुभूति होईल तेव्हां ती शुचिरूपाच असेल आणि तिचें दर्शन मंगल ठरेल. सीताराम, राधाकृष्ण, उमाशंकर, मायाब्रह्म, जीवशिव यांची रतिभावना ही आत्मार्पणाची आहे आणि म्हणून मंगल आहे. गीतगोविंदांत याच मंगल रतिभावनेचा कलाविलास वर्णिलेला आहे.

संस्कृतांतील शृंगारावर सांकेतिकतेचा आरोप केला जातो. हा आरोप अभारतीय दृष्टिकोणाचा द्योतक आहे. वस्तुतः ही सांकेतिकता हें त्या शृंगाराचें सामर्थ्य असतें. संस्कृत नायक कधींहि नायिकेच्या वदनाचें चुंबन घेणार नाहीं. तो नेहमीं वदनकमलाचें चुंबन घेणार. वदनाऐवजीं वदन-कमलाचें चुंबन घेतल्यानें त्याचा सारा आस्वादच बदलतो. वदन हें सुंदर असतें, सुगंधी असतें, कोमल असतें, शीतल असतें, मृदुल असतें, नितळ असतें, सुखस्पर्शी असतें आणि मकरंदाप्रमाणें गोड आस्वादाचें असतें हे अर्थ कमलाची उपमा देतांना येतातच; पण त्या सर्वांआधी येऊन त्या सर्वांना पुरून उरतो तो अर्थ म्हणजे वदन हें पूजनीय आणि पवित्र असतें. भारतीय संस्कृतींत कमल हें सर्वश्रेष्ठ पवित्रतेचें आद्य प्रतीक आहे. त्यामुळें या चुंबनांत केवळ आस्वादाचीच छटा न राहतां, पूजेची, आदराची, समर्पणाची छटा मिसळते आणि मग संस्कृत चुंबन बनतें.

खरे संस्कृत नायक आणि नायिका प्रणयाची कोणतीहि क्रीडा केवळ त्यांच्यांतच एकट्यानें करणार नाहींत. कमल, अमृत, चंद्र इत्यादि देवभावी सामग्री तेथें उपस्थित असणारच. गाणारे कोकिल, गुंजणारे भ्रमर, डोलणाऱ्या लता, फुललेले कुंज यांच्या रूपानें निसर्गसत्ता या प्रणयावर नजर ठेवणार. प्रणयक्रीडा ही आरंभीं आणि अंतीं नव्या सृजनाचें साधन आहे याचें विस्मरण न व्हावें म्हणून नव्या किसलयाचीच शय्या तिथें असणार. दुसऱ्याच्या सुखासाठीं आत्मदान हेंच ज्यांचें जीवन अशा फुलांचें आस्तरण तिच्यावर असणार. जिच्या आज्ञांपुढें मानवी सत्ता असमर्थ अशी दैवी शक्ति मदनाच्या रूपानें आपले अमोघ असे बाण सोडून प्रणयाची प्रेरणा देत असणार. त्यामुळें ही प्रणयक्रीडा कधीं नुसती लैंगिक अशी उरत नाहीं हें तर झालेंच, पण ती लौकिक आणि भौतिकहि न उरतां अलौकिक आणि आत्मिक होते. कमल आणि चंद्र हीं चावून चोथा झालेलीं अर्थशून्य प्रतीकें

नव्हेत. ॐकारामागें जसें ऋषींच्या तपस्येचें सामर्थ्य असतें तसें या प्रतीकांमागें युगायुगांच्या संस्काराचें सामर्थ्य आहे. तीं प्रतीकें जातील तर तो अर्थहि जाईल. संस्कृतांतील शृंगार समजावून घेण्यासाठीं ही प्रतीती अंतरात बिंबली पाहिजे.

भारतीय संस्कार नसलेल्या दृष्टींतून या शृंगाराचा यथार्थ कळणार नाहीं. Edwin Arnold नें गीतगोविंदाचें भाषांतर केलें तेव्हां त्यांतील शेवटचा सर्ग गाळला. कां? तर पाश्चात्त्य वाचकांना तो कळणार नाहीं म्हणून. वस्तुतः शेवटचा सर्ग तेंच गीतगोविंद आहे. त्यांतील समर्पण कळणार नाहीं तर गीतगोविंदच कळणार नाहीं. या सर्गाशिवाय गीतगोविंद म्हणजे रामाशिवाय रामायण होय. गीतगोविंदांतील आनंद उंचावत उंचावत जयदेवानें ब्रह्मानंदाच्या तोडीला नेलेला आहे तो शेवटच्या सर्गांत. कुठल्याहि आनंदाची पराकोटी ही ब्रह्मानंदच असते. समर्पणांत परिणत झालेल्या रतिसुखाचा आनंद हा केवल — आनंदाशीं तुल्य असें उपनिषदें मानतात तें उगाच नाहीं. मीपणाचा विसर पाडण्याचें सामर्थ्य या आनंदांत असतें. लहानशा टेकडीवर उभें राहतांच मन प्रसन्न होतें. पण गौरीशंकरावर उभें राहिलें कीं, याच प्रसन्नतेची पराकोटी होऊन साक्षात्कार होतो. प्रसन्नता महानतेंत उदात्त होत होत तेव्हां ब्रह्मानंद बनते. हें सामर्थ्य नुसत्या नयनानंदांतच असतें असें नाहीं. नाक, कान, त्वचा, रसना हीं सारींच इंद्रियें अशा आनंदाची प्रचीती देऊं शकतात. रसानंदाचा आस्वाद घेणारें सर्वश्रेष्ठ सहावें इंद्रिय जें मन तें तर अर्थातच या उंचीवर जाऊं शकतें. अर्थात् हें मुळींच सोपें नाहीं. गौरीशंकर चढून जाण्याइतकेंच तें कठीण आहे. गीतगोविंदाच्या साहाय्यानें इथवर जाणें शक्य होतें हीच गीतगोविंदाची आणि जयदेवाची थोरवी.

ही थोरवी अमुकच एका कारणानें गीतगोविंदाला लाभली असें सांगणें कठीण आहे. समर्पणांत परिणत होणारा शृंगार हें त्याचें एक कारण आहेच. पण जणू हें इतकेंच पुरणार नाहीं म्हणून भाषेची अकुंठित अशी ललित-माधुरी आणि सहजसुगम अशी गेयता यांचीहि अजोड जोड त्याला लाभलेली आहे. एकदा सुरू झालेला गंगेचा प्रवाह प्रतिक्षणीं शुचितेंत आणि महत्तेंत विस्तारावा तसा गीतगोविंदांतील गेय लालित्याचा प्रसाद आहे. त्याच्या

शब्दाशब्दांतून रस आणि अर्थ याप्रमाणेंच ताल, सूर, नृत्य आणि संगीत ओथंबलेलीं आहेत. अस्मानांत झेपावणारा एखादा सूर ऐकला कीं चित्त आभाळांत तरंगतें. पण तो सूर संपला कीं, तें खालींहि येतें. पहिल्या सुराची मोहिनी विरावयाच्या आंतच त्याहून वर नेणारा दुसरा सूर यावा आणि ही परंपरा चढत चढत जावी तेव्हां साक्षात्काराचा आनंद देणारी उंची गांठली जाते. गीतगोविंदाचें असें झालेलें आहे. प्रत्येक पुढचा शब्द मागच्याहून मधुर असा त्याच्या माधुरीचा ओघ! गेयता तर अशी ओतप्रोत कीं काव्य न गातां नुसतें वाचणें अशक्यच! अर्थ न कळला तरी माधुरीची तालबद्धता मनाची पकड घेते; सूर त्या तालावर गीतरूपानें जिभेवर नाचूं लागतात; आणि माधुरीचा ताल व सुरांचें संगीत यांचा हात धरून उत्कट समर्पणाकडे नाचत चाललेला रसराज शृंगार शेवटीं नामरूपांच्या उपाधींतून ओढून काढून चित्ताला कैवल्यानंदाच्या साम्राज्यांत घेऊन जातो.

गीतगोविंदाची ही कैवल्यमाधुरी मराठींतून यथार्थपणें जाणून घेतां येईल अशी अपेक्षा कुणींहि करूं नये. संस्कृत भाषेचीं म्हणून जीं सौंदर्ये आहेत तीं मराठींत येऊं शकणार नाहींत. तो नाद, तो ताल, तें संगीत मराठींत येणें शक्य नाहीं. शृंगार रसाचा आविष्कार ज्या पातळीवर आणि ज्या प्रतिष्ठेनें संस्कृत भाषा आणि तिचे वाचक यांना पेलतां येतो, त्याच पातळीवर त्याच प्रतिष्ठेनें तो तोलण्याचें सामर्थ्य मराठी भाषा आणि तिचे वाचक यांना नाहीं. घनजघनांचें संस्कृत वर्णन संस्कृत वाचक निस्संकोचपणें वाचूं शकतो. परंतु एकमेकांना रगडणाऱ्या नितंबांचें मराठी वर्णन वाचतांना मराठी वाचकाला बावरल्यासारखें होतें.

जयदेवाची शब्दरचना अतिशय चपखल आहे. ज्या शब्दानें संस्कृतांत जी अर्थच्छटा प्रकट होते ती तशीच मराठींत येऊं शकेल असें नाहीं. ‘हे मदना, तूं मनाला त्रास कां देतोस?’ असें विचारतांना जयदेव मदनाला ‘मनसिज’ म्हणतो. त्यामुळें ज्या मनांत जन्म घेतला त्यालाच त्रास देणें ही कृतघ्नतेची अर्थच्छटा आपोआप प्रकट होते. मराठींत ‘मनसिज’ हें संबोधन बोजड होईल; ‘रे मनांत जन्म घेणाऱ्या’ हें भाषांतर असुंदर होईल आणि मनोज म्हटलें तर मदनाऐवजी कुणी सिनेनट आठवेल.

‘माझ्या छातीवर तुझे स्तन ठेव’ असे म्हणतांना जयदेव ‘स्तनकलश’

शब्द वापरतो. कलश हे तीर्थजलानें भरलेले असल्यानें अर्थाला उदात्तता येतेच, पण भरलेले कलश उलटे केल्यावर त्यांतून पाणी वाहून विरहाचा अग्नि विझेल अशी अर्थछटा प्रकट होते. मराठींत मात्र कलशाची आठवण होतांच पावित्र्य आणि पूर्णता यांची आठवण होण्याऐवजीं फक्त आकार पुढें येतो आणि अतिशय अर्थहानी होते. संस्कृत ग्रंथावरील संस्कृत टीका या मूळ ग्रंथाइतक्याच रसपूर्ण आणि अर्थपूर्ण असतात. मराठीला अशा टीका आशय आणि व्यवहार या दृष्टीनें पेलूं शकणार नाहींत.

तरीहि मला शक्य झाले ते प्रयत्न मीं केलेले आहेत. हें भाषांतर शब्दशः आणि व्याकरणशः नाहीं. कर्तरीचें कर्मणि कां व अस्तिवाक्याचें नास्तिवाक्य कां असा गहजब कुणीं करूं नये. हें भाषांतर भावशः आहे. मूळ काव्यांत प्रकट होणारा भाव भाषांतरांत आणण्याचा शक्य तो प्रयत्न केलेला आहे.

मीं मूळ आधार म्हणून निर्णयसागर प्रत पुढें ठेवलेली आहे. कुंभनृपति या टीकाकाराला संमत असलेली संहिता निर्णयसागराला संमत होती असें दिसतें. संपादकांनीं पुढील संहिता विचारांत घेतल्या असाव्या.

( १ ) शंकरमिश्राची टीका असलेली रसमंजरी प्रत.

( २ ) वनमालीभट्टाची टीका असलेली संजीवनी प्रत.

( ३ ) नारायणभट्टाची टीका असलेली पदद्योतनिका प्रत.

( ४ ) टीकाकाराचें नाव नसलेली बालबोधिनी प्रत.

( ५ ) गोपालाची टीका असलेली दीपिका प्रत.

( ६ ) कुंभनृपतीची टीका असलेली रसिकप्रिया प्रत.

( ७ ) Christianus Lassen प्रत.

या सातहि प्रतींतील पाठभेद निर्णयसागरानें दिले आहेत. त्यांतील मला रुचले ते मीं स्वीकारले आहेत.

डॉक्टर श्रीखंडे यांनीं सुश्लोकगोविंद लिहितांना गीतगोविंदाच्या पुढील आवृत्त्या पाहिल्या असें दिसतें.

( १ ) चेतोदरदेवकृत मराठी भाषांतरासहित.

( २ ) वसंतविहारकृत मराठी भाषांतरासहित.

( ३ ) अनंततनयकृत मराठी भाषांतरासहित.

( ४ ) सखारामकृत मराठी भाषांतरासहित.

( ५ ) हर्षदराय ध्रुवकृत गुजराथी भाषांतरासहित.

या इतक्या बारा मुळांवरून सिद्ध झालेल्या संहितांतील दहाव्या अष्टपदींत फक्त पांच गीतिका आढळतात. अष्टपदी या शब्दावरून आणि इतर अष्टपद्यांच्या रचनेवरून या आठ हव्यात. पाप्युलर प्रकाशननें इंग्रजींत प्रकाशित केलेली जी George Keyt यांची आवृत्ति आहे तीहि पांचच गीतिकांचें भाषांतर देते. इतक्या तेरा प्रतींचा पुरावा हा निर्णायकच. परंतु बनारसला प्रसिद्ध झालेली विश्वेश्वरप्रसाद द्विवेदी यांची प्रत नंतर तपासून पाहतां त्यांत दहाव्या अष्टपदींत आठ गीतिका सांपडल्या. त्यानंतर अनंततनयांची एक प्रत सांपडली. तींतहि या गीतिका याच जाग्यावर आहेत. अनंततनयांची मला मिळालेली प्रत शंकरमिश्राच्या प्रतीवरून आधारलेली दिसते. डॉक्टर श्रीखंडे यांना मिळालेली अनंततनयांची प्रत अथवा निर्णयसागराची शंकरमिश्र प्रत, यांत त्या गीतिका असाव्या कीं नसाव्या व असल्यास त्यांचें काय केलें तें शोधण्याचा जास्त प्रयत्न मीं केला नाहीं. मला स्वतःला त्या गीतिका दोन प्रतींत मिळाल्यानें मीं या आवृत्तींत त्यांचा स्वीकार केलेला आहे. केवळ वनमालीभट्टाच्या प्रतींतील पाठभेद म्हणून निर्णयसागरानें दिलेला "साधूनां स्वत एव" ( पृष्ठ १३४ ) हा श्लोकहि मीं घेतलेला आहे. वरील सर्व प्रतींपेक्षां प्रस्तुत प्रत त्यामुळें अधिक सर्वसंग्राहक झालेली आहे.

सर्वसंग्राहक हा शब्द मुद्दाम वापरलेला आहे. चिकित्सक दृष्टीनें हा स्वीकार केलेला नाहीं. चोवीसहि अष्टपद्या निश्चितपणें जयदेवाच्या आहेत. गीतगोविंदाबद्दल म्हणून मीं जें काहीं वर लिहिलें आहे तें या अष्टपद्यांबद्दल आहे. इतर श्लोकांना तें लागू आहे असें म्हणतां येणार नाहीं. हे श्लोक कदाचित् प्रक्षिप्त असण्याचा संभव आहे.

हे श्लोकहि राधामाधवाच्या शृंगाराविषयीं असले तरी त्यांनीं अष्टपद्यांचें सौंदर्य वाढण्याऐवजीं त्यांच्या ओघांत व्यत्यय येतो. आधींच्या अष्टपदींतील विषयाची द्विरुक्ति तर उमाप ठिकाणीं आहेच, पण काहीं ठिकाणीं अर्थ-हानिकर असा विरोधही आहे. अर्थसुगमता, रचनामाधुरी या गुणांचा गौरव अष्टपद्यांप्रमाणें श्लोकांत नाहीं. अष्टपद्यांचा अर्थ गातां गातां कळतो. प्रसंगीं भाषा येत नसली तरीहि माधुरी जाणवते, तल्लीनता येऊं शकते. उलट या

श्लोकांत अनेक ठिकाणीं अन्वयार्थाशीं झटापट करावी लागते.

एकच कवि वेगवेगळ्या काळीं एकाच विषयावर कमी-अधिक तोलाची रचना करूं शकतो हें खरें. स्वत:च्या कृतीचें चोखंदळ संपादन करण्याची आजच्यासारखी चिकित्सा जयदेवकाळीं नसावी हेंहि खरें. तरीहि सारीच रचना जयदेवाची नसावी या शंकेचा उल्लेख करावयाचा तो तिला पुष्टी देणारा प्रवाद प्रचलित आहे म्हणूनच. जयदेवाचें गीतगोविंद लोकमान्य झालें ही गोष्ट त्याच्या आश्रयदात्या राजाला रुचली नाहीं. त्यानेंहि राधाकृष्ण-शृंगारावर एक काव्य रचलें. पण जयदेव तो जयदेव आणि राजा तो राजा. त्याचें काव्य प्रतिष्ठा पावेना. अंतरांतील ओलाव्याशिवाय रचलेल्या त्या काव्यास मान्यता मिळेना. शेवटीं त्यानें आपल्या काव्यांतील अंश जय-देवाच्या काव्यांत घुसडले. संस्कृत कवींच्या बाबतींतील सारेच प्रवाद चिंतनीय असतात असें नाहीं. तरीहि हा प्रवाद चिंतनीय ठरावा.

सर्ग, प्रबंध, अष्टपद्या व श्लोक यांच्या परस्परनिबद्ध अनुक्रमाबाबतही मला एकवाक्यता आढळून आली नाहीं. या प्रतींतील श्लोकांचा अनुक्रम मूळचाच असला तरी अंकक्रम मीं दिलेला आहे.

जयदेव नांवाचे तीन कवि भारतांत होऊन गेले. एक प्रसन्नराघवकार, दुसरा चंद्रालोककार आणि तिसरा गीतगोविंदकार. यांत गीतगोविंदकार जयदेवच विख्यातकीर्ति झाला. गीतगोविंदाची गुणश्रेष्ठता सर्वमान्य आहे. देशी परदेशी विद्वानांनीं त्यावर स्तुतिसुमनांचा वर्षाव केलेला आहे. देशी परदेशी भाषांत त्याचीं अनेक भाषांतरेंहि झालेलीं आहेत. इतकी थोडी कविता लिहून इतकी विपुल कीर्ति मिळविण्याचें भाग्य जगांत खरोखर दुर्मिळ आहे. मराठींतहि गीतगोविंदाचीं पांचतरी भाषांतरें आहेत. प्रस्तुत आवृत्तींतील भाषांतराचें वैशिष्ट्य आणि आवश्यकता तींतील नुसतें पहिल्या श्लोकाचें भाषांतर इतर आवृत्तींतील भाषांतराशीं ताडून पाहिलें तरी पटूं शकेल.

गीतगोविंदकार जयदेव बाराव्या शतकांत बंगालचा राजा लक्ष्मणसिंह याच्या राजसभेंत होऊन गेला. आपले मातापिता, मूळगांव, पत्नी आणि समकालीन कवि यांचा उल्लेख त्यानें गीतगोविंदांतच केलेला आहे. जयदेव हा मोठा कवि तसाच ईश्वरभक्त होता. भक्तचरित्रें वर्णन करणाऱ्या ग्रंथांतून त्याचें विस्तृत चरित्र आढळतें. पण तें चमत्कारपूर्ण दंतकथांनीं भरलेलें असून

त्याला काडीचाहि ऐतिहासिक आधार नाही. गीतगोविंद हेंच त्याचें विश्वसनीय चरित्र आहे आणि तें सांगत आहे कीं, जयदेव हा जगांतील सर्वाधिक मधुर भावकाव्याचा निर्माता असा महाकवि आहे.

जयदेवाला त्याच्या मधुर कर्तृत्वाची जाणीव आहे व अभिमानहि आहे, ते साहजिकच होय. स्तनमंडलाचा डौल रूपगर्विता मिरविणार नाहीं तर काय कुब्जा मिरविणार? प्रसाद, माधुर्य आणि ओज हे काव्याचे तीन गुण होत. मोठमोठ्या कविसम्राटांनाहि ईश्वरकृपेनें यांतला एखादाच गुण प्राप्त झाला तर व्हावयाचा. कालिदासाचा प्रसाद, भारवीचें ओज, बाणाची माधुरी यामुळेंच त्यांचीं काव्यें उत्कर्ष पावलीं आहेत. जयदेव हाच असा परमभाग्यवान कवि कीं त्याला प्रसाद आणि माधुर्य हे दोन गुण परमोत्कर्षानें वश झालेले आहेत. त्यामुळें त्याच्या काव्याला जी मदिर माधुरी प्राप्त झाली आहे ती कोणीं वर्णावी? ती ज्याची त्यानेंच जाणून घ्यावयास हवी. मोहळांतून थेंबाथेंबानें गळणाऱ्या मधूचें आकंठ पान केल्यावर जी तृप्ति वाटते ती कोण वर्णील! चांदण्या रात्रीं अंगावर बकुलफुलांचा वर्षाव झाला म्हणजे येणाऱ्या अनुभूतींतील सौगंध कोण शब्दबद्ध करील? मध्यरात्रीच्या नीरव एकांतांत सागराच्या ओहोटीची मर्मर ऐकून जाणवणारी आर्तता कोण वर्णन करूं शकेल? नवोढेच्या पहिल्याच सर्वांगीण स्पर्शानें उत्पन्न होणाऱ्या पुलकांत फुललेला आमोद कोण शब्दसाकार करील? विजेच्या वेगानें सळसळणारा जातिवंत रसरशीत नाग अंगावरून गेला तर उठणाऱ्या भीतीच्या रोमांचाचें चित्र कोण रंगवूं शकेल? साक्षात्कारांत होणाऱ्या केवलानंदाचा प्रत्यय कोण दुसऱ्यास आणून देईल? जो हें करूं शकेल त्यानेंच गीतगोविंदाची गोडी यथार्थपणें वर्णिण्याचा प्रयत्न करावा. इतरांनीं शब्दांशब्दांच्या अंतरांत शिरून मधुमक्षिकेप्रमाणें ती गोडी आपणच चाखावयास हवी.

असो. राधा कृष्णाची वाट पाहात आहे. जयदेव म्हणतो कीं जेव्हां राधा कृष्णाजवळ जाते तेव्हां त्यांच्यामध्यें उभे राहावयास लाजेलाच लाज वाटते. मी लाजेपेक्षांहि निर्लज्ज होऊन त्यांच्या मधें उभें राहणें बरें नव्हे. म्हणून मी आतां या कुंजवनाच्या वाटेतून दूर होतों. परंतु जातां जातां एका गोष्टीचा उल्लेख करणें माझें कर्तव्य आहे. माझे गुरुतुल्य ज्येष्ठ रसिक स्नेही

श्री. गो. नी. दाण्डेकर यांनीं हें भाषांतर मुद्रणास जाण्यापूर्वी वाचण्याचा अनुग्रह माझ्यावर केला. त्याचप्रमाणें ज्यांचा पाठिंबा नसेल तर माझी संस्कृताशीं चालणारी धडपड केवळ निराधार होईल, ते माझे परमसुहृद् प्राध्यापक डॉक्टर केशव पांडुरंग जोग यांनीं माझ्या स्नेहापोटीं या ग्रंथावर आमूलाग्र नजर टाकली. आज वर्षानुवर्षे डॉक्टर जोगांचा मला धीर आहे. त्यांना रुचणार नाहीं यामुळेंच त्यांचा उल्लेख माझ्या पूर्वीच्या ग्रंथांत झालेला नव्हता. पण यापुढें त्यांचा निर्देश न करणें कृतघ्नपणाचें ठरेल. अर्थात् मी त्यांचे आभार मानणार नाहीं. त्यांच्या न फिटणाऱ्या ऋणांत मला जन्मभर मोठ्या आनंदानें राहावयाचें आहे.

बी १७/४ पोस्टल कॉलनी
मुंबई २९

आनंद साधले
कृष्णजयंती, १५-८-६८

# सर्ग पहिला : सामोद दामोदर ( आनंदी कृष्ण )

ग्रंथ संग्रहालय
१६८८२


## प्रबंध पहिला

**मेघैर्मेदुरमम्बरं वनभुवः श्यामास्तमालद्रुमै-**
**र्नक्तं भीरुरयं त्वमेव तदिमं राधे गृहं प्रापय ॥**
**इत्थं नन्दनिदेशतश्चलितयोः प्रत्यध्वकुञ्जद्रुमं**
**राधामाधवयोर्जयन्ति यमुनाकूले रहः केलयः ॥ १ ॥**

मेघैः मेदुरम् अम्बरम् वन-भुवः श्यामाः तमाल-द्रुमैः
नक्तम् भीरुः अयं त्वम् एव तद् इमम् राधे गृहम् प्रापय ॥
इत्थम् नन्द-निदेशतः चलितयोः प्रति-अध्व-कुञ्ज-द्रुमम्
राधा-माधवयोः जयन्ति यमुना-कूले रहः केलयः ॥ १ ॥

गोपराज नंद राधेला म्हणाला,

" राधे, अंतःकरणांत प्रीतीच्या हुरहुरीला भरतें आणणारे मेघ आकाशांत दाटत आहेत. ही वनभूमी लतांचे कुंज आणि बांबूंच्या जाळ्या यांच्या बहुलतेमुळें प्रणयसुभगा आहे. कोवळी पालवी आणि सुगंधी मोहर यांनीं प्रणयभावनेला सहकार देणाऱ्या निळ्या तमाल-वृक्षांच्या रायांमुळें ही आतां नीलधूसर बनत आहे. प्रणयसखा असा रात्रीचा एकान्त समय आहे. हा जगन्नायक कृष्ण मदनाच्या शरांनीं व्याकुळ झाला आहे. याच्या विश्वविजयी प्रणयांत रसानंद आणण्याइतकें रतिकलेंतील चातुर्य केवळ तुझ्याचपाशीं आहे. म्हणून तूंच आतां या प्रणयोचित कालीं आणि प्रणयसुगम स्थलीं कृष्णाला गृहस्थाश्रमींचें सुखवैभव मिळवून दे. "

नंद राजा होता. गुरुजन होता. कृष्णाचा पिता होता. त्याच्या निदेशांत वैधता होती, मंगलता होती, आशीर्वाद होता. त्या आज्ञेचें पालन करण्यासाठीं राधा आणि कृष्ण कुंजवनांत गेलीं. कुंजवनांत यमुनेच्या पवित्र जलावरून वायुलहरी वाहात होत्या. त्यांच्या-

मुळें तें वन शीतल आणि सुगंधित झालेलें होतें. त्या सुगंधित एकान्तांत राधाकृष्णांच्या प्रणयलीला रंगल्या. या लीला सदाविजयी आहेत.

**वाग्देवताचरितचित्रितचित्तसद्मा**
**पद्मावतीचरणचारणचक्रवर्ती ॥**
**श्रीवासुदेवरतिकेलिकथासमेत-**
**मेतं करोति जयदेवकविः प्रबन्धम् ॥ २ ॥**

वाक्-देवता-चरित-चित्रित-चित्त-सद्मा
पद्मावती-चरण-चारण-चक्रवर्ती ॥
श्री-वासुदेव-रति-केलि-कथा-समेतम्
एतम् करोति जयदेव-कविः प्रबन्धम् ॥ २ ॥

शृंगारकलासंपन्न राधा आणि वासुदेव कृष्ण यांच्या प्रणयलीलांचें वर्णन करणारा हा प्रबंध जयदेवकवि रचित आहे. प्रसाद, माधुर्य इत्यादी जे साहित्यलक्ष्मी सरस्वतीचे गुण, त्यांनीं जयदेवाचें अंतःकरण ओतप्रोत भरलेलें आहे. चरणचपला अशी लक्ष्मी चक्रवर्ती सम्राटाला वश होते. जयदेवाची गृहलक्ष्मी पद्मावती आपल्या पायरवानें जयदेवाचें घर धन्य करीत असल्यानें जयदेवही चक्रवर्तीच आहे.

( जयदेवाला लक्ष्मी आणि सरस्वती वश होत्याच; पण त्याची जीवनप्रतिभा पद्मावती हीही त्याची स्फूर्ति होती त्यामुळें तो कवींचा चक्रवर्ती होता ! )

**यदि हरिस्मरणे सरसं मनो यदि विलासकलासु कुतूहलम् ।**
**मधुरकोमलकान्तपदावलीं शृणु तदा जयदेवसरस्वतीम् ॥ ३ ॥**

यदि हरि-स्मरणे सरसम् मनो यदि विलास-कलासु कुतूहलम् ।
मधुर-कोमल-कान्त पद-आवलीम् शृणु तदा जयदेव-सरस्वतीम् ॥ ३ ॥

जर तुम्हांला कृष्णाच्या गुणगायनांत गोडी वाटत असेल, जर कामिनींच्या रतिविलासांतील कलासौंदर्य पाहण्यास तुम्ही उत्सुक असाल तर तुम्ही जयदेवकवीची गीतगोविंद ही कविता ऐकावी. या कवितेंतील शब्दरचना मधुर आहे, कोमल आहे, सुंदर आहे आणि तिच्यांत प्रेमपूर्ण भक्तीनें राधाकृष्णांचे प्रणयविलास वर्णिलेले आहेत.

**वाचः पल्लवयत्युमापतिधरः संदर्भशुद्धिं गिरां**
**जानीते जयदेव एव शरणः श्लाघ्यो दुरूहद्रुतेः ॥**
**शृङ्गारोत्तरसत्प्रमेयरचनैराचार्यगोवर्द्धन-**
**स्पर्द्धी कोऽपि न विश्रुतः श्रुतिधरो धोयी कविक्ष्मापतिः ॥ ४ ॥**

वाचः पल्लवयति उमापतिधरः संदर्भ-शुद्धिम् गिराम्
जानीते जयदेवः एव शरणः श्लाघ्यः दुरूह-द्रुतेः ॥
शृङ्गार-उत्तर-सत्-प्रमेय-रचनैः आचार्य-गोवर्द्धनः ।
स्पर्द्धी कः अपि न विश्रुतः श्रुतिधरः धोयी कवि-क्ष्मा-पतिः ॥ ४ ॥

उमापतिधर कवि नुसती भाषा फुलवितो. शरण कवि केवळ झटपट काव्य करण्या-बाबत स्तुतिपात्र आहे. शृंगाररसभरित काव्य करण्याचाच प्रश्न असेल तर गोवर्धनाचार्यांशीं कुणी स्पर्धा करूं शकत नाहीं. श्रुतिधर कवि मोठा विख्यात आहे. धोयी कवि कविराज मानला जातो; परंतु सर्वांगसुंदर अशी कविता एकटा जयदेवच लिहूं शकतो.

( उमापतिधर, शरण, गोवर्धन, श्रुतिधर, धोयी आणि जयदेव हे सहा कवि बंगालचा राजा लक्ष्मणसेन याच्या राजसभेंत होते. यांतील गोवर्धनाचार्यांची आर्यासप्तशती विशेष प्रसिद्ध आहे. हाल कवीच्या गाथासप्तशतीचें अनुकरण करून त्यानें हें शृंगारिक काव्य लिहिलें आहे. यांत रस व प्रसाद कमी असून पांडित्य अधिक आहे. या सर्वांत आपण श्रेष्ठ असें जयदेव म्हणतो तें याच्या सहकाऱ्यांना न रुचलें तरी स्वयंसिद्ध आणि रसिक-मान्य आहे. )

## अष्टपदी पहिली

राग–मालवगौड : ताल–रूपक

**जय जगदीश हरे ॥ ध्रु० ॥**

हे जगदीशा, कृष्णा, तुझा विजय असो. ॥ ध्रु० ॥

**प्रलयपयोधिजले धृतवानसि वेदम् ।**
**विहितवहित्रचरित्रमखेदम् ॥**
**केशव धृतमीनशरीर ।**
**जय जगदीश हरे ॥ १ ॥**

मुळें तें वन शीतल आणि सुगंधित झालेलें होतें. त्या सुगंधित एकान्तांत राधाकृष्णांच्या प्रणयलीला रंगल्या. या लीला सदाविजयी आहेत.

**वाग्देवताचरितचित्रितचित्तसद्मा**
**पद्मावतीचरणचारणचक्रवर्ती ॥**
**श्रीवासुदेवरतिकेलिकथासमेत-**
**मेतं करोति जयदेवकविः प्रबन्धम् ॥ २ ॥**

वाक्-देवता-चरित-चित्रित-चित्त-सद्मा
पद्मावती-चरण-चारण-चक्रवर्ती ॥
श्री-वासुदेव-रति-केलि-कथा-समेतम्
एतम् करोति जयदेव-कविः प्रबन्धम् ॥ २ ॥

शृंगारकलासंपन्न राधा आणि वासुदेव कृष्ण यांच्या प्रणयलीलांचें वर्णन करणारा हा प्रबंध जयदेवकवि रचित आहे. प्रसाद, माधुर्य इत्यादी जे साहित्यलक्ष्मी सरस्वतीचे गुण, त्यांनीं जयदेवाचें अंतःकरण ओतप्रोत भरलेलें आहे. चरणचपला अशी लक्ष्मी चक्रवर्ती सम्राटाला वश होते. जयदेवाची गृहलक्ष्मी पद्मावती आपल्या पायगुणानें जयदेवाचें घर धन्य करीत असल्यानें जयदेवही चक्रवर्तीच आहे.

( जयदेवाला लक्ष्मी आणि सरस्वती वश होत्याच; पण त्याची जीवनप्रतिभा पद्मावती हीही त्याची स्फूर्ति होती त्यामुळें तो कवींचा चक्रवर्ती होता ! )

**यदि हरिस्मरणे सरसं मनो यदि विलासकलासु कुतूहलम् ।**
**मधुरकोमलकान्तपदावलीं शृणु तदा जयदेवसरस्वतीम् ॥ ३ ॥**

यदि हरि-स्मरणे सरसम् मनो यदि विलास-कलासु कुतूहलम् ।
मधुर-कोमल-कान्त पद-आवलीम् शृणु तदा जयदेव-सरस्वतीम् ॥ ३ ॥

जर तुम्हांला कृष्णाच्या गुणगायनांत गोडी वाटत असेल, जर कामिनींच्या रतिविलासांतील कलासौंदर्य पाहण्यास तुम्ही उत्सुक असाल तर तुम्ही जयदेवकवीची गीतगोविंद ही कविता ऐकावी. या कवितेंतील शब्दरचना मधुर आहे, कोमल आहे, सुंदर आहे आणि तिच्यांत प्रेमपूर्ण भक्तीनें राधाकृष्णांचे प्रणयविलास वर्णिलेले आहेत.

**वाचः पल्लवयत्युमापतिधरः संदर्भशुद्धिं गिरां**
**जानीते जयदेव एव शरणः श्लाघ्यो दुरूहद्रुतेः ॥**
**शृङ्गारोत्तरसत्प्रमेयरचनैराचार्यगोवर्द्धन-**
**स्पर्द्धी कोऽपि न विश्रुतः श्रुतिधरो धोयी कविक्ष्मापतिः ॥ ४ ॥**

वाचः पल्लवयति उमापतिधरः संदर्भ-शुद्धिम् गिराम्
जानीते जयदेवः एव शरणः श्लाघ्यः दुरूह-द्रुतेः ॥
शृङ्गार-उत्तर-सत्-प्रमेय-रचनैः आचार्य-गोवर्द्धनः ।
स्पर्द्धी कः अपि न विश्रुतः श्रुतिधरः धोयी कवि-क्ष्मा-पतिः ॥ ४ ॥

उमापतिधर कवि नुसती भाषा फुलवितो. शरण कवि केवळ झटपट काव्य करण्याबाबत स्तुतिपात्र आहे. शृंगाररसभरित काव्य करण्याचाच प्रश्न असेल तर गोवर्धनाचार्यांशीं कुणी स्पर्धा करूं शक्त नाहीं. श्रुतिधर कवि मोठा विख्यात आहे. धोयी कवि कविराज मानला जातो; परंतु सर्वांगसुंदर अशी कविता एकटा जयदेवच लिहूं शकतो.

( उमापतिधर, शरण, गोवर्धन, श्रुतिधर, धोयी आणि जयदेव हे सहा कवि बंगालचा राजा लक्ष्मणसेन याच्या राजसभेंत होते. यांतील गोवर्धनाचार्यांची आर्यासप्तशती विशेष प्रसिद्ध आहे. हाल कवीच्या गाथासप्तशतीचें अनुकरण करून त्यानें हें शृंगारिक काव्य लिहिलें आहे. यांत रस व प्रसाद कमी असून पांडित्य अधिक आहे. या सर्वांत आपण श्रेष्ठ असें जयदेव म्हणतो तें याच्या सहकाऱ्यांना न रुचलें तरी स्वयंसिद्ध आणि रसिकमान्य आहे. )

## अष्टपदी पहिली

राग–मालवगौड : ताल–रूपक

**जय जगदीश हरे ॥ ध्रु० ॥**

हे जगदीशा, कृष्णा, तुझा विजय असो. ॥ ध्रु० ॥

**प्रलयपयोधिजले धृतवानसि वेदम् ।**
**विहितवहित्रचरित्रमखेदम् ॥**
**केशव धृतमीनशरीर ।**
**जय जगदीश हरे ॥ १ ॥**

मुळें तें वन शीतल आणि सुगंधित झालेलें होतें. त्या सुगंधित एकान्तांत राधाकृष्णांच्या प्रणयलीला रंगल्या. या लीला सदाविजयी आहेत.

**वाग्देवताचरितचित्रितचित्तसद्मा**
**पद्मावतीचरणचारणचक्रवर्ती ॥**
**श्रीवासुदेवरतिकेलिकथासमेत-**
**मेतं करोति जयदेवकविः प्रबन्धम् ॥ २ ॥**

वाक्-देवता-चरित-चित्रित-चित्त-सद्मा
पद्मावती-चरण-चारण-चक्रवर्ती ॥
श्री-वासुदेव-रति-केलि-कथा-समेतम्
एतम् करोति जयदेव-कविः प्रबन्धम् ॥ २ ॥

शृंगारकलासंपन्न राधा आणि वासुदेव कृष्ण यांच्या प्रणयलीलांचें वर्णन करणारा हा प्रबंध जयदेवकवि रचित आहे. प्रसाद, माधुर्य इत्यादी जे साहित्यलक्ष्मी सरस्वतीचे गुण, त्यांनीं जयदेवाचें अंतःकरण ओतप्रोत भरलेलें आहे. चरणचपला अशी लक्ष्मी चक्रवर्ती सम्राटाला वश होते. जयदेवाची गृहलक्ष्मी पद्मावती आपल्या पायरवानें जयदेवाचें घर धन्य करीत असल्यानें जयदेवही चक्रवर्तीच आहे.

( जयदेवाला लक्ष्मी आणि सरस्वती वश होत्याच; पण त्याची जीवनप्रतिभा पद्मावती हीही त्याची स्फूर्ति होती त्यामुळें तो कवींचा चक्रवर्ती होता ! )

**यदि हरिस्मरणे सरसं मनो यदि विलासकलासु कुतूहलम् ।**
**मधुरकोमलकान्तपदावलीं शृणु तदा जयदेवसरस्वतीम् ॥ ३ ॥**

यदि हरि-स्मरणे सरसम् मनो यदि विलास-कलासु कुतूहलम् ।
मधुर-कोमल-कान्त पद-आवलीम् शृणु तदा जयदेव-सरस्वतीम् ॥ ३ ॥

जर तुम्हांला कृष्णाच्या गुणगायनांत गोडी वाटत असेल, जर कामिनींच्या रतिविलासांतील कलासौंदर्य पाहण्यास तुम्ही उत्सुक असाल तर तुम्ही जयदेवकवीची गीतगोविंद ही कविता ऐकावी. या कवितेंतील शब्दरचना मधुर आहे, कोमल आहे, सुंदर आहे आणि तिच्यांत प्रेमपूर्ण भक्तीनें राधाकृष्णांचे प्रणयविलास वर्णिलेले आहेत.

**वाचः पल्लवयत्युमापतिधरः संदर्भशुद्धिं गिरां**
**जानीते जयदेव एव शरणः श्लाघ्यो दुरूहद्रुतेः ॥**
**शृङ्गारोत्तरसत्प्रमेयरचनैराचार्यगोवर्द्धन-**
**स्पर्द्धी कोऽपि न विश्रुतः श्रुतिधरो धोयी कविक्ष्मापतिः ॥ ४ ॥**

वाचः पल्लवयति उमापतिधरः संदर्भ-शुद्धिम् गिराम्
जानीते जयदेवः एव शरणः श्लाघ्यः दुरूह-द्रुतेः ॥
शृङ्गार-उत्तर-सत्-प्रमेय-रचनैः आचार्य-गोवर्द्धनः ।
स्पर्द्धी कः अपि न विश्रुतः श्रुतिधरः धोयी कवि-क्ष्मा-पतिः ॥ ४ ॥

उमापतिधर कवि नुसती भाषा फुलवितो. शरण कवि केवळ झटपट काव्य करण्याबावत स्तुतिपात्र आहे. शृंगाररसभरित काव्य करण्याचाच प्रश्न असेल तर गोवर्धनाचार्यांशीं कुणी स्पर्धा करूं शकत नाहीं. श्रुतिधर कवि मोठा विख्यात आहे. धोयी कवि कविराज मानला जातो; परंतु सर्वांगसुंदर अशी कविता एकटा जयदेवच लिहूं शकतो.

( उमापतिधर, शरण, गोवर्धन, श्रुतिधर, धोयी आणि जयदेव हे सहा कवि बंगालचा राजा लक्ष्मणसेन याच्या राजसभेंत होते. यांतील गोवर्धनाचार्यांची आर्यासप्तशती विशेष प्रसिद्ध आहे. हाल कवीच्या गाथासप्तशतीचें अनुकरण करून त्यानें हें शृंगारिक काव्य लिहिलें आहे. यांत रस व प्रसाद कमी असून पांडित्य अधिक आहे. या सर्वांत आपण श्रेष्ठ असें जयदेव म्हणतो तें याच्या सहकाऱ्यांना न रुचलें तरी स्वयंसिद्ध आणि रसिकमान्य आहे. )

## अष्टपदी पहिली

राग–मालवगौड : ताल–रूपक

**जय जगदीश हरे ॥ ध्रु० ॥**

हे जगदीशा, कृष्णा, तुझा विजय असो. ॥ ध्रु० ॥

**प्रलयपयोधिजले धृतवानसि वेदम् ।**
**विहितवहित्रचरित्रमखेदम् ॥**
**केशव धृतमीनशरीर ।**
**जय जगदीश हरे ॥ १ ॥**

प्रलय-पयोधि-जले धृतवान् असि वेदम् ।
विहित-वहित्र-चरित्रम् अखेदम् ।।
केशव धृत-मीन-शरीर । जय जगदीश हरे ।। १ ।।

सागरांच्या जलांत प्रलय होतो तेव्हां तूं माशाचें रूप घेतोस. जणूं सजीव नौकाच असावी तसा पराक्रम सहज प्रकट:करतोस आणि वेदांना आधार देतोस. हे मत्स्यरूप जगदीशा तुझा विजय असो.

( अज्ञानाच्या महान् सागरांत विश्व धडपडत असतां ईश्वरानेंच वेद प्रकट करून ज्ञानाला आरंभ करून दिला. दशावतारांतील मत्स्य-अवताराची ही प्रार्थना. )

**क्षितिरतिविपुलतरे तव तिष्ठति पृष्ठे ।**
**धरणिधरणकिणचक्रगरिष्ठे ॥**
**केशव धृतकच्छपरूप ।**
**जय जगदीश हरे ॥ २ ॥**

क्षितिः अति-विपुलतरे तव तिष्ठति पृष्ठे ।
धरणि-धरण-किण-चक्र-गरिष्ठे ।।
केशव धृत-कच्छप-रूप । जय जगदीश हरे ।। २ ।।

हे केशवा, कांसवाचें रूप तूंच घेतलेलें आहेस. या प्रचंड मंदर पर्वताला तूं आपल्या अतिविशाल पाठीवर सांवरलें आहेस. समुद्रमंथनाच्या वेळीं फिरणाऱ्या या पर्वतामुळें तुझ्या पाठीवर पडलेला चक्राकार गोल घट्टा तुझ्या गौरवांत भर पाडीत आहे. हे कूर्मरूप केशवा, तुझा विजय असो.

( समुद्रमंथनांत देवदानवांनी मंदर पर्वताची रवी केली होती. ती बुडूं लागली तेव्हां परमेश्वरानें कासवाचें रूप घेऊन तिला आधार दिला. घुसळतांना गोल फिरणाऱ्या रवीमुळें परमेश्वराच्या पाठीवर गोल घट्टा पडलेला आहे. )

**वसति दशनशिखरे धरणी तव लग्ना ।**
**शशिनि कलङ्ककलेव निमग्ना ॥**
**केशव धृतसूकररूप ।**
**जय जगदीश हरे ॥ ३ ॥**

वसति दशन-शिखरे धरणी तव लग्ना ।
शशिनि कलङ्क-कला इव निमग्ना ॥
केशव धृत-सूकर-रूप । जय जगदीश हरे ॥ ३ ॥

हे जगदीशा, वराहाचें रूप तूंच धारण केलेलें आहेस. चंद्रावर कलंकाची कला शोभावी तशी तुझ्या विशाल दांतांच्या शिखरावर ही पृथ्वी शोभत आहे. हे वराहरूप केशवा, तुझा विजय असो.

( वरील दुसरी गीतिका आणि ही गीतिका यांनीं ईश्वराचें विराट् रूप वर्णिलें आहे. एवढी मोठी पृथ्वी अथवा एवढा मोठा मंदर पर्वत या गोष्टी परमेश्वराच्या दांतांवरील मातीच्या कणाप्रमाणें अथवा क्षुल्लक वजनाच्या रवीप्रमाणें आहेत. )

**तव करकमलवरे नखमद्भुतशृङ्गं।**
**दलितहिरण्यकशिपुतनुभृङ्गम् ॥**
**केशव धृतनरहरिरूप ।**
**जय जगदीश हरे ॥ ४ ॥**

तव कर-कमल-वरे नखम् अद्भुत-शृङ्गम् ।
दलित-हिरण्यकशिपु-तनु-भृङ्गम् ॥
केशव धृत-नरहरि-रूप । जय जगदीश हरे ॥ ४ ॥

श्रीहरि, तूंच नरसिंहाचें रूप धारण केलें आहेस. तुझ्या करकमलावर अत्यंत सामर्थ्य-शाली असें टोंकदार नख आहे. हें नख हिरण्यकशिपूच्या उदराचें विदारण करीत आहे. हे नृसिंहरूप केशवा, तुझा जय असो.

( कमल हें कोमल असतें. भुंगा टणक असतो. इथें कमलच भुंग्याचें विदारण करतें ही ईश्वरी लीला. )

**छलयसि विक्रमणे बलिमद्भुतवामन ।**
**पदनखनीरजनितजनपावन ॥**
**केशव धृतवामनरूप ।**
**जय जगदीश हरे ॥ ५ ॥**

छलयसि विक्रमणे बलिम् अद्भुत-वामन ।
पद-नख-नीर-जनित-जन-पावन ॥
केशव धृत-वामन-रूप । जय जगदीश हरे ॥ ५ ॥

केशवा, बटुवामनाचें रूप तूंच धारण केलेलें आहेस. अद्भुत पराक्रम करून तूं बळिराजाला ठकवीत आहेस. जगाला पावन करणारी ही गंगानदी तुझ्या पावलाच्या नखापासून उत्पन्न होत आहे.

( वामनाचें पाऊल वाढलें तेव्हां त्याच्या नखाच्या आघातानें ब्रह्मांड फुटलें आणि त्यांतून पाण्याचा प्रवाह उसळला. जणूं ब्रह्मदेवानें त्याच्या अंगठ्यावर अर्घ्य दिलें. तीच गंगा नदी होय. )

**क्षत्रियरुधिरमये जगदपगतपापं ।**
**स्नपयसि पयसि शमितभवतापम् ॥**
**केशव धृतभृगुपतिरूप ।**
**जय जगदीश हरे ॥ ६ ॥**

क्षत्रिय-रुधिर-मये जगत् अपगत-पापम् ।
स्नपयसि पयसि शमित-भव-तापम् ॥
केशव धृत-भृगुपति-रूप । जय जगदीश हरे ॥ ६ ॥

केशवा, या परशुरामाच्या रूपांत मला तूंच दिसत आहेस. मदांध दंडधाऱ्यांच्या रक्तानें तूं पृथ्वीला स्नान घालीत आहेस. विश्वांतील सारें पाप नाहींसें होत आहे. सृष्टीचे कष्ट संपत आहेत. परशुरामरूप केशवा, तुझा जय असो.

( रेणुकेचा अपमान करणाऱ्या दंडकेशहांचा परशुरामानें निःपात केला. त्यांच्या रक्तानें कुंडें भरून रेणुकेला अर्घ्य दिलें. तींच कुंडें आतां कुरुक्षेत्र म्हणून ओळखलीं जातात. त्यांत स्नान केल्यानें पातकांचा नाश होतो. )

**वितरसि दिक्षु रणे दिक्पतिकमनीयम् ।**
**दशमुखमौलिबलिं रमणीयम् ॥**
**केशव धृतरघुपतिरूप ।**
**जय जगदीश हरे ॥ ७ ॥**

वितरसि दिक्षु रणे दिक्पति-कमनीयम् ।
दश-मुख-मौलि-बलिम् रमणीयम ॥
केशव धृत-रघुपति-रूप । जय जगदीश हरे ॥ ७ ॥

केशवा, हा रामाचा अवतार तूंच घेतला आहेस. रावणाच्या शिरकमलांचा रम्य बली तूं युद्धांत दशदिशांना विखुरत आहेस. इंद्रासारखे मोठे दिक्पालसुद्धां या बलीनें संतुष्ट होत आहेत. रामरूप केशवा, तुझा जय असो.

( दिशांचे अधिपति देव रावणाच्या बंदींत होते. रामानें रावणाच्या दहा शिरांची आहुति दहा दिशांत विखरून त्या अधिपतींना आनंद दिला. )

**वहसि वपुषि विशदे वसनं जलदाभं ।**
**हलहतिभीतिमिलितयमुनाभम् ॥**
**केशव धृतहलधररूप ।**
**जय जगदीश हरे ॥ ८ ॥**

वहसि वपुषि विशदे वसनम् जलद्-आभम् ।
हल-हति-भीति-मिलित-यमुना-आभम् ॥
केशव धृत-हलधर-रूप । जय जगदीश हरे ॥ ८ ॥

बलरामहि तूंच. तुझ्या गौरवर्ण देहावर तूं नीलवर्ण वस्त्र परिधान केलें आहेस. जणूं तूं तुझ्या नांगरानें तिला मारशील म्हणून भिऊन निळी यमुना नदीच तुला मिठी मारून बसली आहे. बलरामरूप केशवा, तुझा जय असो.

( बलरामाला अवतार मानण्याची पद्धति नाहीं; परंतु हें स्तोत्र कृष्णाला उद्देशून असल्यानें त्याचा सहचर आणि भाऊ बलराम याला यांत अवतार मानलें आहे. बलराम एकदां मद्य पिऊन गोपींशीं खेळत असतां त्यानें यमुनेला खेळावयास बोलाविलें. तेव्हां यमुनेनें त्याचा मद्यपी म्हणून धिक्कार केला. त्यामुळें रागावून बलरामानें आपला नांगर यमुनेच्या गळ्यांत अडकविला आणि तिला ओढून जवळ घेतलें अशी कथा आहे. )

**निन्दसि यज्ञविधेरहह श्रुतिजातं ।**
**सदयहृदयदर्शितपशुघातम् ॥**
**केशव धृतबुद्धशरीर ।**
**जय जगदीश हरे ॥ ९ ॥**

निन्दसि यज्ञ-विधेः अहह श्रुति-जातम् ।
सदय-हृदय-दर्शित-पशु-घातम् ॥
केशव धृत-बुद्ध-शरीर । जय जगदीश हरे ॥ ९ ॥

केशवा, गौतम बुद्धाच्या रूपांतही मला तूंच दिसत आहेस. यज्ञांत दिसणाऱ्या पशुघातामुळें तुझें हृदय द्रवलें आहे आणि तूं त्या हिंसक वेदमंत्रांची निंदा करीत आहेस. हे बुद्धरूप केशवा, तुझा जय असो.

( गौतमबुद्धानें वेदांची निंदा केली आहे. केवळ हिंसेला पाठिंबा देणारीं वेदवचनें आहेत त्यांचीच बुद्धानें केलेली निंदा जयदेवाला मान्य आहे. )

**म्लेंच्छनिवहनिधने कलयसि करवालम् ।**
**धूमकेतुमिव किमपि करालम् ॥**
**केशव धृतकल्किशरीर ।**
**जय जगदीश हरे ॥ १० ॥**

म्लेंच्छ-निवह-निधने कलयसि करवालम् ।
धूमकेतुम् इव किम् अपि करालम् ॥
केशव धृत-कल्कि-शरीर । जय जगदीश हरे ॥ १० ॥

कल्कीच्या रूपांतही मला तूंच दिसत आहेस. शत्रुसमूहाचा विध्वंस करण्यासाठीं धूमकेतूसारखे दिसणारे आपले भयानक खड्ग तूं परजीत आहेस. हे कल्कीरूप केशवा, तुझा जय असो.

( धूमकेतूमध्यें धूम आणि तेज यांचें दर्शन होतें. खड्गाची निळी झाक हा धूर होय. त्याची धार हें त्याचें तेज होय. धूमकेतु हा संकटाची सूचना देतो. शूरांचें खड्गहि शत्रूवर संकटपरंपरा आणतें. )

**श्रीजयदेवकवेरिदमुदितमुदारं ।**
**शृणु सुखदं शुभदं भवसारम् ॥**
**केशव धृतदशविधरूप ।**
**जय जगदीश हरे ॥ ११ ॥**

श्रीजयदेव-कवेः इदम् उदितम् उदारम् ।
शृणु सुखदम् शुभदम् भवसारम् ॥
केशव धृत-दशविध-रूप । जय जगदीश हरे ॥ ११ ॥

केशवा, हे दहा अवतार तुझेच आहेत. तुझा विजय असो. मला जयदेवाला स्फुरलेली ही गीतगोविंद कविता तूं ऐक. ही कविता उदारपणें अर्थ उधळणारी आहे. माझा आशय कळावयास देवा, तुला मुळींच त्रास होणार नाहीं. मी हिच्यांत गोड शब्द योजलेले आहेत. ही ऐकून तुझ्या कानाला आनंद होईल. ही कविता तुझ्या मंगल रूपाचें दर्शन घडविणारी आहे; तूंच निर्माण केलेल्या या सृष्टीचें सार जी प्रीति तिनें ओथंबलेली आहे. देवा, ही तुझ्या चरणीं समर्पित आहे. ही तुला मान्य असो.

*पहिली अष्टपदी समाप्त*

( अष्टपदींत आठ पदें हवींत. परंतु अवतार दहा असल्यानें प्रत्येकाच्या स्तुतीसाठी एक एक पद आणि शेवटीं प्रार्थना, म्हणून इथें अकरा पदें अथवा गीतिका आहेत. )

**वेदानुद्धरते जगन्निवहते भूगोलमुद्बिभ्रते**
**दैत्यान् दारयते बलिं छलयते क्षत्रक्षयं कुर्वते ॥**
**पौलस्त्यं जयते हलं कलयते कारुण्यमातन्वते**
**म्लेंच्छान्मूर्च्छयते दशाकृतिकृते कृष्णाय तुभ्यं नमः ॥ ५ ॥**

वेदान् उद्धरते जगत् निवहते भूगोलम् उद्बिभ्रते
दैत्यान् दारयते बलिम् छलयते क्षत्र-क्षयम् कुर्वते ।
पौलस्त्यम् जयते हलम् कलयते कारुण्यम् आतन्वते
म्लेंच्छान् मूर्च्छयते दश-आकृति-कृते कृष्णाय तुभ्यम् नमः ॥ ५ ॥

कृष्णा, तूं वेदांचा उद्धार केलास. तूं मेरू पर्वताला आधार दिलास. तूं पृथ्वीला आपल्या दातांवर वाहून नेलेंस. तूं दैत्यांचा वध केलास. तूं बळीला फसविलेंस. तूं मदांधांचा नि:पात केलास. तूं रावणाला जिंकिलेंस. तूं नांगर पेललास. तूं करुणेचा स्वीकार केलास. तूं म्लेंच्छांचा विनाश केलास. हे दहा अवतार तुझेच होत. मी तुला नमस्कार करतों.

*प्रबंध पहिला समाप्त*

निन्दसि यज्ञ-विधेः अहह श्रुति-जातम् ।
सदय-हृदय-दर्शित-पशु-घातम् ।।
केशव धृत-बुद्ध-शरीर । जय जगदीश हरे ।। ९ ।।

केशवा, गौतम बुद्धाच्या रूपांतही मला तूंच दिसत आहेस. यज्ञांत दिसणाऱ्या पशुघातामुळें तुझें हृदय द्रवलें आहे आणि तूं त्या हिंसक वेदमंत्रांची निंदा करीत आहेस. हे बुद्धरूप केशवा, तुझा जय असो.

( गौतमबुद्धानें वेदांची निंदा केली आहे. केवळ हिंसेला पाठिंबा देणारीं वेदवचनें आहेत त्यांचीच बुद्धानें केलेली निंदा जयदेवाला मान्य आहे. )

**म्लेंच्छनिवहनिधने कलयसि करवालम् ।**
**धूमकेतुमिव किमपि करालम् ॥**
**केशव धृतकल्किशरीर ।**
**जय जगदीश हरे ॥ १० ॥**

म्लेंच्छ-निवह-निधने कलयसि करवालम् ।
धूमकेतुम् इव किम् अपि करालम् ।।
केशव धृत-कल्कि-शरीर । जय जगदीश हरे ।। १० ।।

कल्कीच्या रूपांतही मला तूंच दिसत आहेस. शत्रुसमूहाचा विध्वंस करण्यासाठीं धूमकेतू-सारखे दिसणारे आपले भयानक खड्ग तूं परजीत आहेस. हे कल्कीरूप केशवा, तुझा जय असो.

( धूमकेतूमध्यें धूम आणि तेज यांचें दर्शन होतें. खड्गाची निळी झाक हा धूर होय. त्याची धार हें त्याचें तेज होय. धूमकेतु हा संकटाची सूचना देतो. शूरांचें खड्गहि शत्रूवर संकटपरंपरा आणतें. )

**श्रीजयदेवकवेरिदमुदितमुदारं ।**
**शृणु सुखदं शुभदं भवसारम् ॥**
**केशव धृतदशविधरूप ।**
**जय जगदीश हरे ॥ ११ ॥**

श्रीजयदेव-कवेः इदम् उदितम् उदारम् ।
शृणु सुखदम् शुभदम् भवसारम् ॥
केशव धृत-दशविध-रूप । जय जगदीश हरे ॥ ११ ॥

केशवा, हे दहा अवतार तुझेच आहेत. तुझा विजय असो. मला जयदेवाला स्फुरलेली ही गीतगोविंद कविता तूं ऐक. ही कविता उदारपणें अर्थ उधळणारी आहे. माझा आशय कळावयास देवा, तुला मुळींच त्रास होणार नाहीं. मी हिच्यांत गोड शब्द योजलेले आहेत. ही ऐकून तुझ्या कानाला आनंद होईल. ही कविता तुझ्या मंगल रूपाचें दर्शन घडविणारी आहे; तूंच निर्माण केलेल्या या सृष्टीचें सार जी प्रीति तिनें ओथंबलेली आहे. देवा, ही तुझ्या चरणीं समर्पित आहे. ही तुला मान्य असो.

*पहिली अष्टपदी समाप्त*

( अष्टपदींत आठ पदें हवींत. परंतु अवतार दहा असल्यानें प्रत्येकाच्या स्तुतीसाठी एक एक पद आणि शेवटीं प्रार्थना, म्हणून इथें अकरा पदें अथवा गीतिका आहेत. )

**वेदानुद्धरते जगन्निवहते भूगोलमुद्बिभ्रते**
**दैत्यान् दारयते बलिं छलयते क्षत्रक्षयं कुर्वते ॥**
**पौलस्त्यं जयते हलं कलयते कारुण्यमातन्वते**
**म्लेंच्छान्मूर्च्छयते दशाकृतिकृते कृष्णाय तुभ्यं नमः ॥ ५ ॥**

वेदान् उद्धरते जगत् निवहते भूगोलम् उद्बिभ्रते
दैत्यान् दारयते वलिम् छलयते क्षत्र-क्षयम् कुर्वते ।
पौलस्त्यम् जयते हलम् कलयते कारुण्यम् आतन्वते
म्लेंच्छान् मूर्च्छयते दश-आकृति-कृते कृष्णाय तुभ्यम् नमः ॥ ५ ॥

कृष्णा, तूं वेदांचा उद्धार केलास. तूं मेरू पर्वताला आधार दिलास. तूं पृथ्वीला आपल्या दातांवर वाहून नेलेंस. तूं दैत्यांचा वध केलास. तूं बळीला फसविलेंस. तूं मदांधांचा नि:पात केलास. तूं रावणाला जिंकिलेंस. तूं नांगर पेललास. तूं करुणेचा स्वीकार केलास. तूं म्लेंच्छांचा विनाश केलास. हे दहा अवतार तुझेच होत. मी तुला नमस्कार करतों.

*प्रबंध पहिला समाप्त*

# प्रबंध दुसरा

## अष्टपदी दुसरी

राग–गुर्जरी : ताल–प्रतिमंठ

**जय जय देव हरे ॥ ध्रु० ॥**

हे देवा, हे श्रीहरी, तुझा जय असो, जय असो.

**श्रितकमलाकुचमण्डलधृतकुण्डल ए ।**
**कलितललितवनमाल जय जय देव हरे ॥ १ ॥**

श्रित-कमला-कुच-मण्डलधृत-कुण्डल ए ।
कलित-ललित-वन-माल जय जय देव हरे ॥ १ ॥

हे कुंडलधर देवा, लक्ष्मीचें तुझ्यावर प्रेम असल्यानें तिनें तुला तिच्या हृदयांत स्थान दिलें आहे. त्यामुळें तुला तिच्या विशाल स्तनमंडलाचा आधार आहे. चरणांपर्यंत लोंबणारी वनपुष्पांची माला तुझ्या कंठांत आहे. तुझा विजय असो.

**दिनमणिमण्डलमण्डन भवखण्डन ए ।**
**मुनिजनमानसहंस जय जय देव हरे ॥ २ ॥**

दिन-मणि-मण्डल-मण्डन भव-खण्डन ए ।
मुनि-जन-मानस-हंस जय जय देव हरे ॥ २ ॥

देवा, या सूर्यमंडलाची तूं शोभा आहेस. तूं संसारतापांवर उतारा आहेस. मुनिजनांच्या मनांत निवास करणारा तूं राजहंस आहेस. तुझा विजय असो.

**कालियविषधरगञ्जन जनरञ्जन ए ।**
**यदुकुलनलिनदिनेश जय जय देव हरे ॥ ३ ॥**

कालिय-विष-धर-गञ्जन जन-रञ्जन ए
यदु-कुल-नलिन-दिन-ईश जय जय देव हरे ॥ ३ ॥

विषारी कालियाला दंड करून तूं लोकांना आनंद देतोस. सूर्य कमलवनें फुलवितो, तसें तूं यदुकुल आनंदित करतोस. तुझा विजय असो.

**मधुमुरनरकविनाशन गरुडासन ए।**
**सुरकुलकेलिनिदान जय जय देव हरे ॥ ४ ॥**

मधु-मुर-नरक-विनाशन गरुड-आसन ए।
सुर-कुल-केलि-निदान जय जय देव हरे ॥ ४ ॥

तूं गरुडावर बसून प्रवास करतोस. मधु, मुर, नरक अशा राक्षसांचा तूं नाश करतोस. तुझ्या कृपेमुळेंच देव त्यांच्या लीला मोकळेपणानें करूं शकतात. तुझा जय असो.

**अमलकमलदललोचन भवमोचन ए।**
**त्रिभुवनभवननिधान जय जय देव हरे ॥ ५ ॥**

अ-मल-कमल-दल-लोचन भव-मोचन ए।
त्रि-भुवन-भवन-निधान जय जय देव हरे ॥ ५ ॥

हे मोक्षदायक देवा, तुझे नेत्र निष्कलंक कमलाच्या पाकळीप्रमाणें सुंदर आहेत. तूं हीं त्रिभुवनें व्यापून राहिलेला आहेस. तुझा जय असो.

**जनकसुताकृतभूषण जितदूषण ए।**
**समरशमितदशकण्ठ जय जय देव हरे ॥ ६ ॥**

जनक-सुता-कृत-भूषण जित-दूषण ए
समर-शमित-दश-कण्ठ जय जय देव हरे ॥ ६ ॥

देवा, जनकाची कन्या सीता हिचें प्रसाधन तूं करीत आहेस. तूं युद्धांत दूषण राक्षसाचा पराभव करीत आहेस. युद्धांत रावणाला तूं जिंकीत आहेस. तुझा जय असो.

**अभिनवजलधरसुन्दर धृतमन्दर ए।**
**श्रीमुखचन्द्रचकोर जय जय देव हरे ॥ ७ ॥**

अभिनव-जल-धर-सुन्दर धृत-मन्दर ए।
श्री-मुख-चन्द्र-चकोर जय जय देव हरे ॥ ७ ॥

कृष्णा, आकाशांत नुकत्याच उगवलेल्या निळसर ढगाप्रमाणें तूं सुंदर आहेस. तूं मंदर पर्वताचा आधार आहेस. लक्ष्मीच्या चंद्राप्रमाणें सुंदर अशा मुखावर लोभावलेला तूं चकोर आहेस. तुझा जय असो.

**तव चरणे प्रणता वयमिति भावय ए ।**
**कुरु कुशलं प्रणतेषु जय जय देव हरे ॥ ८ ॥**

तव चरणे प्रणताः वयम् इति भावय ए ।
कुरु कुशलम् प्रणतेषु जय जय देव हरे ॥ ८ ॥

देवा, आम्ही तुझ्या चरणांपुढें नत आहोंत हें तूं ओळख. तूं आम्हां शरणागतांचें कल्याण कर.

**श्रीजयदेवकवेरिदं कुरुते मुदम् ए ।**
**मङ्गलमुज्ज्वलगीतं जय जय देव हरे ॥ ९ ॥**

श्रीजयदेव-कवेः इदम् कुरुते मुदम् ए ।
मङ्गलम् उज्ज्वल-गीतम् जय जय देव हरे ॥ ९ ॥

जयदेवकवीनें लिहिलेलें हें मंगल आणि उज्ज्वल असें गीतगोविंद काव्य तुला मान्य असो. तुला रुचो.

*दुसरी अष्टपदी समाप्त*

**पद्मापयोधरतटीपरिरम्भलग्नकाश्मीरमुद्रितमुरो मधुसूदनस्य ॥**
**व्यक्तानुरागमिव खेलदनङ्गखेदस्वेदाम्बुपूरमनुपूरयतु प्रियं वः ॥१०॥**

पद्मा-पयोधर-तटी-परिरम्भ-लग्न-
काश्मीर-मुद्रितम् उरः मधुसूदनस्य ।
व्यक्त-अनुरागम् इव खेलत्-अनङ्ग-खेद-
स्वेद-अम्बु-पूरम् अनुपूरयतु प्रियम् वः ॥ १० ॥

कृष्ण कमलेशीं विहार करीत आहे. त्या श्रमांनीं घाम येऊन त्याचें वक्षस्थल भिजत आहे. जणूं त्याच्या हृदयांतील प्रीतीचें उधाणच बाहेर उसळत आहे. त्याच्या दृढ

आलिंगनांत गवसलेल्या कमलेच्या उंच स्तनांच्या तटांवर लाविलेलें कर्पूरकुंकुम कृष्णाच्या घामामुळें भिजून ओलें होत आहे व त्याचा ठसा कृष्णाच्या उरावर उमटत आहे. जणूं ' हा कृष्ण माझा आहे, यावर माझें स्वामित्व आहे, ' हें इतर स्त्रियांना कळावें म्हणूनच कमलेनें आपल्या अतुल सुंदर स्तनांची विशिष्ट मुद्राच कृष्णाच्या उरावर उठविली आहे. त्या मुद्रेनें शोभिवंत दिसणारें हें वक्षस्थल आपलें कल्याण करो.

*प्रबंध दुसरा समाप्त*

# प्रबंध तिसरा

**वसन्ते वासन्तीकुसुमसुकुमारैरवयवै-**
**र्भ्रमन्तीं कान्तारे बहुविहितकृष्णानुसरणम् ।**
**अमन्दं कन्दर्पज्वरजनितचिन्ताकुलतया**
**चलद्बाधां राधां सरसमिदमूचे सहचरी ॥ १ ॥**

वसन्ते वासन्ती-कुसुम-सुकुमारैः अवयवैः
भ्रमन्तीम् कान्तारे बहु-विहित-कृष्ण-अनुसरणम् ॥
अमन्दम् कन्दर्प-ज्वर-जनित-चिन्ता-आकुलतया
चलत्-बाधाम् राधाम् सरसम् इदम् ऊचे सहचरी ॥ १ ॥

वसंत ऋतु आहे. वासंतिक सुमनें फुललेलीं आहेत. या सुमनांसारखेच सुकुमार अवयव असलेली राधा वनांत भ्रमण करीत आहे. कृष्णामागून वनांत असें फिरावयाचें तिचें व्रतच आहे. आतांही तिची कृष्णाविषयींची ओढ उफाळून आली आहे. कृष्ण कुठें दिसेल अशा चिंतेनें ती व्याकुळ झाली आहे. तेव्हां तिची सहचरी तिला गोड वाणीनें म्हणत आहे.

## अष्टपदी तिसरी

राग–वसंत : ताल–रूपक

**विहरति हरिरिह सरसवसन्ते ॥**
**नृत्यति युवतिजनेन समं सखि विरहिजनस्य दुरन्ते ॥ ध्रु० ॥**

विहरति हरिः इह सरस-वसन्ते
नृत्यति युवति-जनेन समम् सखि विरहिजनस्य दुरन्ते ॥ ध्रु० ॥

हे सखे, सौंदर्यानें रसरसलेला हा वसंत ऋतु कृष्णाच्या विरहामुळें तुला दुःखदायक होत आहे. राधे, कृष्ण इथेंच विहार करीत आहे. तरुणींचा मेळा भोंवतीं घेऊन तो या कुंजवनांत नाचत आहे.

**ललितलवङ्गलतापरिशीलनकोमलमलयसमीरे ॥**
**मधुकरनिकरकरम्बितकोकिलकूजितकुञ्जकुटीरे ॥ १ ॥**

ललित-लवङ्ग-लता-परिशीलन-कोमल-मलय-समीरे ।
मधुकर-निकर-करम्बित-कोकिल-कूजित कुञ्ज-कुटीरे ॥ १ ॥

लवंगांच्या मनोहर वेलींवरून वाहात आलेला गंधकोमल असा मलयवायु इथें वाहात आहे. भुंग्यांच्या समुदायाचा गुंजारव आणि कोकिलांचें कुहूगीत यांनीं या वनांतील प्रत्येक लताकुंज आणि वनगृहा कुजबुजत आहे.

**उन्मदमदनमनोरथपथिकवधूजनजनितविलापे ॥**
**अलिकुलसंकुलकुसुमसमूहनिराकुलबकुलकलापे ॥ २ ॥**

उन्मद-मदन-मनोरथ पथिक-वधू-जन-जनित-विलापे ॥
अलि-कुल-संकुल-कुसुम-समूह-निराकुल-बकुल-कलापे ॥ २ ॥

ज्यांचे पति प्रवासांत आहेत अशा कुलवधूंच्या वासनेला या वसंतामुळें अनावर उफाळा आला आहे. पति जवळ नाहीं याची वेदना असह्य होऊन त्या विलाप करीत आहेत. मदनाच्या शरांचे जणूं भातेच असे बकुलवृक्ष फुलांनीं भारावले आहेत. त्या फुलांच्या केसराकेसरांवर भुंग्यांचे समूह नाचत आहेत.

**मृगमदसौरभरभसवशंवदनवदलमालतमाले ॥**
**युवजनहृदयविदारणमनसिजनखरुचिकिंशुकजाले ॥ ३ ॥**

मृग-मद-सौरभ-रभस-वशंवद-नव-दल-माल-तमाले ॥
युव-जन-हृदय-विदारण मनसिज-नख-रुचि किंशुक-जाले ॥ ३ ॥

तमालवृक्षांना नवी कोवळी पालवी फुटलेली आहे. कस्तुरीच्या गंधाचा आभास निर्मिणारा परिमळ त्या पालवींतून उसळत आहे. पलाशवृक्ष बहरले आहेत. त्यांची आंकड्या-सारखीं लाल फुलें पाहून कामी जनांच्या हृदयाला जखमा करणाऱ्या मदनाच्या नखांची आठवण येत आहे.

**मदनमहीपतिकनकदण्डरुचिकेशरकुसुमविकासे ॥**
**मिलितशिलीमुखपाटलिपटलकृतस्मरतूणविलासे ॥ ४ ॥**

मदन-मही-पति-कनक-दण्ड-रुचि-केशर-कुसुम-विकासे ।
मिलित-शिलीमुख-पाटलि-पटल-कृत-स्मर-तूण-विलासे ॥ ४ ॥

नागकेसराचीं फुलें फुललेलीं आहेत. त्यांचे लांब पिवळे देठ मदनराजाच्या हातांतील सुवर्णदंडाप्रमाणें शोभत आहेत. उंडिणीच्या विकसलेल्या फुलांच्या कोषांत काळेनिळे भुंगे दाटीवाटीनें शिरले आहेत. त्यामुळें तीं फुलें बाणांनीं गच्च भरलेल्या मदनाच्या भात्यांप्रमाणें दिसत आहेत.

**विगलितलज्जितजगदवलोकनतरुणकरुणकृतहासे ।**
**विरहिनिकृन्तनकुन्तमुखाकृतिकेतकिदन्तुरिताशे ॥ ५ ॥**

विगलित लज्जित-जगत्-अवलोकन-तरुण-करुण-कृत हासे ।
विरहि-निकृन्तन-कुन्त-मुख-आकृति केतकि-दन्तुरित आशे ॥ ५ ॥

रसरशीत बटमोगरे फुललेले आहेत. स्वतःच्या पराक्रमामुळें प्रेमविव्हल आणि व्याकुळ होऊन लाजलेल्या प्रेमिकांच्या जगताकडे पाहून ते हसत आहेत. दिशादिशांत केतकी उमलल्या आहेत. त्यांच्या पात्यांचे दांते विरहीजनांच्या हृदयाला चिरणाऱ्या करवतींप्रमाणें दिसत आहेत.

**माधविकापरिमलललिते नवमालतिजातिसुगन्धौ ॥**
**मुनिमनसामपि मोहनकारिणि तरुणाकारणबन्धौ ॥ ६ ॥**

माधविका-परिमल-ललिते नव-मालति-जाति-सुगन्धौ ॥
मुनि-मनसाम् अपि मोहन-कारिणि तरुण-अकारण-बन्धौ ॥ ६ ॥

माधवीलता, नवमल्लिका, जाई यांच्या परिमलानें दशदिशा गंधवती झाल्या आहेत. प्रेमी जनांच्या वृत्तींना बहर आणण्यासाठीं निःस्पृहपणें कष्ट करणारा त्यांचा मित्र हा वसंत संयमांत गुंतणाऱ्या मुनिजनांनासुद्धां प्रणयाची भूल पडावी असा मदभरा झाला आहे.

**स्फुरदतिमुक्तलतापरिरम्भणमुकुलितपुलकितचूते ॥**
**वृन्दावनविपिने परिसरपरिगतयमुनाजलपूते ॥ ७ ॥**

स्फुरत्-अतिमुक्त-लता-परिरम्भण-मुकुलित-पुलकित-चूते ॥
वृन्दावन-विपिने परिसर-परिगत-यमुना-जल-पूते ॥ ७ ॥

वाऱ्याला भिऊन थरथरणारी माधवीची वेल आपसुकच आम्रतरूच्या आश्रयाला जाऊन त्याच्या मिठींत शिरलेली आहे. त्यामुळें तो आम्रवृक्ष रोमांचित झाला असून त्याच्या सर्वांगावर मंजिऱ्यांचा कांटा फुलला आहे.

या वृंदावनाच्या परिसरापर्यंत यमुनेचें जल येऊन भिडलें आहे. त्यामुळें हें वन पावन झालें आहे. ( आतां या वनांत वसंतबहार आहे आणि कृष्ण तेथें प्रणयविहार करीत आहे. )

**श्रीजयदेवभणितमिदमुदयतु हरिचरणस्मृतिसारम् ॥**
**सरसवसन्तसमयवनवर्णनमनुगतमदनविकारम् ॥ ८ ॥**

श्रीजयदेव-भणितम् इदम् उदयतु हरि-चरण-स्मृति-सारम् ॥
सरस-वसन्त-समय-वन-वर्णनम् अनुगत-मदन-विकारम् ॥ ८ ॥

जयदेवकवीचें गीतगोविंद काव्य आतां उदयाला येत आहे. श्रीहरीच्या पुण्य चरणांचें स्मरण हें या काव्याचें सार आहे. वसंतऋतूंत बहरलेल्या कुंजवनाचें आणि त्यामुळें राधा-कृष्णांच्या मनांत उत्पन्न झालेल्या प्रणयभावाचें रसाळ वर्णन यांत आहे.

*तिसरी अष्टपदी समाप्त*

**दरविदलितमल्लीवल्लिचञ्चत्पराग-**
**प्रगटितपटवासैर्वासयन् काननानि ॥**
**इह हि दहति चेतः केतकीगन्धबन्धुः**
**प्रसरदसमबाणप्राणवद्गन्धवाहः ॥ २ ॥**

दर-विदलित-मल्ली-वल्लि-चञ्चत्-पराग-
प्रकटित-पट-वासैः वासयन् काननानि ॥
इह हि दहति चेतः केतकी-गन्ध-बन्धुः
प्रसरत्-असम-बाण-प्राणवत् गन्धवाहः ॥ २ ॥

जाइच्या कळ्या अर्ध्या उमलल्या आहेत. त्यांवरून गंधपराग निसटत आहेत. वारा या परागांचे सुगंधी शेले विणून त्यांनी कुंजवनाला वेढीत आहे. केवड्याच्या कणसांचा गंध चौफेर वाहून त्यांची कीर्ति पसरविणारा हा वारा त्या कणसांचा मित्र आहे. मदनाचा हा जणू दुसरा प्राण आहे. पण गंधाच्या कोमलतेशीं असे नाजूक व्यवहार करणारा हाच वारा विरहीजनांच्या बाबतींत मात्र अतिशय क्रूर होऊन त्यांचें चित्त जाळीत आहे.

**उन्मीलन्मधुगन्धलुब्धमधुपव्याधूतचूताङ्कुर-**
**क्रीडत्कोकिलकाकलीकलकलैरुद्गीर्णकर्णज्वराः ॥**
**नीयन्ते पथिकैः कथं कथमपि ध्यानावधानक्षण-**
**प्राप्तप्राणसमासमागमरसोल्लासैरमी वासराः ॥ ३ ॥**

उन्मीलत्-मधु-गन्ध-लुब्ध-मधुप-व्याधूत-चूत-अंकुर-
क्रीडत्-कोकिल-काकली-कलकलैः उद्गीर्ण-कर्ण-ज्वराः ॥
नीयन्ते पथिकैः कथम् कथम् अपि ध्यान-अवधान-क्षण-
प्राप्त-प्राणसमा-समागम-रस-उल्लासैः अमी वासराः ॥ ३ ॥

मधाच्या गोडीनं भारावलेले पुष्पगंध उधळत आहेत. मधावर लट्टू असणारे भुंगे या गंधानें वेडावून आम्रमंजिरीवर झेपावत आहेत. या आम्रमंजिऱ्यांच्या धुंदींत खेळणारे कोकीळ तरल कलरव करीत आहेत. त्या कलरवानें विरहीजनांचे कान व्यथित होत आहेत. आपल्या कांतांपासून दूर असलेले हे विरही पांथस्थ आपल्या ध्यानचक्षूं पुढें आपल्या प्राणप्रियांची आकृति कल्पून त्यांच्याशीं कल्पनेनें संवाद करीत आहेत आणि त्या क्षणिक भ्रमांत प्राप्त होणाऱ्या अनुभूतींच्या उल्लासाच्या जोरावर हे वसंत ऋतूचे दिवस कसेबसे कष्टानें पार पाडीत आहेत.

*प्रबंध तिसरा समाप्त*

# प्रबंध चवथा

**अनेकनारीपरिरम्भसम्भ्रमस्फुरन्मनोहारिविलासलालसम् ।**
**मुरारिमाराद्रुपदर्शयन्त्यसौ सखी समक्षं पुनराह राधिकाम् ॥ १ ॥**

अनेक-नारी-परिरम्भ-संभ्रम-स्फुरत्-मनोहारि विलास-लालसम् ।
मुरारिम् आरात् उपदर्शयन्ती असौ सखी समक्षम् पुनः आह राधिकाम् ॥१॥

कृष्ण अनेक तरुणींना आलिंगन देत आहे. त्यामुळें नाना प्रकारच्या रतिविलासांची ओढ त्याच्या मनांत स्फुरत आहे. सखीनें राधेला त्या कृष्णाच्या जवळ नेऊन त्याचें दर्शन घडविलें आहे आणि ती त्याच्या समक्षच राधेला म्हणत आहे.

## अष्टपदी चवथी

राग–रामकरी : ताल–रूपक

**हरिरिह मुग्धवधूनिकरे ।**
**विलासिनि विलसति केलिपरे ॥ ध्रु० ॥**

हरिः इह मुग्ध-वधू-निकरे ।
विलासिनि विलसति केलि-परे ॥ ध्रु० ॥

हे विलासिनी, हा इथें मुग्ध षोडशींचा समुदाय रतिकेली करावयास उत्सुक झाला आहे आणि कृष्ण त्यांच्याबरोबर रतिविलास करीत आहे.

**चन्दनचर्चितनीलकलेवरपीतवसनवनमाली ॥**
**केलिचलन्मणिकुण्डलमण्डितगण्डयुगः स्मितशाली ॥ १ ॥**

चन्दन-चर्चित-नील-कलेवर-पीत-वसन-वनमाली ॥
केलि-चलत्-मणि-कुण्डल-मण्डित-गण्ड-युगः स्मितशाली ॥ १ ॥

या नीलवर्ण माधवानें आपल्या सर्वांगाला सुगंधी चंदनाचा लेप दिलेला आहे. हा पीतांबर नेसलेला आहे. यानें गळ्यांत वनमाला घातली आहे. याच्या कानांतील रत्नकुंडलें

त्याच्या हालचालीबरोबर डुलत आहेत. त्यांतून निघालेले नानारंगी प्रकाशकिरण याच्या गालांवर पडल्यामुळें ते गाल मोठे सुशोभित दिसत आहेत. हा स्मितहास्य करीत आहे.

**पीनपयोधरभारभरेण हरिं परिरभ्य सरागम् ॥**
**गोपवधूरनुगायति काचिदुदञ्चितपञ्चमरागम् ॥ २ ॥**

पीन-पयोधर-भार-भरेण हरिम् परिरभ्य सरागम् ।
गोप-वधूः अनुगायति काचित् उदञ्चित-पञ्चमरागम् ॥ २ ॥

ही गोपी पाहा. ही प्रणयभावानें फुललेली आहे. आपल्या उंच स्तनांचा भार कृष्णावर टाकून हिनें त्याला आलिंगन दिलें आहे. प्रीतिभावानें उन्मुख झालेला कृष्ण गात आहे आणि ही गोपी पंचमस्वरांत त्याच्यामागून सूर धरीत आहे.

**कापि विलासविलोलविलोचनखेलनजनितमनोजम् ॥**
**ध्यायति मुग्धवधूरधिकं मधुसूदनवदनसरोजम् ॥ ३ ॥**

का अपि विलास-विलोल-विलोचन-खेलन-जनित-मनोजम् ॥
ध्यायति मुग्ध-वधूः अधिकम् मधुसूदन-वदन-सरोजम् ॥ ३ ॥

ही दुसरी मुग्धा गोपी पाहा. प्रणयाच्या ओढीनें तरल झालेल्या नेत्रांचे कटाक्ष ही सारखे कृष्णाकडे टाकीत आहे. नयनांच्या या पाठशिवणीमुळें कृष्णाच्या मनांतही प्रणयभावना फुलली आहे आणि त्यामुळें कमलासारख्या सुंदर दिसणाऱ्या त्याच्या मुखाकडे ती अधिक अधिक ओढीनें पाहात आहे.

**कापि कपोलतले मिलितालपितुं किमपि श्रुतिमूले ॥**
**चारु चुचुम्ब नितम्बवती दयितं पुलकैरनुकूले ॥ ४ ॥**

का अपि कपोल-तले मिलिता आलपितुम् किम् अपि श्रुति-मूले ॥
चारु चुचुम्ब नितम्बवती दयितम् पुलकैः अनुकूले ॥ ४ ॥

डौलदार नितंब असलेली ही प्रौढा गोपी पाहा. कांहींतरी गुपित तुझ्या कानांत सांगते म्हणून ती आपले ओंठ त्याच्या गालांजवळ नेत आहे. ते ओंठ जवळ आल्यामुळें कृष्णाच्या गालांवर रोमांच फुलत आहेत आणि ही गोपी त्याच्या गालांचा गोड मुका मोठ्या चतुराईनें त्याच्या कानाखालीं घेत आहे.

**केलिकलाकुतुकेन च काचिदमुं यमुनाजलकूले ॥**
**मञ्जुलवञ्जुलकुञ्जगतं विचकर्ष करेण दुकूले ॥ ५ ॥**

केलि-कला-कुतुकेन च काचित् अमुम् यमुना-जल-कूले ।
मञ्जुल-वञ्जुल-कुञ्ज-गतम् विचकर्ष करेण दुकूल ॥ ५ ॥

ही गोपी प्रणयक्रीडा करावयास उत्कंठित झाली आहे. बकुल वृक्षाच्या रमणीय कुंजांत असलेल्या कृष्णाच्या वस्त्राची निरी हातानें धरून ती त्याला यमुनाजलाकडे ओढीत आहे.

**करतलतालतरलवलयावलिकलितकलस्वनवंशे ॥**
**रासरसे सह नृत्यपरा हरिणा युवतिः प्रशशंसे ॥ ६ ॥**

कर-तल-ताल-तरल-वलय-आवलि-कलित-कल-स्वन-वंशे ।
रास-रसे सह नृत्यपरा हरिणा युवतिः प्रशशंसे ॥ ६ ॥

ही युवती कृष्णासह रासनृत्य करीत आहे. तो मुरली वाजवीत आहे. ती टाळ्या वाजवून ताल धरीत आहे. त्यामुळें हालणारीं तिचीं कंकणें किणकिणत असून तींही मुरलीवादनाला साथ देत आहेत. त्यामुळें कृष्ण तिची प्रशंसा करीत आहे.

**श्लिष्यति कामपि चुम्बति कामपि कामपि रमयति रामाम् ॥**
**पश्यति सस्मितचारुतरामपरामनुगच्छति वामाम् ॥ ७ ॥**

श्लिष्यति काम् अपि चुम्बति काम् अपि काम् अपि रमयति रामाम् ॥
पश्यति सस्मित-चारुतराम् अपराम् अनुगच्छति वामाम् ॥ ७ ॥

हा कृष्ण इथें एकीचें चुंबन घेत आहे. दुसऱ्या कुणा एकीला आलिंगन देत आहे. इथें तिसऱ्याच सुंदरीचा सहवास लुटीत आहे. इथें गोड हसणाऱ्या हिच्याकडे पाहात आहे आणि तिथें त्या वामलोचनेच्या मागून एकान्तांत जात आहे.

**श्रीजयदेवकवेरिदमद्भुतकेशवकेलिरहस्यम् ॥**
**वृन्दावनविपिने ललितं वितनोतु शुभानि यशस्यम् ॥ ८ ॥**

श्री-जयदेव-कवेः इदम् अद्भुत-केशव-केलि-रहस्यम् ।
वृन्दावन-विपिने ललितम् वितनोतु शुभानि यशस्यम् ॥ ८ ॥

गोपी अनेक आहेत. एकच कृष्ण अनेक रूपें घेऊन त्यांच्याशीं खेळत आहे. त्यामुळें ही प्रणयकेली मोठी अद्भुत आहे. जयदेवकवि त्या केलीचें रहस्य आपल्या या गीतांत गात आहे. वृंदावनांतील ही प्रयणलीला मोठी मनोहर आणि यशदायिनी आहे. तिचें वर्णन करणारें हें गीत कल्याणकर ठरो.

*चवथी अष्टपदी समाप्त*

**विश्वेषामनुरञ्जनेन जनयन्नानन्दमिन्दीवर-**
**श्रेणीश्यामलकोमलैरुपनयन्नङ्गैरनङ्गोत्सवम् ॥**
**स्वच्छन्दं व्रजसुन्दरीभिरभितः प्रत्यङ्गमालिङ्गितः**
**शृङ्गारः सखि मूर्तिमानिव मधौ मुग्धो हरिः क्रीडति ॥ २ ॥**

विश्वेषाम् अनुरञ्जनेन जनयन् आनन्दम् इन्दीवर-
श्रेणी-श्यामल-कोमलैः उपनयन् अङ्गैः अनङ्ग-उत्सवम् ॥
स्वच्छन्दम् व्रज-सुन्दरीभिः अभितः प्रति-अङ्गम् आलिङ्गितः
शृङ्गारः सखि मूर्तिमान् इव मधौ मुग्धो हरिः क्रीडति ॥ २ ॥

राधे, ज्या ज्या गोपीला कृष्णाचा जो जो अवयव मिळाला आहे त्याला त्याला तिनें स्वच्छंदपणें अगदीं गाढ आलिंगन दिलेलें आहे. निळ्या कमलांच्या समुदायाप्रमाणें तो श्यामल आणि कोमल कृष्ण शोभत आहे. त्याच्या गात्रांचा स्पर्श, त्याचे कटाक्ष, हास्य यांमुळें गोपींच्या मनांत मदनभावाला भरतें येत आहे. तो भोंवतींच्या वनिताविश्वाचें अनुरंजन करून आनंद उत्पन्न करीत आहे. सखे, या वसंत ऋतूंत हा कृष्ण मूर्तिमंत शृंगार बनला आहे आणि विहार करीत आहे.

**अद्योत्सङ्गवसद्भुजङ्गकवलक्लेशादिवेशाचलं**
**प्रालेयप्लवनेच्छयाऽनुसरति श्रीखण्डशैलानिलः ॥**
**किञ्च स्निग्धरसालमौलिमुकुलान्यालोक्य हर्षोदया-**
**दुन्मीलन्ति कुहूः कुहूरिति कलोत्तालाः पिकानां गिरः ॥ ३ ॥**

अद्य उत्सङ्ग-वसत्-भुजङ्ग-कवल-क्लेशात् इव ईशाचलम्
प्रालेय-प्लवन-इच्छया अनुसरति श्रीखण्ड-शैल-अनिलः ॥

किं च स्निग्ध-रसाल-मौलि-मुकुलानि आलोक्य हर्ष-उदयात्
उन्मीलन्ति कुहूः कुहूः इति कल-उत्तालाः पिकानाम् गिरः ॥ ३ ॥

राधे, मलयाचलाच्या अंगावर गंधवेडे महासर्प फिरत आहेत. त्यांच्या फूत्कारांनीं कष्टी झालेला हा मलयवायु थंड हिमतुषारांत स्नान करण्याच्या ओढीनें हिमालयाकडे जात आहे. त्याच्या उबदार आणि चंदनगंधी लहरी इथें हेलावत आहेत. रसाळ आम्रवृक्षांच्या मंजिऱ्या-मजिऱ्यांची कळी कळी उमलत आहे. ती पाहून कोकिळांना हर्ष झाला आहे आणि त्यांच्या मुखांतून कुहूकुहू अशी मधुर हांक उंच स्वरांत उमटत आहे.

**रासोल्लासभरेण विभ्रमभृतामाभीरवामभ्रुवा-**
**मभ्यर्णे परिरभ्य निर्भरमुरः प्रेमान्धया राधया ॥**
**साधु त्वद्वदनं सुधामयमिति व्याहृत्य गीतस्तुति-**
**व्याजादुद्भटचुम्बितस्मितमनोहारी हरिः पातु वः ॥ ४ ॥**

रास-उल्लास-भरेण विभ्रम-भृताम् आभीर-वामभ्रुवाम्
अभ्यर्णे परिरभ्य निर्भरम् उरः प्रेम-अन्धया राधया ॥
साधु त्वत्-वदनम् सुधामयम् इति व्याहृत्य गीत-स्तुति-
-व्याजात् उद्भट-चुम्बित-स्मित-मनोहारी हरिः पातु वः ॥ ४ ॥

सखींचीं हीं वचनें ऐकून राधा प्रेमव्याकुळ होत आहे. रासक्रीडा रंगांत आली असल्यानें गोपी मोठ्या खुषींत आहेत. राधा त्या गोपींच्या समोरच कृष्णाकडे जाऊन त्याच्या हृदयाला गाढ आलिंगन देत आहे. “ तूं किती रे छान गातोस ! अमृतासारखें गोड असें हें गीत ज्यांतून निघतें तें तुझें मुख अमृतमयच असणार ” असें म्हणत आहे. जणू काय गाण्याचेंच कौतुक करण्याच्या मिषानें ती त्याच्या ओंठांचें चुंबन घेत आहे. गीताचें कौतुक करण्यांतील राधेची ही चतुराई पाहून कृष्ण आनंदानें स्मित करीत आहे. त्या स्मितामुळें तो मोठा मनोहर दिसत आहे. तो कृष्ण आपलें कल्याण करो.

*प्रबंध चौथा समाप्त*
*पाहिला सर्ग समाप्त*

# सर्ग दुसरा : अक्लेश केशव ( क्लेश हरण करणारा केशव )

## प्रबंध पांचवा

**विहरति वने राधा साधारणप्रणये हरौ**
**विगलितनिजोत्कर्षादीर्ष्यावशेन गतान्यतः ॥**
**क्वचिदपि लताकुञ्जे गुञ्जन्मधुव्रतमण्डली-**
**मुखरशिखरे लीना दीनाऽप्युवाच रहः सखीम् ॥ १ ॥**

विहरति वने राधा साधारण-प्रणये हरौ
विगलित-निज-उत्कर्षात् ईर्ष्या-वशेन गता अन्यतः ॥
क्वचित् अपि लता-कुञ्जे गुञ्जत्-मधुव्रत–मण्डली–
मुखर-शिखरे लीना दीना अपि उवाच रहः सखीम् ॥ १ ॥

कृष्ण सगळ्याच गोपींशीं समभावानें प्रणयक्रीडा करीत आहे. त्यामुळे मीच त्याची लाडकी हा राधेचा अभिमान गळून जात आहे. तिची ईर्षा बळावत आहे आणि मत्सराच्या झटक्यानें तेथून निघून ती दुसऱ्या कुंजांत जात आहे. परंतु याहि कुंजांतील लता फुललेल्या आहेत. त्यांच्या फुलांफुलांतून मध चुंबीत भुंगे गुंगारव करीत आहेत. त्यामुळें राधेच्या प्रणयभावनेला अधिकच उसळी येत आहे आणि दीन होऊन आपल्या सखीला ती आपल्या मनांतील गुपित एकांतांत सांगत आहे.

### अष्टपदी पांचवी

राग–गुर्जरी : ताल–रूपक :

**रासे हरिमिह विहितविलासं**
**स्मरति मनो मम कृतपरिहासम ॥ ध्रु० ॥**

किं च स्निग्ध-रसाल-मौलि-मुकुलानि आलोक्य हर्ष-उदयात्
उन्मीलन्ति कुहूः कुहूः इति कल-उत्तालाः पिकानाम् गिरः ॥ ३ ॥

राधे, मलयाचलाच्या अंगावर गंधवेडे महासर्प फिरत आहेत. त्यांच्या फूत्काराना कष्टा झालेला हा मलयवायु थंड हिमतुषारांत स्नान करण्याच्या ओढीनें हिमालयाकडे जात आहे. त्याच्या उबदार आणि चंदनगंधी लहरी इथें हेलावत आहेत. रसाळ आम्रवृक्षांच्या मंजिऱ्या-मंजिऱ्यांची कळी कळी उमलत आहे. ती पाहून कोकिळांना हर्ष झाला आहे आणि त्यांच्या मुखांतून कुहूकुहू अशी मधुर हांक उंच स्वरांत उमटत आहे.

**रासोल्लासभरेण विभ्रमभृतामाभीरवामभ्रुवा-**
**मभ्यर्णे परिरभ्य निर्भरमुरः प्रेमान्धया राधया ॥**
**साधु त्वद्वदनं सुधामयमिति व्याहृत्य गीतस्तुति-**
**[illegible]मितमनोहारी हरिः पातु वः ॥ ४ ॥**

रास-उल्लास-भरेण विभ्रम-भृताम् आभीर-वामभ्रुवाम्
अभ्यर्णे परिरभ्य निर्भरम् उरः प्रेम-अन्धया राधया ॥
साधु त्वत्-वदनम् सुधामयम् इति व्याहृत्य गीत-स्तुति-
-व्याजात् उद्भट-चुम्बित-स्मित-मनोहारी हरिः पातु वः ॥ ४ ॥

सखींचीं हीं वचनें ऐकून राधा प्रेमव्याकुळ होत आहे. रासक्रीडा रंगांत आली असल्यानें गोपी मोठ्या खुषींत आहेत. राधा त्या गोपींच्या समोरच कृष्णाकडे जाऊन त्याच्या हृदयाला गाढ आलिंगन देत आहे. "तूं किती रे छान गातोस ! अमृतासारखें गोड असें हें गीत ज्यांतून निघतें तें तुझें मुख अमृतमयच असणार" असें म्हणत आहे. जणू काय गाण्याचेंच कौतुक करण्याच्या मिषानें ती त्याच्या ओंठांचें चुंबन घेत आहे. गीताचें कौतुक करण्यांतील राधेची ही चतुराई पाहून कृष्ण आनंदानें स्मित करीत आहे. त्या स्मितामुळें तो मोठा मनोहर दिसत आहे. तो कृष्ण आपलें कल्याण करो.

*प्रबंध चौथा समाप्त*
*पाहिला सर्ग समाप्त*

# सर्ग दुसरा : अक्लेश केशव ( क्लेश हरण करणारा केशव )

## प्रबंध पांचवा

**विहरति वने राधा साधारणप्रणये हरौ**
**विगलितनिजोत्कर्षादीर्ष्यावशेन गतान्यतः ॥**
**क्वचिदपि लताकुञ्जे गुञ्जन्मधुव्रतमण्डली-**
**मुखरशिखरे लीना दीनाऽप्युवाच रहः सखीम् ॥ १ ॥**

विहरति वने राधा साधारण-प्रणये हरौ
विगलित-निज-उत्कर्षात् ईर्ष्या-वशेन गता अन्यतः ॥
क्वचित् अपि लता-कुञ्जे गुञ्जत्-मधुव्रत–मण्डली–
मुखर-शिखरे लीना दीना अपि उवाच रहः सखीम् ॥ १ ॥

कृष्ण सगळ्याच गोपींशीं समभावानें प्रणयक्रीडा करीत आहे. त्यामुळे मीच त्याची लाडकी हा राधेचा अभिमान गळून जात आहे. तिची ईर्षा बळावत आहे आणि मत्सराच्या झटक्यानें तेथून निघून ती दुसऱ्या कुंजांत जात आहे. परंतु याहि कुंजांतील लता फुललेल्या आहेत. त्यांच्या फुलांफुलांतून मध चुंबीत भुंगे गुंगारव करीत आहेत. त्यामुळें राधेच्या प्रणयभावनेला अधिकच उसळी येत आहे आणि दीन होऊन आपल्या सखीला ती आपल्या मनांतील गुपित एकांतांत सांगत आहे.

### अष्टपदी पांचवी

राग–गुर्जरी :     ताल–रूपक :

**रासे हरिमिह विहितविलासं**
**स्मरति मनो मम कृतपरिहासम् ॥ ध्रु० ॥**

रासे हरिम् इह विहित-विलासम् ।
स्मरति मनः मम कृत-परिहासम् ॥ ध्रु० ॥

सखे, मला कृष्णाची आठवण येते ग. इथेंच रासक्रीडा खेळतांना त्यानें आपली विलास-निपुणता मला दाखविली होती. इथेंच त्यानें माझ्याशीं हास्यविनोद केला होता.

**सञ्चरदधरसुधामधुरध्वनिमुखरितमोहनवंशम् ।**
**चलितदृगञ्चलचञ्चलमौलिकपोलविलोलवतंसम् ॥ १ ॥**

सञ्चरत्-अधर-सुधा-मधुर-ध्वनि-मुखरित-मोहन-वंशम् ।
चलित-दृक्-अञ्चल-चञ्चल-मौलि-कपोल-विलोल-वतंसम् ॥ १ ॥

इथेंच त्यानें आपली वेणू वाजवून मला मोहिनी घातली होती. वेणूंत तो स्वर ओतीत होता तेव्हां त्याचे ओंठ थरथरत होते. त्यांच्यावरील अमृताची गोडी त्या स्वरांवर उधळत होती. चंचल नयनांच्या कोपऱ्यांतून तो माझ्याशीं बोलत होता. मुरलीच्या स्वराच्या तालावर त्याचें मस्तक हलत होतें. कानांत डोलणाऱ्या विलोल कुंडलांमुळें त्याचे गाल सुंदर दिसत होते.

**चन्द्रकचारुमयूरशिखण्डकमण्डलवलयितकेशम् ।**
**प्रचुरपुरन्दरधनुरनुरञ्जितमेदुरमुदिरसुवेशम् ॥ २ ॥**

चन्द्रक-चारु-मयूर-शिखण्डक-मण्डल-वलयित-केशम् ।
प्रचुर-पुरन्दर-धनुः-अनुरञ्जित-मेदुर-मुदिर-सुवेशम् ॥ २ ॥

मोरांच्या सुंदर रंगीबेरंगी पिसांची मुकुटाकार गोल रचना त्यानें त्याच्या केसांभोवतीं केलेली होती. पाण्यानें ओथंबलेला निळा मेघ अनेक इंद्रधनुष्यांनीं एकाच वेळीं वेढला जावा आणि विलोभनीय दिसावा तसा तेव्हां कृष्ण दिसत होता.

**गोपकदम्बनितम्बवतीमुखचुम्बनलम्भितलोभम् ।**
**बन्धुजीवमधुराधरपल्लवमुल्लसितस्मितशोभम् ॥ ३ ॥**

गोप-कदम्ब-नितम्बवती-मुख-चुम्बन-लम्भित-लोभम् ।
बन्धुजीव-मधुर-अधर-पल्लवम्-उल्लसित-स्मित-शोभम् ॥ ३ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
अनुक्रम ५७३८ दि: ...

गोपसमुदायाच्या बिंबवती कांतींचीं चुंबनें घेण्याचें प्रेम त्यांची अभिलाषा उजळली होती. दुपारतीच्या फुलाप्रमाणें लालचुटुक असणाऱ्या त्याच्या अधरोष्ठाच्या सुंदर पाकळीवर स्मितहास्याची शोभा फुलली होती.

**विपुलपुलकभुजपल्लववलयितवल्लवयुवतिसहस्रम् ।**
**करचरणोरसि मणिगणभूषणकिरणविभिन्नतमिस्रम् ॥ ४ ॥**

विपुल-पुलक-भुज-पल्लव-वलयित-वल्लव-युवति-सहस्रम् ।
कर-चरण-उरसि मणि-गण-भूषण-किरण-विभिन्न-तमिस्रम् ॥ ४ ॥

त्याचे हात रोमांचांनीं फुललेले होते. अनेक गोपयुवतींना त्यानें मिठी मारलेली होती. त्याच्या हातांत, पायांत आणि गळ्यांत रत्नांचे अलंकार होते. त्यांतून निघणारे प्रकाशकिरण रात्रीचा अंधार चिरीत होते.

**जलदपटलचलदिन्दुविनिन्दकचन्दनतिलकललाटम् ।**
**पीनपयोधरपरिसरमर्दननिर्दयहृदयकपाटम् ॥ ५ ॥**

जलद-पटल-चलत्-इन्दु-विनिन्दक-चन्दन-तिलक-ललाटम् ।
पीन-पयोधर-परिसर-मर्दन-निर्दय-हृदय-कपाटम् ॥ ५ ॥

मेघांच्या पटलांनी वेष्टिलेला चंद्र सुंदर दिसतो; पण कृष्णाच्या सतेज निळ्या विस्तीर्ण ललाटावरील शुभ्रधवल चंदनाचा गोल टिळा त्या चंद्राहूनहि अधिक सुंदर दिसत होता. उंच स्तनांमुळें शोभणाऱ्या गोपींच्या वक्षांचे तो आपल्या बलाढ्य छातीवर निर्दयपणें मर्दन करीत होता.

**मणिमयमकरमनोहरकुण्डलमण्डितगण्डमुदारम् ।**
**पीतवसनमनुगतमुनिमनुजसुरासुरवरपरिवारम् ॥ ६ ॥**

मणिमय-मकर-मनोहर-कुण्डल-मण्डित-गण्डम् उदारम् ।
पीत-वसनम् अनुगत-मुनि-मनुज-सुर-असुर-वर-परिवारम् ॥ ६ ॥

त्या राजस पुरुषसुंदराचे गाल त्याच्याच कानांतील माशांच्या आकाराच्या सुंदर रत्न-कुंडलांनी सुशोभित झाले होते. ऋषिमुनी, सामान्य माणसे, देव आणि दानव या सर्वांना प्रिय असणाऱ्या कृष्णानें तेव्हां पीतांबर धारण केलेला होता.

**विशदकदम्बतले मिलितं कलिकलुषभयं शमयन्तम् ।**
**मामपि किमपि तरङ्गदनङ्गदृशा मनसा रमयन्तम् ॥ ७ ॥**

विशद्-कदम्ब-तले मिलितम् कलि-कलुष-भयम् शमयन्तम् ।
माम् अपि किम् अपि तरङ्गत्-अनङ्ग-दृशा मनसा रमयन्तम् ॥ ७ ॥

आमच्या नेहमींच्या ठरलेल्या याच विशाल कदंबाच्या छायेंत तो मला भेटला होता. आधीं मीं त्याच्याशीं प्रीतीचा कलह केला होता. त्यामुळें त्याची माझ्याविषयींची ओढ कलुषित झाली असेल अशी भीति मला वाटत होती. आपल्या चतुरमधुर अनुनयानें तो ती भीति नाहींशी करीत होता. ज्यांचें वर्णनही करता येणार नाहीं अशा प्रीतिभरल्या नयनांनीं तो तेव्हां अगदीं मनापासून माझ्याशीं संवाद जुळवीत होता. अजून त्याची मला आठवण होत आहे.

**श्रीजयदेवभणितमतिसुन्दरमोहनमधुरिपुरूपम् ।**
**हरिचरणस्मरणं प्रति संप्रति पुण्यवतामनुरूपम् ॥ ८ ॥**

श्री-जयदेव-भणितम् अतिसुन्दर-मोहन-मधु-रिपु-रूपम् ।
हरि-चरण-स्मरणम् प्रति संप्रति पुण्यवताम् अनुरूपम् ॥ ८ ॥

मधु राक्षसाचा वध करणाऱ्या कृष्णाचें राधेला मोहिनी घालणारें अत्यंत सुंदर रूप जयदेवानें इथें गाइलें आहे. जे पुण्यवान असतील त्यांना कृष्णाच्या चरणांचें स्मरण या कलियुगांतही अनायासें करून देण्यास हें गीत योग्य आहे.

*पांचवी अष्टपदी समाप्त*
*पांचवा प्रबंध समाप्त*

## प्रबंध सहावा

**गणयति गुणग्रामं भामं भ्रमादपि नेहते**
**वहति च परितोषं दोषं विमुञ्चति दूरतः ।**
**युवतिषु चलत्तृष्णे कृष्णे विहारिणि मां विना**
**पुनरपि मनो वामं कामं करोति करोमि किम् ॥ १ ॥**

गणयति गुण-ग्रामम् भामम् भ्रमात् अपि न ईहते
वहति च परितोषम् दोषम् विमुञ्चति दूरतः ॥
युवतिषु चलत्-तृष्णे कृष्णे विहारिणि माम् विना
पुनः अपि मनो वामम् कामम् करोति करोमि किम् ॥ १ ॥

हा कृष्ण मला सोडून विहार करीत असतो. इतर स्त्रियांविषयींची याची अभिलाषा वाढतच आहे. पण माझें मन किती वेडें पाहा. तें कृष्णाचे सौंदर्यादि गुण तेवढेच पाहतें. चंचलतेसारखे त्याचे दोष आहेत त्यांकडे दुरून पाठ फिरवितें. त्याच्याविषयीं सारखी आपुलकी धरतें. स्वप्नांतसुद्धां त्याच्यावर राग करीत नाहीं. वेडें एकांगी प्रेम करणाऱ्या या मनाला मी आतां करूं करी काय? आवरूं तरी तसें?

## अष्टपदी सहावी

राग—मालव : ताल—एकताल :

**सखि हे केशिमथनमुदारं**
**रमय मया सह मदनमनोरथभावितया सविकारम् ॥ ध्रु० ॥**

सखि हे केशि-मथनम् उदारम्
रमय मया सह मदन-मनोरथ-भावितया सविकारम् ॥ ध्रु० ॥

सखी, मी आतां इच्छापूर्तीच्या ओढीनें व्याकुळ झालें आहे. केशी दैत्याचा वध करणारा तो उदार कृष्ण माझ्याशीं प्रीतीचे खेळ खेळेल असें कांहींतरी आतां कर ना! तूं त्याची माझी भेट घडविशील—

**निभृतनिकुञ्जगृहं गतया निशि रहसि निलीय वसन्तम् ।**
**चकितविलोकितसकलदिशा रतिरभसभरेण हसन्तम् ॥ १ ॥**

निभृत-निकुञ्ज-गृहम् गतया निशि रहसि निलीय वसन्तम् ।
चकित-विलोकित-सकल-दिशा रति-रभस-भरेण हसन्तम् ॥ १ ॥

तेव्हां रात्र असेल. तूं सांगितलेल्या आडोशाच्या लताकुंजांत मी गेलेली असेन. मादक वसंत मनाला भूल पाडीत असेल. कृष्ण तिथें येईल. मग मी घाबरल्यासारखें करून चोहींकडे पाहीन. तो प्रीतिभरानें उतावीळ होऊन आमंत्रक स्मितहास्य करील.

**प्रथमसमागमलज्जितया पटुचाटुशतैरनुकूलम् ।**
**मृदुमधुरस्मितभाषितया शिथिलीकृतजघनदुकूलम् ॥ २ ॥**

प्रथम-समागम-लज्जितया पटु-चाटु-शतैः अनुकूलम् ।
मृदु-मधुर-स्मित-भाषितया शिथिलीकृत-जघन-दुकूलम् ॥ २ ॥

जणू पहिलीच भेट आहे अशा तऱ्हेनें मग मी लाजेन आणि तो चातुर्यानें गोड गोड बोलून माझें मन वळवील. मग मी गोड हसून लाडें लाडें बोलेन आणि तो माझ्या उटीपोटावरचें रेशमी वस्त्र हळूच सैल करील.

**किसलयशयननिवेशितया चिरमुरसि ममैव शयानम् ।**
**कृतपरिरम्भणचुम्बनया परिरभ्य कृताधरपानम् ॥ ३ ॥**

किसलय-शयन-निवेशितया चिरम् उरसि मम एव शयानम् ।
कृत-परिरम्भण-चुम्बनया परिरभ्य कृत-अधर-पानम् ॥ ३ ॥

कोवळ्या कोवळ्या पालवीच्या शयनावर मग मी आडवी होईन. माझ्याच छातीवर मग तो झोपेल. मी त्याला मिठी घालीन. त्याचा मुका घेईन. तोहि प्रतिसादानें मला आलिंगन देऊन माझ्या अधराचा आस्वाद घेईल.

**अलसनिमीलितलोचनया पुलकावलिललितकपोलम् ।**
**श्रमजलसिक्तकलेवरया वरमदनमदादतिलोलम् ॥ ४ ॥**

अलस-निमीलित-लोचनया पुलक-आवलि-ललित-कपोलम् ।
श्रम-जल-सिक्त-कलेवरया वर-मदन-मदात् अति लोलम् ॥ ४ ॥

तृप्तीनें आळसावून मग मी डोळे मिटीन. त्याचे गाल सुखाच्या रोमांचांनी फुलतील. माझें अंग अंग घामानें भिजून गेलें असेल आणि प्रीतीचा उन्माद बहरल्यामुळें तो अतिशय सुंदर दिसेल.

**कोकिलकलरवकूजितया जितमनसिजतन्त्रविचारम् ।**
**श्लथकुसुमाकुलकुन्तलया नखलिखितघनस्तनभारम् ॥ ५ ॥**

कोकिल-कल-रव-कूजितया जित-मनसिज-तन्त्र-विचारम् ।
श्लथ-कुसुम-आकुल-कुन्तलया नख-लिखित-घन-स्तन-भारम् ॥ ५ ॥

मी मग कोकिळेसारखी गोड आवाजांत कुजबुजेन. त्यामुळें आपण प्रीतीच्या तंत्रांत यशस्वी झालों असा अभिमान त्याला वाटेल. त्यानें माझ्या विशाल स्तनांवर सगळीकडे नखांच्या खुणा केलेल्या असतील. माझ्या केसांची गांठ सुटलेली असेल. त्यांतील फुलें खालीं ओघळलेलीं असतील.

**चरणरणितमणिनूपुरया परिपूरितसुरतवितानम् ।**
**मुखरविशृङ्खलमेखलया सकचग्रहचुम्बनदानम् ॥ ६ ॥**

चरण-रणित-मणि-नूपुरया परिपूरित-सुरत-वितानम् ।
मुखर-विशृङ्खल-मेखलया स-कच-ग्रह-चुम्बन-दानम् ॥ ६ ॥

त्याची रतिक्रीडा आनंदाच्या उंचीवर आरूढ होईल; आनंदाचें आकाश भरून टाकील. माझ्या पायांतील नूपुरांत लोंबणारीं रत्नें आनंदाचें गीत गातील. मग एकतेच्या धुंदींत मी पुरुषाची भूमिका घेईन तेव्हां नूपुरांचा आवाज थांबेल आणि माझ्या कटीवरील मेखला रुणझुणूं लागेल. संभ्रमाच्या भरांत ती तुटून सांडेल आणि माझे केंस पकडून तो माझें मुख खालीं ओढील आणि मला चुंबन देईल.

**रतिसुखसमयरसालसया दरमुकुलितनयनसरोजम् ।**
**निःसहनिपतिततनुलतया मधुसूदनमुदितमनोजम् ॥ ७ ॥**

रति-सुख-समय-रस-अलसया दर-मुकुलित-नयन-सरोजम् ।
निःसह-निपतित-तनु-लतया मधुसूदनम् उदित-मनोजम् ॥ ७ ॥

सुखाच्या उत्कटतेचा क्षण आल्यामुळें मग मी जडावून जाईन. तो आनंदानें आपलीं नयनकमलें अर्धवट मिटील. न सोसावें इतकें अनावर सुख झाल्यानें मी मूर्च्छना आल्यासारखी शयनावर कोसळेन आणि माझी ती अवस्था पाहून त्याच्या मनांत पुन्हा पहिल्यापासून वासनेचा उदय झालेला असेल. प्रेमाचे असे खेळ आमच्यांत होतील असा योग तूं जुळवून आण ना !

**श्रीजयदेवभणितमिदमतिशयमधुरिपुनिधुवनशीलम् ।**
**सुखमुत्कण्ठितराधिकया कथितं वितनोतु सलीलम् ॥ ८ ॥**

श्री-जयदेव-भणितम् इदम् अतिशय-मधु-रिपु-निधुवन-शीलम् ।
सुखम् उत्कण्ठित-राधिकया कथितम् वितनोतु सलिलम् ॥ ८ ॥

रतिसुखासाठीं उत्कंठित झालेल्या राधेनें रतिक्रीडा करण्याच्या कृष्णाच्या रीतीचें वर्णन इथें केलेलें आहे. जयदेवानें त्या प्रीतीच्या रीतीचें गाइलेलें हें गीत रसिकांचें कल्याण करो. त्यांना आनंद देवो.

*सहावी अष्टपदी समाप्त*

**हस्तस्रस्तविलासवंशमनृजुभ्रूवल्लिमद्बल्लवी-**
**वृन्दोत्सारिदृगन्तवीक्षितमतिस्वेदार्द्रगण्डस्थलम् ॥**
**मामुद्वीक्ष्य विलज्जितं स्मितसुधामुग्धाननं कानने**
**गोविन्दं व्रजसुन्दरीगणवृतं पश्यामि हृष्यामि च ॥ २ ॥**

हस्त-स्रस्त-विलास-वंशम् अनृजु-भ्रू-वल्लिमत्-बल्लवी-
वृन्द-उत्सारि दृक्-अन्त-वीक्षितम् अति-स्वेद-आर्द्र-गण्ड-स्थलम् ।
माम् उद्वीक्ष्य विलज्जितम् स्मित-सुधा-मुग्ध-आननम् कानने
गोविन्दम् व्रज-सुन्दरी-गण-वृतम् पश्यामि हृष्यामि च ॥ २ ॥

सखे, सुंदर गोपी या वेळी त्याच्याबरोबर आहेत. तो फिरत फिरत इथें येईल. गोपींशीं परिहास करतांना पुराव्यासह पकडला गेल्यामुळें तो गोंधळेल. त्याच्या हातांतील वेणू गळून पडेल. गोपी वांकड्या डोळ्यांनी त्याच्याकडे कटाक्ष टाकतील. तो डोळे वटारून त्यांना दूर करील. माझ्या भीतीने त्याच्या कपाळावर दरदरून घाम सुटेल. चोरी करतांना पकडला गेल्यामुळें तो लाजेल. समेट करण्यासाटीं म्हणून तो गोड हसेल. त्या हसण्याने तो चांदण्यांत न्हाल्यासारखा शोभून दिसेल. आणि त्याचें तसें दर्शन झालें म्हणजे मीही मोहून जाईन.

**दुरालोकः स्तोकस्तबकनविकाशोकलतिका-**
**विकासः कासारोपवनपवनोऽपि व्यथयति ।**

**अपि भ्राम्यद्भृङ्गीरणितरमणीया न मुकुल-**
**प्रसूतिश्चूतानां सखि शिखरिणीयं सुखयति ॥ ३ ॥**

दुरालोकः स्तोक-स्तबक-नविका-अशोक-लतिका-
विकासः कासार-उपवन-पवनः अपि व्यथयति ॥
अपि भ्राम्यत्-भृङ्गी-रणित-रमणीया न मुकुल-
प्रसूतिः चूतानाम् सखि शिखरिणी इयम् सुखयति ॥ ३ ॥

सखे, वाऱ्यावर हेलावणाऱ्या या अशोकाच्या डहाळीवर कोवळ्या फुलांचा गुच्छ झुलत आहे. त्याकडे मला पाहवत नाहीं. जलाशयावरून थंडगार वायुलहरी येत आहेत. त्याहि मला तापदायक होत आहेत. आंब्याच्या डहाळीच्या शिखराशिखरावर मोहोराच्या कळ्या उमलल्या आहेत. त्यांवर गुंजारव करीत भुंगे इकडून तिकडे हिंडत आहेत. त्यांचेंहि दर्शन मला कृष्ण जवळ नसल्यानें सुखदायक होत नाहीं.

**साकूतस्मितमाकुलाकुलगलद्धम्मिल्लमुल्लासित-**
**भ्रूवल्लीकमलीकदर्शितभुजामूलोर्ध्वहस्तस्तनम् ।**
**गोपीनां निभृतं निरीक्ष्य ललितां काञ्चिच्चिरं चिन्तय-**
**न्नन्तर्मुग्धमनोहरं हरतु वः क्लेशं नवः केशवः ॥ ४ ॥**

स-आकूत-स्मितम् आकुल-आकुल-गलत्-धम्मिल्लम् उल्लासित
भ्रू-वल्लीकम् अलीक-दर्शित-भुजा-मूल-ऊर्ध्व-हस्त-स्तनम् ॥
गोपीनाम् निभृतम् निरीक्ष्य ललिताम् कां चित् चिरम् चिन्तयन् ।
अन्तः-मुग्ध-मनोहरम् हरतु वः क्लेशम् नवः केशवः ॥ ४ ॥

( या श्लोकांत सर्गाच्या शेवटींचा आशीर्वाद कवि देत आहे, )

साऱ्या गोपी अभिलाषेनें फुललेल्या नयनांनीं कृष्णाकडे पाहात आहेत. उल्लसित झालेल्या डोळ्यांनीं त्या कृष्णाशीं प्रीतीचे बोल बोलत आहेत. व्याकुळ प्रणयाचा आस्वाद घेतांना त्यांच्या वेण्या विस्कटत आहेत आणि त्यांतील हार तुटून फुलें ओघळत आहेत. केस सांवरण्यासाठी त्यांनीं हात वर केले आहेत. जणू आपल्या काखा आणि स्तन किंचित् दिसून कृष्णाला भूल पडावी म्हणून त्या मुद्दामच असे करीत आहेत. नवशिक्या प्रेमिकाला मोह

पाडणाऱ्या या गोष्टी एकांतांत पाहूनही कृष्णाचें मन चळत नाही. हें पाहूनहि तो एकनिष्ठपणें ललितसुंदरा अशा राधेचेंच सतत चिंतन करीत आहे. जणू आताच नवा सहवास घडत आहे असें भासविणारी मोहिनी या कृष्णाच्या सहवासांत आहे. हा कृष्ण आपलें कल्याण करो.

*सहावा प्रबंध समाप्त*
*दुसरा सर्ग समाप्त*

# सर्ग तिसरा : मुग्ध मधुसूदन

## प्रबंध सातवा

**कंसारिरपि संसारवासनाबद्धशृङ्खलाम् ।**
**राधामाधाय हृदये तत्याज व्रजसुन्दरीः ॥ १ ॥**

कंस-अरिः अपि संसार-वासना-बद्ध-शृङ्खलाम् ।
राधाम् आधाय हृदये तत्याज व्रज-सुन्दरीः ॥ १ ॥

लोखंडाच्या सांखळीनें अतूट बांधलें असावें तसें कृष्णाचें मनसुद्धां जीवनांतील आनंदाच्या प्रगाढ ओढीनें राधेशीं बांधलेलें होतें. त्याला राधेची आठवण होतांच त्यानें इतर सुंदर गोपींचा त्याग केला.

**इतस्ततस्तामनुसृत्य राधिका-**
**मनङ्गबाणव्रणखिन्नमानसः ।**
**कृतानुतापः स कलिन्दनन्दिनी-**
**तटान्तकुञ्जे निषसाद माधवः ॥ २ ॥**

इतस्ततः ताम् अनुसृत्य राधिकाम्
अनङ्ग-बाण-व्रण-खिन्न-मानसः ।
कृत-अनुतापः स कलिन्द-नन्दिनी
-तट-अन्त-कुञ्जे निषसाद माधवः ॥ २ ॥

राधेची उपेक्षा केल्याचा त्याला पश्चात्ताप झाला. मदनाच्या बाणाची जखम त्याच्या हृदयांत सलूं लागली. राधेला शोधत यमुनेच्या तीरावरील कुंजांतून तो इतस्ततः फिरूं लागला. ती कुठेंही दिसेना म्हणून तो अतिशय व्यथित झाला. तो शोक करूं लागला.

## अष्टपदी सातवी

राग–गुर्जरी : ताल–प्रतिमंठ

**हरिहरि हतादरतया गता सा कुपितेव ॥ ध्रु० ॥**

हरि हरि हत-आदरतया गता सा पिता इव ॥ ध्रु० ॥

—हाय हाय ! मीं तिचा योग्य मान ठेवला नाहीं म्हणून ती रागावली आणि तशीच निघून गेली.

**मामियं चलिता विलोक्य वृतं वधूनिचयेन ।**
**सापराधतया मयापि न वारिताऽतिभयेन ॥ १ ॥**

माम् इयं चलिता विलोक्य वृतम् वधू-निचयेन ।
स-अपराधतया मया अपि न वारिता अति-भयेन ॥ १ ॥

गोपींचा मेळा माझ्याभोंवतीं जमलेला तिनें पाहिला आणि ती निघून गेली. अपराध माझाच होता. त्यामुळें मला अतिशय भीती वाटली आणि मीं तिला अडविलें नाहीं.

**किं करिष्यति किं वदिष्यति सा चिरं विरहेण ।**
**किं जनेन धनेन किं मम जीवितेन गृहेण ॥ २ ॥**

किम् करिष्यति किम् वदिष्यति सा चिरम् विरहेण ।
किम् जनेन धनेन किम् मम जीवितेन गृहेण ॥ २ ॥

ती विरहानें व्याकुळ झाली असेल. आपल्या मनाचें सान्त्वन ती कसें करीत असेल ? माझ्याविषयीं आपल्या सख्यांकडे ती काय बोलत असेल ? राधाच रागावली तर माझें धन, माझा परिवार, माझें घर, किंबहुना माझें जीवित यांचा मला काय उपयोग आहे ?

**चिन्तयामि तदाननं कुटिलभ्रु रोषभरेण ।**
**शोणपद्ममिवोपरि भ्रमताकुलं भ्रमरेण ॥ ३ ॥**

चिन्तयामि तद् आननम् कुटिल-भ्रु रोष-भरेण ।
शोण-पद्मम् इव उपरि भ्रमता आकुलम् भ्रमरेण ॥ ३ ॥

संतापामुळ रक्तकमलाप्रमाणें लालभडक झालेलें तिचें वदन मला इथें दिसत आहे. रागानें खालींवर होऊन थरथरणाऱ्या तिच्या भुंवया मला इथें जाणवत आहेत. दुष्ट भ्रमर कमलाला छळत असावा तसें या भुंवयांचें नर्तन तिच्या वदनाला शिणवीत आहे.

**तामहं हृदि संगतामनिशं भृशं रमयामि ।**
**किं वनेऽनुसरामि तामिह किं वृथा विलपामि ॥ ४ ॥**

ताम् अहम् हृदि संगताम् अनिशम् भृशम् रमयामि ।
किम् वने अनुसरामि ताम् इह किम् वृथा विलपामि ॥ ४ ॥

इथें नुसता विलाप करून काय लाभ आहे ? माझ्या जिवाची सखी ती लाडकी जिकडे गेली तिकडे मी आतां तिच्यामागून जाणार आहें. यापुढें केवळ तिच्याच सहवासांत मी मनमानेसा विलास करणार आहें.

**तन्वि खिन्नमसूयया हृदयं तवाकलयामि ।**
**तन्न वेद्मि कुतो गतासि न तेन तेऽनुनयामि ॥ ५ ॥**

तन्वि खिन्नम् असूयया हृदयम् तव आकलयामि ।
तत् न वेद्मि कुतः गता असि न तेन ते अनुनयामि ॥ ५ ॥

लाडके, मत्सरामुळें तुझें अंतःकरण खिन्न झालें आहे हें मला कळतें; पण तूं गेली आहेस तरी कुठें ? तें कळल्याशिवाय मी तुझ्याजवळ येऊं तरी कसा ? तुझा अनुनय करूं तरी कसा ?

**दृश्यसे पुरतो गतागतमेव मे विदधासि ।**
**किं पुरेव ससंभ्रमं परिरम्भणं न ददासि ॥ ६ ॥**

दृश्यसे पुरतः गत-आगतम् एव मे विदधासि ।
किम् पुरा इव स-सम्भ्रमम् परिरम्भणम् न ददासि ॥ ६ ॥

सखे, तूं ही इथें, ती तिथें अशी मला सारखी दिसत आहेस. आणि जवळ जावें तर तो आभास ठरत आहे. तूं कुठें लपली आहेस ती माझ्यासमोर प्रकट कां होत नाहींस मला अंतरींच्या अनावर ओढीनें आपल्या मिठींत कां बरें घेत नाहींस ?

**क्षम्यतामपरं कदापि तवेदृशं न करोमि ।**
**देहि सुन्दरि दर्शनं मम मन्मथेन दुनोमि ॥ ७॥**

क्षम्यताम् अपरम् कदापि तव ईदृशम् न करोमि ।
देहि सुन्दरि दर्शनम् मम मन्मथेन दुनोमि ॥ ७॥

सुंदरी, क्षमा कर. मला क्षमा कर. मी पुन्हा म्हणून तुझा असा अपराध कधीं करणार नाहीं. मला आतां दर्शन दे ना! मी तुझ्या असह्य विरहानें जळत आहें.

**वर्णितं जयदेवकेन हरेरिदं प्रणतेन ।**
**किन्दुबिल्वसमुद्रसम्भवरोहिणीरमणेन ॥ ८॥**

वर्णितम् जयदेवकेन हरेः इदम् प्रणतेन ।
किन्दुबिल्व-समुद्र-सम्भव-रोहिणी-रमणेन ॥ ८ ॥

श्रीकृष्णाच्या चरणीं शरण असणाऱ्या जयदेव कवीनें हें गीत गाइलें आहे. रोहिणीचा लाडका चंद्र जसा समुद्रांतून उदय पावला तसा पद्मावतीचा लाडका जयदेव किंदुबिल्व या विशाल गांवांत जन्माला आला आहे.

*सातवी अष्टपदी समाप्त*

**हृदि बिसलताहारो नायं भुजङ्गमनायकः**
**कुवलयदलश्रेणी कण्ठे न सा गरलद्युतिः ।**
**मलयजरजो नेदं भस्म प्रियारहिते मयि**
**प्रहर न हरभ्रान्त्यानङ्ग क्रुधा किमु धावसि ॥ ३ ॥**

हृदि बिसलता-हारः न अयम् भुजङ्गम-नायकः ।
कुवलय-दल-श्रेणी कण्ठे न सा गरल-द्युतिः ॥
मलयज-रजः न इदम् भस्म प्रिया-रहिते मयि
प्रहर न हर-भ्रान्त्या अनङ्ग क्रुधा किमु धावसि ॥ ३ ॥

हे मदना, प्रिया दूर असल्यामुळें आधींच मी हतबल झालों आहें. तुझ्यासारख्या वीरानें संग्राम समबलाशीं करावा. माझ्यासारख्या विकल जीवावर तूं कां आक्रमण करतोस? वेड्या,

तुला मी शंकर आहें असें वाटलें काय ? अरे, मी कृष्ण आहें. माझ्या गळ्यांत आहे तो कमलांच्या देठांचा हार. सर्पांच्या राजाच्या वेढा नव्हे. माझ्या कंठावर आहे तो निळ्या कमळाच्या पाकळ्यांचा लेप. तो काही हलाहल विषाचा डाग नव्हे. माझ्या सर्वांगीं तुला दिसतो तो चंदनाचा लेप आहे. चिताभस्माचा नव्हे. मग तूं मला शंकर समजून उगाच माझ्याशीं वैर कां करीत आहेस ?

**पाणौ मा कुरु चूतसायकममुं मा चापमारोपय**
**क्रीडानिर्जितविश्वमूर्च्छितजनाघातेन किं पौरुषम् ।**
**तस्या एव मृगीदृशो मनसिजप्रेङ्खत्कटाक्षाशुग-**
**श्रेणीजर्जरितं मनागपि मनो नाद्यापि सन्धुक्षते ॥ ४ ॥**

पाणौ मा कुरु चूत-सायकम् अमुम् मा चापम् आरोपय
क्रीडा-निर्जित-विश्व-मूर्च्छित-जन-आघातेन किम् पौरुषम् ॥
तस्याः एव मृगी-दृशः मनसिज-प्रेङ्खत्-कटाक्ष-आशुग-
श्रेणी-जर्जरितम् मनाग् अपि मनः न अद्य अपि सन्धुक्षते ॥ ४ ॥

हे मदना, तूं मनांत जन्म घेतोस. मग मनालाच छळणें तुला शोभतें का ? आम्र-मंजिरीचा तो बाण तूं हातांत घेऊं नकोस. घेतलास तरी माझ्यावर मारण्यासाठीं तो धनुष्यावर चढवूं नकोस. चालतां चालतां सहज विश्व जिंकणारा महावीर तूं. आधींच मूर्च्छित पडलेल्या माझ्यासारख्यावर प्रहार करण्यांत तुला काय मोठेपणा आहे ? अरे, राधेच्या हरिणीच्या डोळ्यां-सारख्या डोळ्यांतून सुटलेली कटाक्षबाणांची जी मालिका माझ्यावर कोसळली आहे तिनें माझें मन कधींच जर्जर झालें आहे. तें अजून मुळींच सांवरलेलें नाहीं.

**भ्रूपल्लवं धनुरपाङ्गतरङ्गितानि**
**बाणा गुणः श्रवणपालिरिति स्मरेण ।**
**तस्यामनङ्गजयजङ्गमदेवताया-**
**मस्त्राणि निर्जितजगन्ति किमर्पितानि ॥ ५ ॥**

भ्रू-पल्लवम् धनुः अपाङ्ग-तरङ्गितानि
बाणाः गुणः श्रवण-पालिः इति स्मरेण ॥
तस्याम् अनङ्ग-जय-जङ्गम-देवतायाम्
अस्त्राणि निर्जित-जगन्ति किम् अर्पितानि ॥ ५ ॥

राधेच्या भुवया धनुष्यासारख्या गोल आहेत. तिचे कटाक्ष बाणांप्रमाणें हृदयांत शिरणारे आहेत. तिच्या कानांचीं पाळीं धनुष्याच्या दोरीप्रमाणें आहे. मदनानें आपलीं जग जिंकणारीं सारीं अस्त्रें जणू काय या चालत्याबोलत्या प्रेमदेवतेलाच समर्पण केलीं आहेत.

**भ्रूचापे निहितः कटाक्षविशिखो निर्मातु मर्मव्यथां**
**श्यामात्मा कुटिलः करोतु कबरीभारोऽपि मारोद्यमम् ।**
**मोहं तावदयं च तन्वि तनुतां बिम्बाधरो रागवान्**
**सद्वृत्तः स्तनमण्डलस्तव कथं प्राणैर्मम क्रीडति ॥ ६ ॥**

भ्रू-चापे निहितः कटाक्ष-विशिखः निर्मातु मर्म-व्यथाम्
श्याम-आत्मा कुटिलः करोतु कबरी-भारः अपि मार-उद्यमम् ॥
मोहं तावत् अयम् च तन्वि तनुताम् बिम्ब-अधरः रागवान्
सद्वृत्तः स्तन-मण्डलः तव कथम् प्राणैः मम क्रीडति ॥ ६ ॥

राधे, तुझ्या नयनांच्या धनुष्यांवरून सुटणारे कटाक्षांचे बाण माझ्या मर्मावर आघात करीत आहेत. करोत. बाणच ते. ते दुसरें काय करणार? हा तुझा निळसर कुरळा केशकलाप माझी विषयवासना चेतवीत आहे. चेतवो. कारण जो स्वतःच कुटिल ( कुरळा ) आहे, तो वासनाच चेतविणार. हा तुझा लाल लाल अधरोष्ठ माझ्या मनांत मोह उत्पन्न करीत आहे. करो. जो स्वतःच मोहक आहे तो दुसऱ्यांना मोह पाडावयाचाच. परंतु रेखीव वर्तुळांत विकसलेलें हें तुझें स्तनमंडळ माझ्या प्राणांशीं खेळ खेळत आहे. त्याचें मात्र मला नवल वाटतें. कारण नियमांनीं रेखिलेल्या रिंगणांत जीवनविकास करणारे लोक सज्जन असतात. ते दुसऱ्यांच्या प्राणांशीं खेळत नाहींत.

**तानि स्पर्शसुखानि ते च तरलाः स्निग्धा दृशोर्विभ्रमा-**
**स्तद्वक्त्राम्बुजसौरभं स च सुधास्यन्दी गिरां वक्रिमा ।**
**सा बिम्बाधरमाधुरीति विषयासङ्गेऽपि मन्मानसं**
**तस्यां लग्नसमाधि हन्त विरहव्याधिः कथं वर्धते ॥ ७ ॥**

तानि स्पर्श-सुखानि ते च तरलाः स्निग्धाः दृशोः विभ्रमाः
तत् वक्त्र-अंबुज-सौरभम् स च सुधा-स्यन्दी गिराम् वक्रिमा
सा बिम्ब-अधर-माधुरी इति विषय-आसङ्गे अपि मत्-मानसम्
तस्याम् लग्न-समाधि हन्त विरह-व्याधिः कथम् वर्धते ॥ ७ ॥

मनोमन माझें सर्वांग राधेच्या स्पर्शाचें तेंच सुख अनुभवीत आहे. माझे डोळे तिच्या प्रेमभऱ्या तरल नयनांचे तेच विभ्रम पाहात आहेत. माझें नाक तिच्या मुखकमलाचा तोच सुगंध घेत आहे. माझे कान तिच्या सुधामधुर अशा वाणीची तीच वक्रोक्ति ऐकत आहेत. माझी जीभ तिच्या बिंबाधराची तीच माधुरी सेवन करीत आहे. मनोमन माझी तिच्या ठायीं समाधि लागलेली आहे. समाधीमधें कसल्याहि जाणिवा नसाव्या. मग माझी समाधि लागली असूनहि मला या माझ्या विरहाच्या व्यथा कां बरें जाणवत आहेत ?

**तिर्यक्कण्ठविलोलमौलितरलोत्तंसस्य वंशोच्चरद्-**
**दीप्तिस्थानकृतावधानललनालक्षैर्न संलक्षिताः ॥**
**संमुग्धे मधुसूदनस्य मधुरे राधामुखेन्दौ सुधा-**
**सारे कन्दलिताश्चिरं ददतु वः क्षेमं कटाक्षोर्मयः ॥ ८ ॥**

तिर्यक्-कण्ठ-विलोल-मौलि-तरल-उत्तंसस्य वंश-उच्चरत्
दीप्ति-स्थान-कृत-अवधान-ललना-लक्षैः न संलक्षिताः ।
संमुग्धे मधुसूदनस्य मधुरे राधा मुख-इन्दौ सुधा-
सारे कन्दलिताः चिरम् ददतु वः क्षेमम् कटाक्ष-ऊर्मयः ॥ ८ ॥

( या श्लोकांत सर्गान्तींची प्रार्थना आहे. )

कृष्ण मुरली वाजवीत आहे. त्याची मान किंचित् वाकलेली आहे. त्याचा किरीट किंचित् कललेला आहे. त्याच्या कानांतील कुंडलें डुलत आहेत. त्याच्या भोंवतीं अनेक गोपी आहेत. पण त्या गोपींचें चित्त वेणूच्या वादनांतील रसाळ तेजोगर्भतेकडे एकाग्र झालें आहे. कृष्ण काय करीत आहे इकडे त्यांचें अवधान नाहीं. अशी संधि साधून तो कृष्ण राधेच्या सुधासागरासारख्या मधुरदर्शी अशा मुग्ध वदनचंद्राकडे एकटक पाहात आहे. या त्याच्या एकटक दृष्टीचे कटाक्ष आपलें कल्याण करोत.

*सातवा प्रबंध समाप्त*
*सर्ग तिसरा समाप्त*

# सर्ग चवथा : स्निग्ध मधुसूदन

## प्रबंध आठवा

**यमुनातीरवानीरनिकुञ्जे मन्दमास्थितम् ।**
**प्राह प्रेमभरोद्भ्रान्तं माधवं राधिकासखी ॥ १ ॥**

यमुना-तीर-वानीर-निकुञ्जे मन्दम् आस्थितम् ।
प्राह प्रेम-भर-उद्भ्रान्तम् माधवम् राधिका-सखी ॥ १ ॥

राधेविषयींची ओढ कृष्णाला अनावर झाली. ती जवळ नसल्यानें तो अतिशय निरुत्साही झाला. यमुनातीरावरील वेतांच्या कुंजांत तो मलूल बसून राहिला. अशा वेळीं त्याच्या जवळ येऊन राधेची सखी त्याला म्हणाली,

## अष्टपदी आठवी

राग – कर्नाटकी; ताल – एकताल.

**सा विरहे तव दीना**
**माधव मनसिजविशिखभयादिव भावनया त्वयि लीना ॥ ध्रु० ॥**

सा विरहे तव दीना
माधव मनसिज-विशिख-भयात् इव भावनया त्वयि लीना ॥ ध्रु० ॥

माधवा, राधा तुझ्या विरहामुळें अगदीं बापुडी झाली आहे. मदनाच्या बाणांनीं ती जणू काय भ्याली आहे आणि तुला शरण आली आहे.

**निन्दति चन्दनमिन्दुकिरणमनुविन्दति खेदमधीरम् ।**
**व्यालनिलयमिलनेन गरलमिव कलयति मलयसमीरम् ॥ १ ॥**

निन्दति चन्दनम् इन्दुकिरणम् अनुविन्दति खेदम् अधीरम् ।
व्याल-निलय-मिलनेन गरलम् इव कलयति मलय-समीरम् ॥ १ ॥

तूं जवळ नाहींस म्हणून तिला चंदनाचा स्पर्शहि रुचत नाहीं. चंद्राचे किरण तिला अतिशय दुःख देत आहेत. मलयपर्वतावरून वाहणाऱ्या सुखकर वायुलहरींचा स्पर्शहि तिला कष्ट देत आहे. जणू काय त्या वायुलहरी मलयपर्वतावर राहणाऱ्या महानागांच्या बिळांतून हिंडून आल्यामुळे विषमयच झाल्या आहेत असें तिला वाटत आहे.

**अविरलनिपतितमदनशरादिव भवदवनायविशालम् ।**
**स्वहृदयमर्मणि वर्म करोति सजलनलिनीदलजालम् ॥ २ ॥**

अविरल-निपतित-मदन-शरात् इव भवत्-अवनाय-विशालम् ।
स्व-हृदय-मर्मणि वर्म करोति स-जल-नलिनी-दल-जालम् ॥ २ ॥

कृष्णा, तिच्या हृदयांत तूं भरून राहिला आहेस. आतां त्या हृदयावर मदनशरांचा सतत वर्षाव होत आहे. ते बाण तिच्या हृदयांत शिरतील आणि तुला व्रण करतील म्हणून तुझें संरक्षण करण्यासाठीं तिनें कमलिनींच्या ओल्या पानांचा संरक्षक कोट आपल्या हृदयाच्या विशाल दुर्गावर रचिलेला आहे.

**कुसुमविशिखशरतल्पमनल्पविलासकलाकमनीयम् ।**
**व्रतमिव तव परिरम्भसुखाय करोति कुसुमशयनीयम् ॥ ३ ॥**

कुसुम-विशिख-शर-तल्पम् अनल्प-विलास-कला-कमनीयम् ।
व्रतम् इव तव परिरम्भ-सुखाय करोति कुसुम-शयनीयम् ॥ ३ ॥

जिच्यावर नाना तऱ्हेचे कामविलास करतां येतील अशी रमणीय पुष्पशय्या तिनें रचिली आहे. पुष्पबाण मदनाच्या शरांप्रमाणें ती शय्या तिला आतां दुःख देत आहे. पण तूं अचानक आलास तर शय्येवांचून अडूं नये या हेतूनें तुझ्या सहवाससुखासाठीं करावयाची तपश्चर्याच म्हणून ती तें दुःख सोशीत आहे.

**वहति च चलितविलोचनजलधरमाननकमलमुदारम् ।**
**विधुमिव विकटविधुन्तुददन्तदलनगलितामृतधारम् ॥ ४ ॥**

वहति च चलित-विलोचन-जलधरम् आनन-कमलम् उदारम् ।
विधुम् इव विकट-विधुंतुद-दन्त-दलन-गलित-अमृत-धारम् ॥ ४ ॥

अश्रूंनीं डबडबल्यामुळें तिचे विशाल, चंचल, निळे डोळे जलभरल्या निळ्या मेघांप्रमाणें दिसत आहेत. तिच्या सुंदर वदनकमलावर या नेत्रांतील दुःखाची छायाच पसरली आहे. मधेंच तिच्या गालांवरून खळकन अश्रुधारा वाहतात, तेव्हां वाटत आहे कीं, शोकरूपी राहूच्या कराल दाढा तिच्या वदनचंद्राला ग्रासीत आहेत, तेव्हां त्या चंद्रांतून अमृताची धाराच ओघळत आहे.

**विलिखति रहसि कुरङ्गमदेन भवन्तमसमशरभूतम् ।
प्रणमति मकरमधो विनिधाय करे च शरं नवचूतम् ॥ ५ ॥**

विलिखति रहसि कुरङ्ग-मदेन भवन्तम् असम-शर-भूतम् ।
प्रणमति मकरम् अधः विनिधाय करे च शरम् नव-चूतम् ॥ ५ ॥

एकान्तांत ती तुझें स्मरण करीत आहे. आकर्षण, वशीकरण, उन्मादन, द्रावण आणि शोषण अशा पांच पायऱ्यांनीं तूं तिचें रतिसुख पुरवितोस. म्हणून सूर्यकमल, अशोक, आम्र-मंजिरी, मोगरा आणि नीलकमल या पांच पुष्पबाणांनीं हृदयाचा वेध घेणाऱ्या मदनाच्या रूपांत तूं तिला दिसत आहेस. कस्तुरीनें ती तुझें चित्र रेखाटीत आहे. तेव्हां मदनाच्या वेषांतच ती तुला रंगवीत आहे. तुझ्या हातांत ती आम्रमंजरीचा शर देत आहे; तुझ्या आसनाखालीं मगराचें चित्र रंगवीत आहे आणि तुला वंदन करीत आहे.

**प्रतिपदमिदमपि निगदति माधव तव चरणे पतिताहम् ।
त्वयि विमुखे मयि सपदि सुधानिधिरपि तनुते तनुदाहम् ॥ ६ ॥**

प्रतिपदम् इदम् अपि निगदति माधव तव चरणे पतिता अहम् ।
त्वयि विमुखे मयि सपदि सुधा-निधिः अपि तनुते तनु-दाहम् ॥ ६ ॥

'हे माधवा, मी तुला शरण आहें रे! तुझ्या सहवासांत अमृतासारखें सुखद वाटणारें हें चांदणंसुद्धां तूं जवळ नसल्यानें अधिकाधिक दाहक होत आहे.' अशी तुझी प्रार्थना ती पावलोपावलीं करीत आहे.

**ध्यानलयेन पुरः परिकल्प्य भवन्तमतीव दुरापम् ।**
**विलपति हसति विषीदति रोदिति चञ्चति मुञ्चति तापम् ॥ ७ ॥**

ध्यान-लयेन पुरः परिकल्प्य भवन्तम् अतीव दुरापम् ।
विलपति हसति विषीदति रोदिति चञ्चति मुञ्चति तापम् ॥ ७ ॥

तिच्या चिंतनाची लय तुझ्यांत लागली आहे. प्रत्यक्षांत तुझी भेट होणें या वेळीं दुष्प्राप्य वाटत असल्यानें तिनें तुझी मानसमूर्ति पुढें उभी केली आहे. मधेंच ती त्या तुझ्या मूर्तीला ' जा. जिच्याकडे इतका वेळ बसला होतास तिच्याकडेच जा. मला तोंड दाखवूं नकोस ! ' असें म्हणून रडत आहे. मग कदाचित् तूं खरेंच दूर जाशील अशा भीतीनें तुझा अनुनय करण्यासाठीं लाडें लाडें हसत आहे. तरीहि तूं प्रसन्न होत नाहींस म्हणून दुःखी होत आहे. आतां तुझें प्रेमच आटलें म्हणून रडत आहे. निदान ती दूर गेल्यावर तरी तुला तिची किंमत कळेल अशा भ्रमानें ती तुझ्या मानसमूर्तीपासून दूर जात आहे. आणि मधेंच तुझ्या काल्पनिक मिठींत शिरून सारे कष्ट विसरत आहे.

**श्रीजयदेवभणितमिदमधिकं यदि मनसा नटनीयम् ।**
**हरिविरहाकुलबल्लवयुवतिसखीवचनं पठनीयम् ॥ ८ ॥**

श्री-जयदेव-भणितम् इदम् अधिकम् यदि मनसा नटनीयम् ।
हरि-विरह-आकुल बल्लव-युवति सखी-वचनम् पठनीयम् ॥ ८ ॥

जयदेवकवीच्या या सुमधुर काव्याचा अधिकाधिक आस्वाद मनोमन घ्यावा अशी इच्छा असेल तर कृष्णाच्या विरहानें व्याकुळ झालेल्या राधेच्या सखीचें हें भाषण पुन्हांपुन्हां वाचावयास हवें.

*आठवी अष्टपदी समाप्त*

**आवासो विपिनायते प्रियसखीमालापि जालायते**
**तापोऽपि श्वसितेन दावदहनज्वाला कलापायते ।**
**सापि त्वद्विरहेण हन्त हरिणीरूपायते हा कथं**
**कन्दर्पोऽपि यमायते विरचयञ्छार्दूलविक्रीडितम् ॥ २ ॥**

आवासः विपिनायते प्रिय-सखी-माला अपि जालायते
तापः अपि श्वसितेन दाव-दहन-ज्वाला-कलापायते ।
सा अपि त्वत्-विरहेण हन्त हरिणी-रूपायते हा कथम्
कन्दर्पः अपि यमायते विरचयन् शार्दूल-विक्रीडितम् ॥ २ ॥

कृष्णा, तूं जवळ नाहींस म्हणून तिला तिचें घर अरण्यासारखें वाटत आहे. लाडक्या मैत्रिणींचा सहवास अडचणीसारखा वाटत आहे. तिच्या श्वासांतून वणव्यांतील आगीसारखी धग बाहेर पडत आहे. तुझ्या विरहामुळें ती एखाद्या हरिणीसारखी दीनबापुडी झाली आहे आणि अरेरे! मदनसुद्धां एखाद्या क्रूर वाघासारख्या हालचाली करून यमाप्रमाणें तिचा घास घ्यावयास सिद्ध झाला आहे.

*आठवा प्रबंध समाप्त*

## प्रबंध नववा

### अष्टपदी नववी

राग–देशांक : ताल–एकताल

**राधिका विरहे तव केशव ॥ ध्रु० ॥**

केशवा, राधा तुझ्या विरहानें ( व्याकुळ झाली आहे. )

**स्तनविनिहितमपि हारमुदारम् ।**
**सा मनुते कृशतनुरिव भारम् ॥ १ ॥**

स्तन-विनिहितम् अपि हारम् उदारम्
सा मनुते कृशतनुः इव भारम् ॥ १ ॥

तापलेल्या हृदयाला शीतलता आणण्यासाठीं तिच्या सख्यांनीं तिच्या स्तनांवर पुष्पहार घातलेला आहे. पण त्या शेलाटीला त्या हाराचाच भार वाटत आहे.

**सरसमसृणमपि मलयजपङ्कम् ।**
**पश्यति विषमिव वपुषि सशङ्कम् ॥ २ ॥**

सरस-मसृणम् अपि मलयज-पङ्कम् ।
पश्यति विषम् इव वपुषि स-शङ्कम् ॥ २ ॥

हलक्या हातांनीं उगाळलेल्या चंदनाचा नितळ ओला लेप तिच्या सख्यांनीं तिच्या शरीराला लाविला आहे; पण तोहि तिला जाळीत आहे म्हणून तो विषाचा लेप असावा अशी शंका तिला येत आहे.

**श्वसितपवनमनुपमपरिणाहम् ।**
**मदनदहनमिव वहति सदाहम् ॥ ३ ॥**

श्वसित-पवनम् अनुपम-परिणाहम् ।
मदन-दहनम् इव वहति सदाहम् ॥ ३ ॥

तिचा श्वास तिला चटके देणाऱ्या मदनाच्या आगीच्या ज्वालेप्रमाणें वाफाळला आहे. ती जे लांब लांब सुस्कारे सोडीत आहे त्यांचें वर्णन करावयास मला उपमाहि सुचत नाहीं.

**दिशि दिशि किरति सजलकणजालम् ।**
**नयननलिनमिव विगलितनालम् ॥ ४ ॥**

दिशि दिशि किरति सजल-कण-जालम् ।
नयन-नलिनम् इव विगलित-नालम् ॥ ४ ॥

देंठ तोडलेल्या कमलाप्रमाणें तिची दृष्टि मलूल झाली आहे. अश्रूंनीं ओथंबलेल्या त्या नयनांनी ती तुला चोहींकडे शोधीत आहे.

**त्यजति न पाणितलेन कपोलम् ।**
**बालशशिनमिव सायमलोलम् ॥ ५ ॥**

त्यजति न पाणि-तलेन कपोलम् ।
बाल-शशिनम् इव सायम् अलोलम् ॥ ५ ॥

तुझ्याशिवाय आतां रात्र कशी जाईल अशा विचारांत ती सायंकाळपासून तळहातावर गाल टेकून बसलेली आहे. अर्धें वदन हाताआड दडल्यामुळें ती फिक्कट चंद्रकोरीप्रमाणें दिसत आहे.

( शुक्लपक्षांतील बालचंद्र पश्चिमेला उगवतो. तेव्हां पश्चिमेचें क्षितिज सूर्यास्तामुळें रक्तरंगी असतें. राधेचा तळहात तिच्या वदनाच्या भारानें असाच रक्तरंगी दिसत आहे आणि त्या रक्तरंगाच्या पार्श्वभूमीवर तिचें अर्धें वदन फिकट चंद्रकोरीप्रमाणें दिसत आहे. )

**नयनविषयमपि किसलयतल्पम् ।**
**कलयति विहितहुताशविकल्पम् ।। ६ ।।**

नयन-विषयम् अपि किसलय-तल्पम्
कलयति विहित-हुताश-विकल्पम् ।। ६ ।।

कोवळ्या पालवीची शय्या तिच्या डोळ्यांसमोर आहे. पण ती श्रांत असूनही विश्रांती-साठीं त्या शय्येकडे जात नाहीं. कारण ती शय्या तिला फुललेल्या निखाऱ्यांच्या खाईप्रमाणें वाटत आहे.

**हरिरिति हरिरिति जपति सकामम् ।**
**विरहविहितमरणेव निकामम् ।। ७ ।।**

हरिः इति हरिः इति जपति स-कामम्
विरह-विहित-मरण इव निकामम् ।। ७ ।।

विरहामुळें आतां आपलें मरण अटळ आहे असें तिला वाटत आहे. तुझी ओढ अनावर होऊन ती सारखी तुझ्या नांवाचा जप करीत आहे.

**श्रीजयदेवभणितमिति गीतम् ।**
**सुखयतु केशवपदमुपनीतम् ।। ८ ।।**

श्री-जयदेव-भणितम् इति गीतम् ।
सुखयतु केशव-पदम् उपनीतम् ।। ८ ।।

जयदेवकवीनें गाइलेलें हें गीत जे केशवाच्या चरणीं लीन आहेत त्यांचें कल्याण करो.

*नववी अष्टपदी समाप्त*

**सा रोमाञ्चति सीत्करोति विलपत्युत्कम्पते ताम्यति**
**ध्यायत्युद्भ्रमति प्रमीलति पतत्युद्याति मूर्च्छत्यपि ।**
**एतावत्यतनुज्वरे वरतनुर्जीवेन्न किं ते रसात्**
**स्वर्वैद्यप्रतिम ! प्रसीदसि न चेत्त्वत्तोऽन्यथानान्तकः ॥ १ ॥**

सा रोमाञ्चति सीत्कारोति विलपति उत्कम्पते ताम्यति
ध्यायति उद्भ्रमति प्रमीलति पतति उद्याति मूर्च्छति अपि ।
एतावति अ-तनु-ज्वरे वर-तनुः जीवेत् न किम् ते रसात्
स्वः-वैद्य-प्रतिम ! प्रसीदसि न चेत् त्वत्तः अन्यथा न अन्तकः ॥१॥

कृष्णा, मधेंच तुझा स्पर्श झाला अशा कल्पनेनें तिच्या अंगावर सरसर रोमांच फुलतात. मधेंच ती सीत्कार टाकते. मधेंच तूं प्रत्यक्षांत जवळ नाहींस याची जाणीव होतांच विलाप करते. कधीं ती थरथर कांपते, कधीं तिला ग्लानि येते. मधेंच ती तुझा जप करूं लागते. मग तूं तिला सुखवीत आहेस अशा कल्पनेनें ती नेत्र मिटते. तुझ्या मिठींत म्हणून विकल होणारी ती तुझा आधार नसल्यानें भूमीवर कोसळते. पुन्हां कशीबशी उठते. पुन्हां मूर्च्छित होते. मदनाच्या ज्वराचा हा तिचा विकार आतां असाध्यसाच झाला आहे; पण अशा विकारावर आपल्या शृंगाररसाच्या मात्रेनें उपाय करण्यांत तूं अश्विनीकुमारांप्रमाणें निष्णात आहेस. या प्रणय रसाची मात्रा तूं तिला प्रसन्न होऊन दिलीस तर ती जगणार नाहीं असें नाहीं; पण जर या आसन्नमरण रोग्यावर तूं प्रीतीचे उपचार न करशील तर मात्र यमाचें दर्शन घ्यावयास तुला सोडून आणखी कुठें जावें लागणार नाहीं. तूंच तिचा मृत्यु ठरशील.

**स्मरातुरां दैवतवैद्यहृद्य त्वदङ्गसङ्गामृतमात्रसाध्याम् ।**
**विमुक्तबाधां कुरुषे न राधामुपेन्द्रवज्रादपि दारुणोऽसि ॥ २ ॥**

स्मर-आतुराम् दैवत-वैद्य-हृद्य त्वत्-अङ्ग-सङ्ग-अमृत-मात्र-साध्याम् ।
विमुक्त-बाधाम् कुरुषे न राधाम् उप-इन्द्र-वज्रात् अपि दारुणः असि ॥२॥

उपेंद्रा, तूं अश्विनीकुमारांसारखा सुंदर आहेस. राधा कामातुर झाली आहे. तुझ्या आलिंगनांतील अमृत हाच एक तिच्या व्याधीवर उतारा आहे. जर तूं आतां तिला रोगमुक्त केलें नाहींस, तर तूं इंद्राच्या वज्रापेक्षांही अधिक कठोर आहेस असें म्हणावें लागेल.

**कन्दर्पज्वरसञ्ज्वराकुलतनोराश्चर्यमस्याश्चिरं**
**चेतश्चन्दनचन्द्रमःकमलिनीचिन्तासु सन्ताम्यती ।**
**किन्तु क्षान्तिवशेन शीतलतनुं त्वामेवमेकं प्रियं**
**ध्यायन्ती रहसि स्थिता कथमसौ क्षीणा क्षणं प्राणिति ॥ ३ ॥**

कन्दर्प-ज्वर-सञ्ज्वर-आकुल-तनोः आश्चर्यम् अस्याः चिरम् ।
चेतः चन्दन-चन्द्रमः-कमलिनी-चिन्तासु सन्ताम्यति ॥
किन्तु क्षान्ति-वशेन शीतल-तनुम् त्वाम् एव एकम् प्रियम् ।
ध्यायन्ती रहसि स्थिता कथम् असौ क्षीणा क्षणम् प्राणिति ॥ ३ ॥

राधा मदनाच्या बाधेनें तापून व्याकुळ झाली आहे. तिच्या तापावर उतारा म्हणून चंदन, चंद्रमा, कमलिनी अशा शीतल उपचारांचें नुसतें नांव काढलें तरी तिचें चित्त अधिकच जळतें. परंतु या ज्वरानें बेहोष झाली असतां ती स्वतः मात्र तुझ्या शीतल नांवाचा जप करीत असते. जवळजवळ मरणाधीन झालेली ती तुझ्या नांवामुळेंच कशीबशी जीव धरून आहे असें दिसतें. आम्ही इतर शीतल गोष्टींचें नांव काढतांच तिचा ताप वाढावा आणि तिनें तुझें शीतल नांव घेतांच तो ताप उतरावा हें मोठेंच आश्चर्य आहे.

**क्षणमपि विरहः पुरा न सेहे**
**नयननिमीलनखिन्नया यया ते ।**
**श्वसिति कथमसौ रसालशाखां**
**चिरविरहेण विलोक्य पुष्पिताग्राम् ॥ ४ ॥**

क्षणम् अपि विरहः पुरा न सेहे
नयन-निमीलन-खिन्नया यया ते ।
श्वसिति कथम् असौ रसाल-शाखाम्
चिर-विरहेण विलोक्य पुष्पित-अग्राम् ॥ ४ ॥

पूर्वी क्षणभरहि राधेला तुझा विरह सहन होत नसे. डोळ्यांची पापणी लवे तेवढा वेळ तूं दिसला नाहींस कीं ती खिन्न होत असे. त्याउलट आतां प्रियकराच्या संगतींतच जो घालवावा असा वसंतऋतु फुलला असतांना, रसाळ मोहरानें बहरलेल्या आम्रतरूंचें चोहींकडे दर्शन होत असतांना, ती तुझ्याशिवाय कशी जगत असेल तें न कळे !

( पुढील श्लोकांत सर्गाच्या शेवटीचें आशीर्वचन आहे. )

**वृष्टिव्याकुलगोकुलावनरसादुद्धृत्य गोवर्धनं**
**बिभ्रद्बल्लवसुन्दरीभिरधिकानन्दाच्चिरं चुम्बितः ।**
**दर्पेणैव तदर्पिताधरतटीसिन्दूरमुद्राङ्कितो**
**बाहुर्गोपतनोस्तनोतु भवतां श्रेयांसि कंसद्विषः ॥ ५ ॥**

वृष्टि-व्याकुल-गोकुल-अवन-रसात् उद्धृत्य गोवर्धनम् ।
बिभ्रत् बल्लुव-सुंदरीभिः अधिक-आनन्दात् चिरम् चुम्बितः ॥
दर्पेण इव तत्-अर्पित-अधर-तटी-सिन्दूर-मुद्रा-अङ्कितः
बाहुः गोप-तनोः तनोतु भवताम् श्रेयांसि कंस-द्विषः ॥ ५ ॥

अतिवृष्टीनें गोकुळ व्याकुळ झालें, तेव्हां कंसाचा वध करणाऱ्या कृष्णानें आपल्या हातानें गोवर्धनपर्वत उचलून गोकुळाचें संरक्षण केलें. हा त्याचा पराक्रम पाहून गोपींचा आनंद अनावर झाला. प्रीतीच्या आहारीं जाऊन त्या गोपींनीं त्या बाहूचीं अनेकवार दीर्घ चुंबनें घेतलीं. तेव्हां गोपींच्या अधरोष्ठावरील लाल रंगाचे ठसे त्या हातावर चोहींकडे उमटले. त्या ठशांनीं शोभणारा कृष्णाचा तो हात तुमचें कल्याण करो.

*नववा प्रबंध समाप्त*
*चौथा सर्ग समाप्त*

**कन्दर्पज्वरसञ्ज्वराकुलतनोराश्चर्यमस्याश्चिरं**
**चेतश्चन्दनचन्द्रमःकमलिनीचिन्तासु सन्ताम्यती ।**
**किन्तु क्षान्तिवशेन शीतलतनुं त्वामेवमेकं प्रियं**
**ध्यायन्ती रहसि स्थिता कथमसौ क्षीणा क्षणं प्राणिति ॥ ३ ॥**

कन्दर्प-ज्वर-सञ्ज्वर-आकुल-तनोः आश्चर्यम् अस्याः चिरम् ।
चेतः चन्दन-चन्द्रमः-कमलिनी-चिन्तासु सन्ताम्यति ॥
किन्तु क्षान्ति-वशेन शीतल-तनुम् त्वाम् एव एकम् प्रियम् ।
ध्यायन्ती रहसि स्थिता कथम् असौ क्षीणा क्षणम् प्राणिति ॥ ३ ॥

राधा मदनाच्या बाधेनें तापून व्याकुळ झाली आहे. तिच्या तापावर उतारा म्हणून चंदन, चंद्रमा, कमलिनी अशा शीतल उपचारांचें नुसतें नांव काढलें तरी तिचें चित्त अधिकच जळतें. परंतु या ज्वरानें बेहोष झाली असतां ती स्वतः मात्र तुझ्या शीतल नांवाचा जप करीत असते. जवळजवळ मरणाधीन झालेली ती तुझ्या नांवामुळेंच कशीबशी जीव धरून आहे असें दिसतें. आम्ही इतर शीतल गोष्टींचें नांव काढतांच तिचा ताप वाढावा आणि तिनें तुझें शीतल नांव घेतांच तो ताप उतरावा हें मोठेंच आश्चर्य आहे.

**क्षणमपि विरहः पुरा न सेहे**
**नयननिमीलनखिन्नया यया ते ।**
**श्वसिति कथमसौ रसालशाखां**
**चिरविरहेण विलोक्य पुष्पिताग्राम् ॥ ४ ॥**

क्षणम् अपि विरहः पुरा न सेहे
नयन-निमीलन-खिन्नया यया ते ।
श्वसिति कथम् असौ रसाल-शाखाम्
चिर-विरहेण विलोक्य पुष्पित-अग्राम् ॥ ४ ॥

पूर्वी क्षणभरहि राधेला तुझा विरह सहन होत नसे. डोळ्यांची पापणी लवे तेवढा वेळ तूं दिसला नाहींस कीं ती खिन्न होत असे. त्याउलट आतां प्रियकराच्या संगतींतच जो घालवावा असा वसंतऋतु फुलला असतांना, रसाळ मोहरानें बहरलेल्या आम्रतरूंचें चोहींकडे दर्शन होत असतांना, ती तुझ्याशिवाय कशी जगत असेल तें न कळे !

( पुढील श्लोकांत सर्गाच्या शेवटीचें आशीर्वचन आहे. )

**वृष्टिव्याकुलगोकुलावनरसादुद्धृत्य गोवर्धनं**
**बिभ्रद्वल्लवसुन्दरीभिरधिकानन्दाच्चिरं चुम्बितः ।**
**दर्पेणैव तदर्पिताधरतटीसिन्दूरमुद्राङ्कितो**
**बाहुर्गोपतनोस्तनोतु भवतां श्रेयांसि कंसद्विषः ॥ ५॥**

वृष्टि-व्याकुल-गोकुल-अवन-रसात् उद्धृत्य गोवर्धनम् ।
बिभ्रत् बल्लव-सुंदरीभिः अधिक-आनन्दात् चिरम् चुम्बितः ॥
दर्पेण इव तत्-अर्पित-अधर-तटी-सिन्दूर-मुद्रा-अङ्कितः
बाहुः गोप-तनोः तनोतु भवताम् श्रेयांसि कंस-द्विषः ॥ ५ ॥

अतिवृष्टीनें गोकुळ व्याकुळ झालें, तेव्हां कंसाचा वध करणाऱ्या कृष्णानें आपल्या हातानें गोवर्धनपर्वत उचलून गोकुळाचें संरक्षण केलें. हा त्याचा पराक्रम पाहून गोपींचा आनंद अनावर झाला. प्रीतीच्या आहारीं जाऊन त्या गोपींनीं त्या बाहूचीं अनेकवार दीर्घ चुंबनें घेतलीं. तेव्हां गोपींच्या अधरोष्ठावरील लाल रंगाचे ठसे त्या हातावर चोहींकडे उमटले. त्या ठशांनीं शोभणारा कृष्णाचा तो हात तुमचें कल्याण करो.

*नववा प्रबंध समाप्त*
*चौथा सर्ग समाप्त*

# सर्ग पांचवा : साकांक्षपुंडरीकाक्ष
( आकांक्षायुक्त असा कमलनयन कृष्ण )

## प्रबंध दहावा

**अहमिह निवसामि याहि राधामनुनय मद्वचनेन चानयेथाः ।**
**इति मधुरिपुणा सखी नियुक्ता स्वयमिदमेत्य पुनर्जगाद राधाम् ॥ १ ॥**

अहम् इह निवसामि याहि राधाम् । अनुनय मद्वचनेन च आनयेथाः ॥
इति मधु-रिपुणा सखी नियुक्ता । स्वयम् इदम् एत्य पुनः जगाद राधाम् ॥ १ ॥

कृष्ण राधेच्या सखीला म्हणाला,

" मी इथेंच बसतों. तूं राधेकडे जा. माझ्यासाठीं तिचा अनुनय कर आणि तिला प्रसन्न करून इथें घेऊन ये. "

तेव्हां ती सखी राधेकडे जाऊन तिला म्हणाली.

## अष्टपदी दहावी

राग—वराडी : ताल—रूपक

**तव विरहे वनमाली सखि सीदति ॥ ध्रु० ॥**

सखे, वनमाली कृष्ण तुझ्या विरहानें व्याकुळ झालेला आहे.

**वहति मलयसमीरे मदनमुपनिधाय ।**
**स्फुटति कुसुमनिकरे विरहिहृदयदलनाय ॥ १ ॥**

वहति मलय-समीरे मदनम् उपनिधाय ।
स्फुटति कुसुम-निकरे विरहि-हृदय-दलनाय ॥ १ ॥

प्रणय भावनेला भरतें आणणारा मलय वायु वाहात आहे. विरहीजनांच्या हृदयाला व्याकुळ करणारा वसंतबहर फुलत आहे. अशा वेळीं,

ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ५९३५८ वि: काव्य
ग्रंथ २०११७ नों: दि: १८।३।५७



**दहति शिशिरमयूखे मरणमनुकरोति ।**
**पतति मदनविशिखे विलपति विकलतरोऽति ॥ २ ॥**

दहति शिशिर-मयूखे मरणम् अनुकरोति ।
पतति मदन-विशिखे विलपति विकल-तरः अति ॥ २ ॥

चंद्राचे शीतल किरण त्याला जाळीत आहेत म्हणून तो मरणोन्मुख झाला आहे. असह्य मदन-बाणांचा वर्षाव सारखा होत असल्यानें अतिशय विकल होऊन तो तुझ्यासाठीं विलाप करीत आहे.

१६००२

**ध्वनति मधुपसमूहे श्रवणमपिदधाति ।**
**मनसि कलितविरहे निशि निशि रुजमुपयाति ॥ ३ ॥**

ध्वनति मधु-प-समूहे श्रवणम् अपिदधाति ।
मनसि कलित-विरहे निशि निशि रुजम् उपयाति ॥ ३ ॥

भुंग्यांचा गुंजारव ऐकवत नाहीं म्हणून तो हातांनीं कान झांकून घेत आहे. मनांतील विरहव्यथा सारखी वाढतीच असल्यानें तो रात्रीमागून रात्री तुझ्यासाठीं व्यथेंत संपवीत आहे.

**वसति विपिनविताने त्यजति ललितमपि धाम ।**
**लुठति धरणिशयने बहु विलपति तव नाम ॥ ४ ॥**

वसति विपिन-विताने त्यजति ललितम् अपि धाम ।
लुठति धरणि-शयने बहु विलपति तव नाम ॥ ४ ॥

सुखसोयींनीं भरलेलें आपलें सुंदर घर सोडून देऊन त्यानें उघड्या कुंजवनांत ठाण मांडलें आहे. धरणीवर लोळण घेऊन तो सारखी सारखी राधा, राधा, अशी करुण हांक तुला देत आहे.

**रणति पिकसमुदाये प्रतिदिशमनुयाति ।**
**हसति मनुजनिचये निजविरहमपलपति नेति ॥ ५ ॥**

रणति पिक-समुदाये प्रति-दिशम् अनुयाति ।
हसति मनुज-निचये निज-विरहम् अपलपति नेति ॥ ५ ॥

कोकिळा गाऊं लागल्या म्हणजे हा तुझाच आवाज अशा भ्रमानें तो त्या आवाजामागें वणवण फिरत आहे. त्याची ही प्रेमवेडी अवस्था पाहून लोक हसूं लागले कीं, तेवढ्यापुरती आपली स्थिति लपविण्याचा प्रयत्न करीत आहे.

**स्फुरति कलरवरावे स्मरति भणितमेव ।**
**तव रतिसुखविभवे बहुगणयति सुगुणमतीव ॥ ६ ॥**

स्फुरति कल-रव-रावे स्मरति भणितम् एव ।
तव रति-सुख-विभवे बहु गणयति सु-गुणम् अतीव ॥ ६ ॥

पक्ष्यांची कुजबुज ऐकतांच रतिशांतीच्या वेळीं तूं कुजबुज करतेस ती त्याला आठवत आहे. त्यामुळें तुझ्याशीं प्रीति खेळतांना शृंगारसुखाचें जें बहुगुणी वैभव फुलतें त्याची असह्य ओढ त्याला लागत आहे.

**त्वदभिधशुभदमासं वदति नरि श्रुणोति ।**
**तमति सरसं परयुवतिषु न रतिमुपैति ॥ ७ ॥**

त्वद्-अभिध-शुभ-द-मासम् वदति नरि श्रुणोति ।
तमति सरसम् पर-युवतिषु न रतिम् उपैति ॥ ७ ॥

वसंत आला. राधामास (वैशाख) आला. असें कुणीं म्हणतांच तो 'राधा' या शब्दाकडे कान टवकारून ऐकत आहे. स्वतः राधा राधा असें म्हणत आहे. त्याची व्यथा उतरावी म्हणून दुसऱ्या कितीक गोपी त्याच्याभोंवतीं जमल्या आहेत. पण तो त्यांच्यांत मुळींच लक्ष घालीत नाहीं.

**भणति कविजयदेव इति विरहविलसितेन ।**
**मनसि रभसविभवे हरिरुदयतु सुकृतेन ॥ ८ ॥**

भणति कवि-जयदेवः इति विरह-विलसितेन ।
मनसि रभस-विभवे हरिः उदयतु सुकृतेन ॥ ८ ॥

जयदेव कवीनें कृष्णाच्या विरहकालीन हालचालींचें हें गीत गाइलें आहे. ज्यांना हरि-कीर्तनाच्या वैभवाची गोडी असेल त्यांचें पूर्वपुण्य तेवढें बळकट असल्यास त्यांच्या मनांत या गीतानें कृष्णभक्तीचा उदय होईल.

*दहावी अष्टपदी समाप्त*

**पूर्वं यत्र समं त्वया रतिपतेरासादिताः सिद्धय-**
**स्तस्मिन्नेव निकुञ्जमन्मथमहातीर्थे पुनर्माधवः ।**
**ध्यायंस्त्वामनिशं जपन्नपि तवैवालापमन्त्रावलीं**
**भूयस्त्वत्कुचकुम्भनिर्भरपरीरम्भामृतं वाञ्छति ॥ २ ॥**

पूर्वम् यत्र समम् त्वया रति-पतेः आसादिताः सिद्धयः
तस्मिन् एव निकुञ्ज-मन्मथ-महा-तीर्थे पुनः माधवः ॥
ध्यायन् त्वाम् अ-निशम् जपन् अपि तव इव आलाप मन्त्र-आवलीम् ।
भूयः त्वत्-कुच-कुम्भ-निर्भर-परीरम्भ अमृतम् वाञ्छति ॥ २ ॥

राधे, तुला तो लतामंडप आठवतो ? तुझ्या सहवासांत असतांना कृष्णानें याच मंडपांत मदनाची पूजा पूर्ण केली होती. कृष्ण त्या मंडपाला मदनपूजेची आराधना सिद्धीस नेणारें तीर्थस्थानच मानीत आहे. तो तिथें बसून तुझें निरंतर ध्यान करीत आहे. तुझ्या नाममंत्राचा सारखा जप करीत आहे. कलशाप्रमाणें पुष्ट अशा तुझ्या स्तनांच्या गाढ आलिंगनांतील अमृत पुनःपुन्हा मिळावें असें फल त्याला या तपांतून हवें आहे.

*प्रबंध दहावा समाप्त*

# प्रबंध अकरावा

## अष्टपदी अकरावी

राग–केदार : ताल–एकताल

**धीरसमीरे यमुनातीरे वसति वने वनमाली ।**
**गोपीपीनपयोधरमर्दनचञ्चलकरयुगशाली ॥ ध्रु० ॥**

धीर-समीरे यमुना-तीरे वसति वने वनमाली
गोपी-पीन-पयोधर-मर्दन-चञ्चल-कर-युग-शाली ॥ ध्रु० ॥

राधे, मदमंद वायु वाहात आहे. यमुनेचा परिसर शांत आहे. शीतल आहे. वसंतानें बहरलेलें कुंजवन सुगंध ओतीत आहे. तुझा प्रियकर कृष्ण वनफुलांचा शृंगार करून तुझी

वाट पाहात आहे. प्रियेचे डौलदार स्तन कुसकरण्यांत कुशल असणारे त्याचे अवखळ हात तुझ्या स्मरणानें चंचल झाले असून थरथरत आहेत, व त्याचें सौंदर्य वाढवीत आहेत.

**रतिसुखसारे गतमभिसारे मदनमनोहरवेशम् ।**
**न कुरु नितम्बिनि गमनविलम्बनमनुसर तं हृदयेशम् ॥ १ ॥**

रति-सुख-सारे गतम् अभिसारे मदन-मनोहर-वेशम् ।
न कुरु नितम्बिनि गमन-विलम्बनम् अनुसर तम् हृदयेशम् ॥ १ ॥

रतिसुखाचें उत्तम फळ देणाऱ्या त्या संकेत-मंडपांत कृष्ण बसला आहे. त्यानें मदना-सारखा सुंदर शृंगार केला आहे. डौलदार नितंबांत ओथंबलेल्या तुझ्या रूपाचें तो स्मरण करीत आहे. तूं आतां जावयास मुळींच उशीर करूं नकोस. तुझ्या भरडौल पृष्ठभागाच्या भारामुळें तुझीं पावलें मंद मंद पडतात हें खरें. पण आतां थोडी त्वरा कर. त्या प्राण-सख्याला जाऊन लौकर भेट.

**नामसमेतं कृतसङ्केतं वादयते मृदु वेणुम् ।**
**बहुमनुतेऽतनु ते तनुसङ्गतपवनचलितमपि रेणुम् ॥ २ ॥**

नाम-समेतम् कृत-सङ्केतम् वादयते मृदु वेणुम् ।
बहु मनुते अतनु ते तनु-सङ्गत-पवन-चलितम् अपि रेणुम् ॥ २ ॥

अत्यंत कोमल, आर्त, दर्दभऱ्या स्वरांत तो आपली वेणू वाजवीत आहे. आधींच तुमच्यांत संकेत ठरला आहे त्या सुरांत तो तुझें नांव त्या वेणुवादनांत गुंफून तुला हांका मारीत आहे. तुझ्या अंगावरून या दिशेनें जो वारा वाहात आहे त्यानें उडविलेला एखादा धूलिकणसुद्धां त्याला अतिशय धन्य वाटत आहे. जो स्पर्श त्याला स्वतःला होत नाहीं त्या स्पर्शानें भरलेला वारा त्या धुळीच्या कणाला भेटला म्हणून त्याला त्या कणाचा हेवा वाटत आहे.

**पतति पतत्रे विचलति पत्रे शङ्कितभवदुपयानम् ।**
**रचयति शयनं स चकितनयनं पश्यति तव पन्थानम् ॥ ३ ॥**

पतति पतत्रे विचलति पत्रे शङ्कित-भवत्-उपयानम् ।
रचयति शयनं स-चकित-नयनं पश्यति तव पन्थानम् ॥ ३ ॥

पक्षी इकडून तिकडे उडाल्यानें पानें हालून सळसळ झाली कीं ही तुझ्याच रेशमी वस्त्रांची सळसळ असें त्याला वाटत आहे. तूं आलीस, तूं आलीस, अशी शंका त्याच्या मनांत येत आहे. सळसळ झाली, पण तूं दिसली नाहींस; तूं कुठें तरी लपली तर नाहींस ना अशा विचारानें चकित झालेल्या नयनांनीं तो चोंहीकडे पाहात आहे. तुझ्या येण्याच्या रस्त्याकडे असें पाहात असतांनाच तो तरूंचे कोमल किसलय आणि सुगंधी कोमल फुलें यांचें स्पर्शशीतल असें विस्तृत शयन तुझ्यासाठीं रचीत आहे.

**मुखरमधीरं त्यज मञ्जीरं रिपुमिव केलिषु लोलम् ।**
**चल सखि कुञ्जं सतिमिरपुञ्जं शीलय नीलनिचोलम् ॥ ४ ॥**

मुखरम् अधीरम् त्यज मञ्जीरम् रिपुम् इव केलिषु लोलम् ।
चल सखि कुञ्जम् स-तिमिर-पुञ्जम् शीलय नील-निचोलम् ॥ ४ ॥

थांब. थांब. तुझ्या रतिलीलेंत आपल्या रुणझुणीचा ताल धरून सहकार देणारे हे नूपुर स्वतःच त्या लीलेसाठीं लोलुप झाल्यासारखी अधिर छुमछुम करीत आहेत. हे बोलके अलंकार प्रियाकडे जाणाऱ्या प्रणयिनीचे शत्रु होत. तूं हे काढून टाक. हे जरतारी सुवर्णवस्त्र सोडून ठेव. अंधारांत मिळून जाणारें निळें झुळझुळीत वस्त्र नेस. जिथें मनोहर प्रीतीचा डाव रंगावयाचा आहे तिथें आतां अंधार दाटत असेल. चल. चल. आतां उशीर करूं नकोस.

**उरसि मुरारेरुपहितहारे घन इव तरलबलाके ।**
**तडिदिव पीते रतिविपरीते राजसि सुकृतविपाके ॥ ५ ॥**

उरसि मुरारेः उपहित-हारे घन इव तरल-बलाके ।
तडित् इव पीते रति-विपरीते राजसी सु-कृत-विपाके ॥ ५ ॥

आज तुझें पूर्वपुण्य फळला आलें आहे. आज तूं श्रीकृष्णाशीं आलिंगनाचें सुख भोगणार आहेस. निळा निळा मेघ असावा, त्याभोंवतीं पांढऱ्याशुभ्र चंचल बगळ्यांची माला उडत असावी, आणि त्या ढगावर वीज चमकावी! किती सुंदर! कृष्णाचें वक्षस्थल मेघासारखें निळें आहे. त्याभोंवतीं पांढऱ्याशुभ्र सुमनांची माला रुळत आहे. तुझा सोन्यासारखा सतेज पिवळा वर्ण आणि तुझी चपलता हीं विजेसारखीं आहेत. तूं त्या कृष्णाच्या हृदयासनावर मोठी शोभून दिसशील.

**विगलितवसनं परिहृतरशनं घटय जघनमपिधानम् ।**
**किसलयशयने पङ्कजनयने निधिमिव हर्षनिदानम् ॥ ६ ॥**

विगलित-वसनम् परिहृत-रशनम् घटय जघनम् अपिधानम् ।
किसलय-शयने पङ्कज-नयने निधिम् इव हर्ष-निदानम् ॥ ६ ॥

हे कमलनयने, कृष्णानें मेखलाच ओढून काढल्यानें तेव्हां तुझें वस्त्र गळून गेलें असेल. कैवल्यानंदासारख्या आनंदाचे मूलघर, अतुलनीय हर्षाचा जणू निधीच अशा तुझ्या उटिपोटावर तेव्हां आच्छादनच नसेल. किसलयाच्या शयनाला तुझ्या त्या देहसौंदर्यामुळें मोठी शोभा येईल.

**हरिरभिमानी रजनिरिदानीमियमपि याति विरामम् ।**
**कुरु मम वचनं सत्वररचनं पूरय मधुरिपुकामम् ॥ ७ ॥**

हरिः अभिमानी रजनिः इदानीम् इयम् अपि याति विरामम् ।
कुरु मम वचनम् स-त्वर-रचनम् पूरय मधु-रिपु-कामम् ॥ ७ ॥

सखे, कृष्ण मोठा मनस्वी आहे. तूं त्याचें मन मोडलेंस तर तें त्याला सहन होणार नाहीं. ही रात्र पाहा. हळूहळू संपावयास येत आहे. आतां उशीर करूं नकोस. माझें म्हणणें ऐक. कृष्णाची प्रणयेच्छा पुरी कर.

**श्रीजयदेवे कृतहरिसेवे भणति परमरमणीयम् ।**
**प्रमुदितहृदयं हरिमतिसदयं नमत सुकृतकमनीयम् ॥ ८ ॥**

श्री-जयदेवे कृत-हरि-सेवे भणति परम-रमणीयम् ।
प्रमुदित-हृदयम् हरिम् अति सदयम् नमत सु-कृत-कमनीयम् ॥ ८ ॥

जयदेव कवीनें कृष्णसेवेसाठीं हें अतिशय रमणीय असें गीत रचिलें आहे. तो कृष्ण प्रसन्न-हृदय आहे. तो अत्यंत सदय आहे. पूर्वपुण्य असेल तर त्याच्याविषयीं मनांत प्रेम उत्पन्न होतें. तुम्ही त्या हरीला शरण जा.

*अकरावी अष्टपदी समाप्त*

**विकिरति मुहुः श्वासानाशाः पुरो मुहुरीक्षते**
**प्रविशति मुहुः कुञ्जं गुञ्जन् मुहुर्बहु ताम्यति ।**
**रचयति मुहुः शय्यां पर्याकुलं मुहुरीक्षते**
**मदनकदनक्लान्तः कान्ते प्रियस्तव वर्तते ॥ १ ॥**

विकिरति मुहुः श्वासान् आशाः पुरो मुहुः ईक्षते ॥
प्रविशति मुहुः कुञ्जम् गुञ्जन् मुहुः बहु ताम्यति ।
रचयति मुहुः शय्याम् पर्याकुलम् मुहुः ईक्षते
मदन-कदन-क्लान्तः कान्ते प्रियः तव वर्तते ॥ १ ॥

राधे, तुझा कान्त मदनाच्या बाधेनें अतिशय पीडित झाला आहे. तो पुन्हां पुन्हां निश्वास सोडीत आहे. तूं कुठें दिसतेस का हें तो चारी बाजूंला पाहात आहे. तूं दुसऱ्या वाटेनें जाऊन कुंजांत बसली असशील म्हणून पुन्हां पुन्हां कुंजांत पाहात आहे. तो मधेंच स्वतःशीं बडबडत आहे. मधेंच त्याला ग्लानि येत आहे. एकदा रचून झालेली शय्या तिच्यांतील कुठलीं तरी फुलें सुकलीं, वाळलीं, कुठले तरी किसलय कोमाइले म्हणून तुला सुखकर होणार नाही अशा भीतीनें पुन्हां पुन्हां रचीत आहे.

**त्वद्वाम्येन समं समग्रमधुना तिग्मांशुरस्तङ्गतो**
**गोविन्दस्य मनोरथेन च समं प्राप्तं तमःसान्द्रताम् ।**
**कोकानां करुणस्वनेन सदृशी दीर्घा मदभ्यर्थना**
**तन्मुग्धे विफलं विलम्बनमसौ रम्योऽभिसारक्षणः ॥ २ ॥**

त्वत्-वाम्येन समम् समग्रम् अधुना तिग्म-अंशुः अस्तम् गतः
गोविन्दस्य मनोरथेन च समम् प्राप्तम् तमः सान्द्रताम् ।
कोकानाम् करुण-स्वनेन सदृशी दीर्घा मद्–अभ्यर्थना
तत्-मुग्धे विफलम् विलम्बनम् असौ रम्यः अभिसार-क्षणः ॥ २ ॥

राधे, तुझ्या मनांतील सारी असूया आतां संपली. प्रखर किरणांचा सूर्य तिच्याबरोबरच अस्ताला गेला. कृष्णाच्या मनांत तुझ्याविषयींची अभिलाषा दाटली. तिच्याबरोबर अंधारहि दाटला. जणू मीच तुझ्या विरहानें व्याकुळ झालेला चक्रवाक आहेसें वाटावें अशी आर्त विनवणी तूं कृष्णाकडे चलावें म्हणून जीव तोडून मी करीत आहें. वेडे, यापुढें उशीर करणें व्यर्थ आहे. प्रियकराकडे जाण्याचा रम्य क्षण हाच आहे.

**आश्लेषादनुचुम्बनादनुनखोल्लेखादनुस्वान्तज-**
**प्रोद्बोधादनुसम्भ्रमादनुरतारम्भादनुप्रीतयोः ।**
**अन्यार्थं गतयोर्भ्रमान्मिलितयोः संभाषणैर्जानतो-**
**र्दम्पत्योर्निशि को न को न तमसि व्रीडाविमिश्रो रसः ॥ ३ ॥**

आश्लेषात् अनु-चुम्बनात् अनु-नख-उल्लेखात् अनु-स्व-अन्त-ज-
प्र-उद्बोधात् अनु-सम्भ्रमात् अनु-रत-आरम्भात् अनु-प्रीतयोः ।
अन्य-अर्थम् गतयोः भ्रमात् मिलितयोः संभाषणैः जानतोः
दम्पत्योः निशि कः न कः न तमसि व्रीडा-विमिश्रः रसः ॥ ३ ॥

सखी हसून पुढें म्हणाली,

" मात्र तूं त्या ठरलेल्याच कुंजांत अचूक जा बरें. कारण अंधारांत चोरट्या प्रेमासाठी जमलेले प्रेमिक प्रथम एकमेकांना अधिरें आलिंगन देतात. मग एकमेकांचें चुंबन घेतात. मग एकमेकांना नखानें व्रण करतात. त्यामुळें प्रणयाची ओढ अनावर होते. मोठा संभ्रम उडतो. उतावळी रतिक्रीडा सुरू होते. तिच्यांत तृप्ति लाभते आणि मग तृप्तीचें संभाषण सुरू होतें तेव्हां आवाज ऐकून कळतें कीं, आपण दुसऱ्याच कुणाला तरी भेटावयास आलों होतों आणि गोंधळानें भलत्यांशींच सुखोपभोग घेतला आहे. अशा दम्पतीला मग लज्जा वाटते तेव्हां कोणकोणते रस उत्पन्न होत असतील कोण जाणे ! तुला अनुभव आहे का ग ? "

( सखी राधेला सूचना देत आहे. संभव आहे कीं असा घोटाळा ही सखीचीच स्वानुभवाची गोष्ट असावी. )

**सभयचकितं विन्यस्यन्तीं दृशं तिमिरे पथि**
**प्रतितरु मुहुः स्थित्वा मन्दं पदानि वितन्वतीम् ।**
**कथमपि रहः प्राप्तामङ्गैरनङ्गतरङ्गिभिः**
**सुमुखि सुभगः पश्यन् स त्वामुपैतु कृतार्थताम् ॥ ४ ॥**

सभय-चकितम् वि-न्यस्यन्तीम् दृशम् तिमिरे पथि
प्रति-तरु मुहुः स्थित्वा मन्दम् पदानि वि-तन्वतीम् ।
कथम् अपि रहः-प्राप्ताम् अङ्गैः अनङ्ग-तरङ्गिभिः
सु-मुखि सुभगः पश्यन् स त्वाम् उपैतु कृत-अर्थताम् ॥ ४ ॥

राधे, अंधाऱ्या वाटेनें तूं जाशील तेव्हां सावधपणें चौफेर नजर ठेव. प्रत्येक झाडाच्या खोडाआड क्षणभर उभी राहा आणि सारें निर्धोक आहे अशी खात्री करून हळूसर पावलांनीं पुढें जा. हे सुमुखी, संकेताच्या स्थानीं पोंचाव्यास अडचणी आहेत हें खरें. पण तूं तिथें पोहोंचशील तेव्हां प्रणयरोमांचांनीं फुललेलीं तुझीं उन्मुख अंगोपांगें पाहून तुझा तो भाग्यवान् प्रियकर कृतार्थ होऊन जाईल.

**राधामुग्धमुखारविन्दमधुपस्त्रैलोक्यमौलिस्थली-**
**नेपथ्योचितनीलरत्नमवनीभारावतारान्तकः ।**
**स्वच्छन्दं व्रजसुन्दरीजनमनस्तोपप्रदोपोदयः**
**कंसध्वंसनधूमकेतुरवतु त्वां देवकीनन्दनः ॥ ५ ॥**

राधा-मुग्ध-मुख-अरविन्द-मधुपः त्रैलोक्य-मौलि-स्थली-
नेपथ्य-उचित-नील-रत्नम् अवनी-भार-अवतार-अन्तकः ।
स्वच्छन्दम् व्रज-सुन्दरी-जन-मनः-तोष-प्रदोप-उदयः
कंस-ध्वंसन-धूमकेतुः अवतु त्वाम् देवकी-नन्दनः ॥ ५ ॥

राधे, तुझें वदन नुकत्याच उमललेल्या कमलाप्रमाणें सुंदर आहे. कृष्ण जणू काय या कमलांतील मध पिण्यासाठीं लोलुप झालेला भ्रमर आहे. त्रिलोकाला जें जें कांहीं मुकुटाप्रमाणें शिरोधार्य वाटेल त्याचेंहि चूडामणीप्रमाणें भूषण ठरणारा तो नीलवर्ण माधव आहे. पृथ्वीवरील पातकांचा आणि कष्टांचा नाश करण्यासाठींच त्याचा जन्म आहे. गोपनिवासांतील सुंदरींना हवा हवा तेवढा संतोष देणारा जणू काय तो नवोदित प्रदोषकाल आहे. कंसाचा नाश करणारा तो धूमकेतु आहे. तो देवनंकीदन कृष्ण तुजवर प्रसन्न असो.

*अकरावा प्रबंध समाप्त*
*पांचवा सर्ग समाप्त*

# सर्ग सहावा : सोत्कंठ वैकुंठ ( उत्कंठित कृष्ण )

## प्रबंध बारावा

**अथ तां गन्तुमशक्तां चिरमनुरक्तां लतागृहे दृष्ट्वा ।**
**तच्चरितं गोविन्दे मनसिजमन्दे सखी प्राह ॥ १ ॥**

अथ ताम् गन्तुम् अ-शक्ताम् चिरम् अनुरक्ताम् लता-गृहे दृष्ट्वा ।
तत्-चरितम् गोविन्दे मनसि-ज मन्दे सखी प्राह ॥ १ ॥

राधा कुंजवनांत जावयास निघाली खरी; पण ती लौकरच थकली. कृष्णाला प्रेमानें भेटावयास उतावीळ झाली असूनहि तिला पाऊल उचलेना. तेव्हां तिला जवळच्याच लता-मंडपांत बसवून सखी पुढें गेली आणि प्रेमातिरेकानें मलूल झालेल्या कृष्णाला राधेची परिस्थिति सांगत म्हणाली.

## अष्टपदी बारावी

राग – गुणकरी : ताल – रूपक

**नाथ हरे जय नाथ हरे,**
**सीदति राधाऽवासगृहे ॥ ध्रु० ॥**

नाथ हरे जय नाथ हरे,
सीदति राधा आवासगृहे ॥ ध्रु० ॥

हे राधानाथा, हे कृष्णा, तुझा विजय असो. इथवर येणें न जमल्यामुळें राधा दुसऱ्या कुंजांत थांबली आहे आणि तेथें तुझ्यासाठीं झुरत आहे.

**पश्यति दिशि दिशि रहसि भवन्तम् ।**
**तदधरमधुरमधूनि पिबन्तम् ॥ १ ॥**

पश्यति दिशि दिशि रहसि भवन्तम् ।
तत्-अधर-मधुर-मधूनि पिबन्तम् ॥ १ ॥

कृष्णा, तूं तिला एकान्तांत जवळ घेतलेलें आहेस आणि तिच्या अधरोष्ठावरील अमृत पीत आहेस असाच आभास तिला दिशांदिशांतून होत आहे.

**त्वदभिसरणरभसेन वलन्ती ।**
**पतति पदानि कियन्ति चलन्ती ॥ २ ॥**

त्वत्-अभिसरण-रभसेन वलन्ती ।
पतति पदानि कियन्ति चलन्ती ॥ २ ॥

आतां तुझा सहवास लाभणार अशा अपेक्षेनें तिची धांदल उडाली. त्या धांदलींत ती लगबगीनें तुझ्याकडे येत होती. पण विरहानें क्षीण झाली असल्यानें दमून ती थबकली. तिला पुढें चालवेना.

**विहितविशदबिसकिसलयवलया ।**
**जीवति परमिह तव रतिकलया ॥ ३ ॥**

विहित-विशद-बिस-किसलय-वलया ।
जीवति परम् इह तव रति-कलया ॥ ३ ॥

तुझ्या भेटीला येतांना तिनें हौसेनें कमलनालांतील निर्मल बिसतंतूंचा शृंगार केला होता. पण इथवर येणेंच तिला अशक्य झालें. तुझ्या विरहानें ती इतकी क्षीण झाली आहे कीं, अजून ती जिवंत कशी हाच प्रश्न आहे. पूर्वी तूं तिला जें रतिसुख दिलेंस त्या वेळीं अनुभवलेल्या सुखामृतामुळेंच ती कशीबशी जगत असावी.

**मुहुरवलोकितमण्डनलीला ।**
**मधुरिपुरहमिति भावनशीला ॥ ४ ॥**

मुहुः-अवलोकित-मण्डन-लीला
मधु-रिपुः अहम् इति भावन-शीला ॥ ४ ॥

तूं समोर दिसत नाहींस. तुला पाहावयाचें तर आहे. अनेकदा पाहून परिचित झालेली तुझी वेषभूषापद्धति ती आठवीत आहे. आपण तसाच वेष करीत आहे. आणि मीच तो कृष्ण अशा भावनेनें आपलेंच रूप पाहात आहे.

**त्वरितमुपैति न कथमभिसारम् ।**
**हरिरिति वदति सखीमनुवारम् ॥ ५ ॥**

त्वरितम् उपैति न कथम् अभिसारम् ।
हरिः इति वदति सखीम् अनुवारम् ॥ ५ ॥

कृष्ण मला भेटावयास या संकेतस्थलीं लौकर कां येत नाहीं असें ती आपल्या सख्यांना पुन्हां पुन्हां विचारीत आहे

**श्लिष्यति चुम्बति जलधरकल्पम् ।**
**हरिरुपगत इति तिमिरमनल्पम् ॥ ६ ॥**

श्लिष्यति चुम्बति जलधर-कल्पम् ।
हरिः उपगत इति तिमिरम् अनल्पम् ॥ ६ ॥

तिच्या संभ्रमावस्थेंत दाटलेला अंधार आकारत आहे. नीलवर्ण असा तूंच तिला अंधारांत दिसत आहेस. तूं जवळ आहेस असा तो भास होताच ती तुला आलिंगन देऊं पाहात आहे. तुझें चुंबन घेऊं पाहात आहे.

**भवति विलम्बिनि विगलितलज्जा ।**
**विलपति रोदिति वासकसज्जा ॥ ७ ॥**

भवति विलम्बिनि विगलित-लज्जा ।
विलपति रोदिति वासक-सज्जा ॥ ७ ॥

तुझ्या प्रीतीचें सुख हाच तिला आधार आहे. त्यामुळें तिनें तुझ्यासाठीं लाज सोडून दिली आहे. तुझ्याशीं रतिकेली करावयास सज्ज होऊन ती लताकुंजांत तुझी वाट पाहात आहे. तूं अजून जवळ न गेल्यामुळें शोक करीत आहे, रडत आहे.

**श्रीजयदेवकवेरिदमुदितम् ।**
**रसिकजनं तनुतामतिमुदितम् ॥ ८ ॥**

श्री-जयदेव-कवेः इदम् उदितम् ।
रसिक-जनम् तनुताम् अति-मुदितम् ॥ ८ ॥

जयदेव कवीनें हें गीत गाइलें आहे. काव्यरसाचा आस्वाद ज्यांना घेतां येतो त्यांचा आनंद या गीतानें वाढो.

*बारावी अष्टपदी समाप्त*

**विपुलपुलकपालिः स्फीतसीत्कारमन्त-**
**र्जनितजडितकाकुव्याकुलं व्याहरन्ती ।**
**तव कितव विधायामन्दकन्दर्पचिन्तां**
**रसजलनिधिमग्ना ध्यानलग्ना मृगाक्षी ॥ २ ॥**

विपुल-पुलक-पालिः स्फीत-सीत्कारम् अन्तः-
जनित-जडित-काकु-व्याकुलम् व्याहरन्ती ।
तव कितव विधाय अमन्द-कन्दर्प-चिन्ताम्
रस-जलनिधि-मग्ना ध्यान-लग्ना मृगाक्षी ॥ २ ॥

हे धूर्ता, रतिलीलेंतील तुझ्या ओघवान् कुशलतेची तिला सारखी आठवण होत आहे. ही आठवण करतां करतां ती मृगाक्षी त्याच ध्यानांत गुंग होऊन जात आहे. प्रणयपूर्तीच्या आनंदसागरांत ती डुंबत आहे. तिचें सर्वांग रोमांचांनीं फुलत आहे. तिच्या मुखांतून सीत्कार निघत आहेत आणि हळूहळू तृप्तीची जडता दाटूं लागली म्हणजे विकारव्याकुलतेची कुजबुज तिच्या ओठांतून प्रकटत आहे.

**अङ्गेष्वाभरणं करोति बहुशः पत्रेऽपि सञ्चारिणि**
**प्राप्तं त्वां परिशङ्कते वितनुते शय्यां चिरं ध्यायति ।**
**इत्याकल्पविकल्पतल्परचनासङ्कल्पलीलाशत-**
**व्यासक्तापि विना त्वया वरतनुर्नैषा निशां नेष्यति ॥ ३ ॥**

अङ्गेषु आभरणम् करोति बहुशः पत्रे अपि सञ्चारिणि
प्राप्तम् त्वाम् परिशङ्कते वितनुते शय्याम् चिरम् ध्यायति ।
इति आकल्प-विकल्प-तल्प-रचना-सङ्कल्प-लीला-शत –
व्यासक्ता अपि विना त्वया वर-तनुः न एषा निशाम् नेष्यति ॥ ३ ॥

तुझ्या डोळ्यांत भरावा म्हणून ती नाना तऱ्हांनीं शरीराचा शृंगार करीत आहे. पानांची जरा हालचाल झाली कीं, तूं आलास असा भास तिला होत आहे. तो भास होताच ती किसलयांची शय्या सारखी करून तुझ्या चिंतनांत रंगत आहे. तूं आल्यावर मी अशी बसेन, अशी हसेन, अशी जवळ सरेन, शयनावर इथें अशी राहीन, मग तूं अशी प्रीति करशील असे शेंकडों संकल्प करण्यांत ती सारखी दंगलेली आहे; परंतु प्रत्यक्षांत मात्र तूं नाहींस ही जाणीव होतांच त्या सुंदरीला रात्र लोटणें अशक्य होत आहे.

पुढील श्लोकांत सर्गाच्या शेवटचा आशीर्वाद आहे.

**किं विश्राम्यसि कृष्णभोगिभवने भाण्डीरभूमीरुहि**
**भ्रातर्यासि न दृष्टिगोचरमितः सानन्दनन्दास्पदम् ।**
**राधाया वचनं तदध्वगमुखान्नन्दान्तिके गोपतो**
**गोविन्दस्य जयन्ति सायमतिथिप्राशस्त्यगर्भा गिरः ॥ ४ ॥**

किम् विश्राम्यसि कृष्ण-भोगि-भवने भाण्डीर-भूमीरुहि
भ्रातः यासि न दृष्टि-गोचरम् इतः स-आनन्द-नन्द-आस्पदम् ।
राधायाः वचनम् तत् अध्वग-मुखात् नन्द-अन्तिके गोपतः
गोविन्दस्य जयन्ति सायम् अतिथि-प्राशस्त्य-गर्भाः गिरः ॥ ४ ॥

सायंकालचा समय होता. कृष्ण आपल्या पित्याजवळ बसलेला होता. एवढ्यांत एक प्रवासी त्या नंदमंदिरांत आला आणि नंदाला म्हणाला,

"इथें पलीकडे मोठें वडाचें झाड आहे. तिथेंच मीं रात्रीसाठीं पडशी पसरली होती. परंतु तेथें मला कोणी तरी म्हणालें, 'तूं या भांडीर वडाखालीं कां विश्रांति घेत आहेस? हा वड म्हणजे भयानक कृष्णसर्पाचें घर आहे. हें समोर दिसत आहे तें नंदाचें घर. तें सर्व सुखसोईंनीं युक्त आहे. तूं तेथेंच कां जात नाहींस?' हें ऐकून मी इथें आलों आहें."

हा प्रवासी म्हणजे राधेचा निरोप घेऊन आलेला आपला सखा आहे, हें कृष्णानें ओळखलें. त्या निरोपाचा अर्थहि त्यानें ओळखला. ती त्यांचें नेहमींचें संकेतस्थल जें भांडीरवट त्या वडाखालीं त्याची वाट पाहात आहे; कृष्णाच्या भोगविलासाचें शयनमंदिर असा तो वटवृक्ष; त्याखालीं कोणी परका आलाच तर राधा त्याला तिथें कृष्णसर्पाचें बीळ आहे असें चतुर श्लेषानें सांगून भीति घालीत आहे व पळवून लावीत आहे; प्रणयसुखाला आवश्यक जसा एकान्त तिनें निर्मिला आहे आणि त्याला सारे भोग मिळावे अशी सुविधा केली आहे.

निरोपाचा हा अर्थ समजतांच कृष्णाला आनंद झाला; परंतु या अर्थाचा संशय नंदाला येणार नाहीं याची काळजी घेणें भाग होतें. त्यामुळें त्यानें त्या अतिथीचें मोठ्या अर्थगर्भ गूढ वाणीनें स्वागत केलें. त्या वाणीचा विजय असो.

*प्रबंध बारावा समाप्त*
*सहावा सर्ग समाप्त*

# सर्ग सातवा : नागरनारायण ( सुसंस्कृत कृष्ण )

## प्रबंध तेरावा

**अत्रान्तरे च कुलटाकुलवर्त्मघात**
**सञ्जातपातक इव स्फुटलाञ्छनश्रीः ।**
**वृन्दावनान्तरमदीपयदंशुजालै-**
**र्दिक्सुन्दरीवदनचन्दनबिन्दुरिन्दुः ॥ १ ॥**

अत्र अन्तरे च कुलटा कुल-वर्त्म-घात
सञ्जात-पातक इव स्फुट-लाञ्छन-श्रीः ॥
वृन्दावन-अन्तरम् अदीपयत् अंशु-जालैः
दिक्-सुन्दरी-वदन-चन्दन-बिन्दुः इन्दुः ॥ १ ॥

ओहो ! इतक्यांतच हा चंद्र उगवलासुद्धां ! त्याच्या किरणाचे दिवे वृंदावन उजळत आहेत. दिशा एखाद्या सुंदर स्त्रीप्रमाणें शोभत आहे. चंद्र तिच्या भालप्रदेशावरील चंदनाच्या टिकलीप्रमाणें दिसत आहे.

अरे, पण या चंद्राच्या अंगावर हा डाग कसला ? हं. कळलें. अंधारांतून प्रियकराकडे जाणाऱ्या कामिनीची वाट यानें उजळली आहे. आतां त्या लपून पुढें जाऊं शकत नाहींत. प्रणयिनींच्या मार्गांत अडचण आणण्याचें पाप यानें केलें आहे; आणि तेंच या डागाच्या रूपानें त्याच्या अंगावर उठलें आहे.

**प्रसरति शशधरबिम्बे विहितविलम्बे च माधवे विधुरा ।**
**विरचितविविधविलापं सा परितापं चकारोच्चैः ॥ २ ॥**

प्रसरति शश-धर बिम्बे विहित-विलम्बे च माधवे विधुरा ।
विरचित-विविध-विलापम् सा परितापम् चकार उच्चैः ॥ २ ॥

चंद्राचें बिंब अधिकाधिक उजळत आहे. कृष्णाला यावयास अजूनहि उशीर होत आहे. राधेला त्यामुळें असह्य दुःख होत आहे आणि ती विरहिणी उंच आवाजांत विलापिका गात आहे.

## अष्टपदी तेरावी

राग – मालवगौड : ताल – प्रतिमंठ

**यामि हे कमिह शरणं**
**सखीजनवचनवञ्चिता ॥ ध्रु० ॥**

यामि हे कम् इह शरणम्
सखी-जन-वचन-वञ्चिता ॥ ध्रु० ॥

कृष्ण येईल. तो तुझे मनोरथ पुरवील अशा थापा मारून मला माझ्या सख्यांनीं फसविलें आहे. ज्यांनीं मदत करावयाची त्यांनींच असें फसविल्यावर मी आतां. कुणाला शरण जाऊं ?

**कथितसमयेऽपि हरिरहह न ययौ वनं ।**
**मम विफलमेतदनुरूपमपि यौवनम् ॥ १ ॥**

कथित-समये अपि हरिः अहह न ययौ वनम् ।
मम विफलम् एतद् अनुरूपम् अपि यौवनम् ॥ १ ॥

यावेळीं येतों म्हणून सांगूनहि कृष्ण इथें वनांत आला नाहीं. अरेरे! माझें सारें तारुण्य आणि सौंदर्य विफल आहे. माझ्या तारुण्याला शोभेसें माझें सौंदर्य असा मला अभिमान. पण कृष्णाला जर रुचत नसेल तर हें सारें काय उपयोगी !

**यदनुगमनाय निशि गहनमपि शीलितम् ।**
**तेन मम हृदयमिदमसमशरकीलितम् ॥ २ ॥**

यत् अनुगमनाय निशि गहनम् अपि शीलितम्
तेन मम हृदयम् इदम् असम-शर-कीलितम् ॥ २ ॥

त्याची भेट व्हावी म्हणून मी इतक्या अवेळीं इतक्या अडचणी सोसून इथें आलें. तो मात्र याची मुळींच किंमत न करतां दूर राहिला आहे आणि मदनाच्या शरांनीं माझ्या काळजांत घरे करीत आहे.

**मम मरणमेव वरमिति वितथकेतना ।**
**किमिति विषहामि विरहानलमचेतना ॥ ३ ॥**

मम मरणम् एव वरम् इति वितथ-केतना ।
किम् इति विषहामि विरह-अनलम् अचेतना ॥ ३ ॥

प्रियकराला न रुचणारं माझें हें देहसौंदर्य व्यर्थच आहे. आतां मला मरण येईल तर बरें. मी मरून अचेतन झालें म्हणजे निदान विरहाग्नीचा ताप सहन करणें तरी मला शक्य होईल.

**मामहह विधुरयति मधुरमधुयामिनी ।**
**काऽपि हरिमनुभवति कृतसुकृतकामिनी ॥ ४ ॥**

माम् अहह विधुरयति मधुर-मधु-यामिनी ।
का अपि हरिम् अनुभवति कृत-सुकृत-कामिनी ॥ ४ ॥

रतिसुखांत माधुरी ओतण्यासाठींच फुललेली ही मधुनिशा मला मात्र एकटीलाच विरहानें लोटावी लागत आहे. दुसरीच कोणी पुण्यवान् स्त्री यावेळीं कृष्णाशीं शृंगारसुख भोगत आहे.

**अहह कलयामि वलयादिमणिभूषणम् ।**
**हरिविरहदहनवहनेन बहुदूषणम् ॥ ५ ॥**

अहह कलयामि वलय-आदि-मणि-भूषणम् ।
हरि-विरह-दहन-वहनेन बहु-दूषणम् ॥ ५ ॥

रत्नमाणकांचे हे हार ! हीं सुवर्णकंकणें ! कृष्णभेटीस आतुर होऊन मीं हीं अंगावर घातलीं तेव्हां मला हीं भूषणें वाटलीं. पण आतां कृष्णाच्या विरहाची व्यथा असह्य झाल्यावर मला तीं बेड्यांसारखीं वाटत आहेत.

**कुसुमसुकुमारतनुमतनुशरलीलया ।**
**स्रगपि हृदि हन्ति मामतिविषमशीलया ॥ ६ ॥**

कुसुम-सुकुमार-तनुम् अ-तनु-शर-लीलया ।
स्रग् अपि हृदि हन्ति माम् अति-विषम-शीलया ॥ ६ ॥

ही पुष्पमाला ! मी तिच्याचसारखी सुकुमार म्हणून तिला तरी माझी दया यावी ? पण तिच्या सुकुमारतेशीं विसंगत असा कठोरपणा तिच्यांत शिरला आहे. मदनाच्या बाणाचें रूप घेऊन ती माझा प्राणच हरण करीत आहे.

**अहमिह निवसामि नगणितवनवेतसा ।**
**स्मरति मधुसूदनो मामपि न चेतसा ॥ ७ ॥**

अहम् इह निवसामि न-गणित-वन-वेतसा ।
स्मरति मधु-सूदनो माम अपि न चेतसा ॥ ७ ॥

हें कांटेरी वन, या वेताच्या जाळ्या. यांची तमा न धरतां मी इथें येऊन थांबलें आहें. कृष्ण मात्र यावेळीं दुसऱ्याच कुणाला तरी सुखवीत आहे. शरीरानें तो माझ्याजवळ नाहींच. पण मनानेंहि त्याला माझें स्मरण होत नाहीं.

**हरिचरणशरणजयदेवकविभारती ।**
**वसतु हृदि युवतिरिव कोमलकलावती ॥ ८ ॥**

हरि-चरण-शरण-जयदेव-कवि-भारती ।
वसतु हृदि युवतिः इव कोमल-कलावती ॥ ८ ॥

जयदेवाची ही कविता कृष्णाच्या चरणगायनास वाहिली आहे. शृंगारकलापारगत नाजुक स्त्री जशी रसिकांच्या मनांत घर करून बसते तशी ही कविता बसो.

*तेरावी अष्टपदी समाप्त*

**तत्किं कामपि कामिनीमभिसृतः किंवा कलाकेलिभि**
**र्बद्धो बन्धुभिरन्धकारिणि वनोपान्ते किमु भ्राम्यति ।**
**कान्तः क्लान्तमना मनागपि पथि प्रस्थातुमेवाक्षमः**
**संकेतीकृतमञ्जुवञ्जुललताकुञ्जेऽपि यन्नागतः ॥ २ ॥**

तत् किम् काम् अपि कामिनीम् अभिसृत: किंवा कला-केलिभि:
बद्ध: बन्धुभि: अन्धकारिणि वन-उपान्ते किमु भ्राम्यति ।।
कान्त: क्लान्त-मना: मनाग् अपि पथि प्रस्थातुम् एव अ-क्षम:
संकेतीकृत मञ्जु-वञ्जुल-लता-कुञ्जे अपि यत् न आगत: ।। ३ ।।

कृष्ण अजून आला नाहीं. खरेंच का तो दुसऱ्या तरुणीच्या संगतींत रमला आहे? कीं सवंगड्यांशीं खेळण्यांत रमल्यामुळें त्याला या संकेताचा विसर पडला आहे? कीं या अंधारलेल्या वनांतून माझ्याकडे येतांना वाट चुकून तो भलतीकडेच भटकत आहे? कीं माझ्या विरहानें व्याकुळ होऊन थकल्यामुळें तो मधेंच कुठेंतरी बसला आहे? त्याला इथें यावयास अवसानच उरलेलें नाहीं काय? असेंच असावें. त्यामुळेंच या मनोहर वेतकुंजांत भेटण्याचा संकेत ठरवूनहि तो आलेला नाहीं.

*तेरावा प्रबंध समाप्त*

## प्रबंध चवदावा

**अथागतां माधवमन्तरेण सखीमियं वीक्ष्य विषादमूकाम् ।**
**विशङ्कमाना रमितं कयापि जनार्दनं दृष्टवदेतदाह ।। १ ।।**

अथ आगतम् माधवम् अन्तरेण सखीम् इयम् वीक्ष्य विषाद-मूकाम् ।
विशङ्कमाना रमितम् कया अपि जनार्दनम् दृष्टवत् एतत् आह ।।१।।

इतक्यांत सखी परत आली. ती कांहीं न बोलतां खालीं मान घालून उभी राहिली. तिच्या बरोबर कृष्ण आलेला दिसला नाहीं. तेव्हां तो दुसऱ्या स्त्रीशीं विलास करीत असावा हेंच खरें अशी शंका राधेला आली. तिला ते विलास तिच्यासमोर घडतांना दिसूं लागले आणि ती म्हणाली.

## अष्टपदी चवदावी

राग—वसंत : ताल—एकताल

**कापि चपला मधुरिपुणा**
**विलसति युवतिरधिकगुणा ।। ध्रु० ।।**

का अपि चपला मधु-रिपुणा ।
विलसति युवतिः अधिक-गुणा ।। ध्रु० ।।

ही पाहा कुणीतरी चपला कृष्णाशीं रतिविहार करीत आहे. ती माझ्याहून अधिक रूपवती आहे. माझ्याहून अधिक कलागुणी आहे.

**स्मरसमरोचितविरचितवेषा ।**
**गलितकुसुमदलविलुलितकेशा ॥ १ ॥**

स्मर-समर-उचित-विरचित-वेषा ।
गलित-कुसुम-दल-विलुलित-केशा ।। १ ।।

अभिसाराच्या संकेताच्या वेळीं भरजरी वजनदार वस्त्रें, हिऱ्यामोत्यांचे बोजड अलंकार, गुंतागुंतीची केशभूषा यांची अडचणच व्हायची ! हलकाफुलका अंधारांत विरून जाणारा निळा वेष आणि स्पर्शसुगम मोकळा देह हाच शृंगार तेव्हां हवा. हिनेंहि प्रीतीच्या लढाईंत अडथळा न आणणारी असलीच उचितशी वेषभूषा केलेली आहे. पाहा या समरांत हिचे केस स्वैर मोकळे सुटलेले आहेत. त्यांतील सैलसर गुंफलेलीं फुलें खालीं ओघळलीं आहेत.

**हरिपरिरम्भणवलितविकारा ।**
**कुचकलशोपरि तरलितहारा ॥ २ ॥**

हरि-परिरम्भण-वलित-विकारा ।
कुच-कलश-उपरि तरलित-हारा ।। २ ।।

कृष्णानें हिला मिठींत धरल्यामुळें हिच्या वासनांना भरतें आलें आहे. त्यामुळें तिचें ऊर उसळत आहे आणि त्यावरील पुष्पहार थरथरत आहे.

**विचलदलकललिताननचन्द्रा ।**
**तदधरपानरभसकृततन्द्रा ॥ ३ ॥**

विचलद्-अलक-ललित-आनन-चन्द्रा ।
तत-अधर-पान-रभस-कृत-तन्द्रा ।। ३ ।।

केसांच्या उस्कटलेल्या बटा तिच्या चंद्रगौर मुखावर चोहींकडे विखुरल्या आहेत. तिचे ओठ कृष्णाच्या अधराशीं जडल्यामुळें अमृतपानाच्या आवेगांत तंद्री लागून ती बेभान झाली आहे.

**चञ्चलकुण्डलदलितकपोला ।**
**मुखरितरसनजघनगतिलोला ॥ ४ ॥**

चञ्चल-कुण्डल-दलित-कपोला ।
मुखरित-रसन-जघन-गति-लोला ॥ ४ ॥

तिच्या कानांतील लोलक झुलत आहेत. त्यामुळें तिचे गाल सुंदर दिसत आहेत. ती आपला जघनभाग लोलुपपणें हाल्वीत आहे त्यामुळें तिच्या कमरेवरील मेखला रुणझुणत आहे.

**दयितविलोकितलज्जितहसिता ।**
**बहुविधकूजितरतिरसरसिता ॥ ५ ॥**

दयित-विलोकित-लज्जित-हसिता ।
बहु-विध-कूजित-रति-रस-रसिता ॥ ५ ॥

कृष्ण सारखा तिच्या डोळ्यांतील भाव वाचीत आहे. त्यामुळें लाजून गोडगोड हसत आहे. रतिरसांत पार रंगून गेल्यामुळें ती सारखी सारखी प्रीतीची कुजबूज करीत आहे.

**विपुलपुलकपृथुवेपथुभङ्गा ।**
**श्वसितनिमीलितविकसदनङ्गा ॥ ६ ॥**

विपुल-पुलक-पृथु-वेपथु-भङ्गा ।
श्वसित-निमीलित-विकसत्-अनङ्गा ॥ ६ ॥

हिच्या अंगावर रोमांच्याचा केवढा तरी कांटा फुललेला आहे. ही आनंदाने थरथरली आहे. शहारली आहे. प्रीतीचा आवेग वाढल्यामुळें हिचे नेत्र मिटले आहेत. हिला श्वास लागला आहे.

**श्रमजलकणभरसुभगशरीरा ।**
**परिपतितोरसि रतिरणधीरा ॥ ७ ॥**

श्रम-जल-कण-भर-सुभग-शरीरा ।
परि-पतित-उरसि रति-रण-धीरा ॥ ७ ॥

हिच्या सुंदर शरीराच्या रोमरोमांतून घामाचे कण फुलत आहेत. ही रतियुद्धांत मोठी पारंगत आहे. ही कृष्णाला जणू युद्धांत पराभूत करीत आहे.

**श्रीजयदेवभणितहरिरमितम् ।**
**कलिकलुषं जनयतु परिशमितम् ॥ ८ ॥**

श्री-जयदेव-भणित-हरि-रमितम् ।
कलि-कलुषम् जनयतु परिशमितम् ॥ ८ ॥

जयदेव कवीनें या गीतांत कृष्णाच्या रतिलीलांचें वर्णन केलेलें आहे. हें गीत कलियुगांत उत्पन्न होणाऱ्या अनेक संतापांपासून रसिक वाचकांना मुक्त करणारें आहे.

*चवदावी अष्टपदी समाप्त*
*चवदावा प्रबंध समाप्त*

## प्रबंध पंधरावा

**विरहपाण्डुमुरारिमुखाम्बुजद्युतिरयं तिरयन्नपि वेदनाम् ।**
**विधुरतीव तनोति मनोभुवः सुहृदये हृदये मदनव्यथाम् ॥ १ ॥**

विरह-पाण्डु-मुर-अरि-मुख-अम्बुज-
द्युतिः अयम् तिरयन् अपि वेदनाम् ।
विधुः अतीव तनोति मनो-भुवः
सु-हृदये हृदये मदन-व्यथाम् ॥ १ ॥

माझ्या विरहानें व्याकुळ झालेला कृष्ण जसा फिकट दिसतो तसा हा चंद्र आतां फिकट दिसत आहे. वस्तुतः हा आपल्या शीतल किरणांनीं साऱ्या जगाच्या वेदनांवर उतारा देतो. परंतु आतां मात्र तो मदनाचा मित्र झाला आहे आणि त्याच्याशीं सहकार करून त्यानें माझ्या मनांत रुजविलेली कृष्णविरहाची व्यथा हा कृष्णाची आठवण करून देऊन वाढवीत आहे.

# अष्टपदी पंधरावी

राग–गुर्जरी : ताल–एकताल

**रमते यमुनापुलिनवने विजयी मुरारिरधुना ॥ ध्रु० ॥**

रमते यमुना-पुलिन-वने विजयी मुर-अरिः अधुना ॥ ध्रु० ॥

स्त्रियांच्या चित्तावर विजय मिळविणारा कृष्ण आतां यमुनेच्या तीरावरील कुंजवनांत रतिविहार करीत आहे.

**समुदितमदने रमणीवदने चुम्बनवलिताधरे ।**
**मृगमदतिलकं लिखति सपुलकं मृगमिव रजनीकरे ॥ १ ॥**

स-मुदित-मदने रमणी-वदने चुम्बन-वलित-अधरे ।
मृग-मद-तिलकम् लिखति स-पुलकम् मृगम् इव रजनी-करे ॥१॥

या सुंदरीचें वदन प्रीतिभावनेनें फुललेलें आहे. चुंबनांत सहकार देण्यासाठीं तिनें आपला अधरोष्ठ वळविला आहे. कृष्ण तिच्या ललाटावर कस्तुरीचा टिळा लावीत आहे. त्यामुळें तिच्या मुखावर रोमांचांचे रंग उसळत आहेत. तिच्या गौर वदनावर कृष्णानें लाविलेला हा काळा टिळा धवल चंद्रावरील काळ्या हरिणाप्रमाणें दिसत आहे.

**घनचयरुचिरे रचयति चिकुरे तरलिततरुणानने ।**
**कुरवककुसुमं चपलासुषमं रतिपतिमृगकानने ॥ २ ॥**

घन-चय-रुचिरे रचयति चिकुरे तरलित-तरुण-आनने ।
कुरवक-कुसुमम् चपला-सुषमम् रति-पति-मृग-कानने ॥ २ ॥

हिचे केस अतिशय विपुल आणि सुंदर आहेत. वर्षाकालीं उधळणाऱ्या मेघांप्रमाणें ते शोभत आहेत. सिंहासारख्या पराक्रमी मदनानें याच विपुल केसांत आपलें साम्राज्य रचावें आणि तेथून मारा करून तरुणांच्या दृष्टीला चंचल करावें यांत काय नवल! कृष्णहि या केसांवर लुब्ध झाला आहे आणि त्यांत लाल कोरांटीची वेणी गुंफत आहे. काळ्या ढगांत तेजाळ वीज चमकावी तशी या केशसंभारांत ती वेणी शोभत आहे.

**घटयति सुघने कुचयुगगगने मृगमदरुचिरूषिते ।**
**मणिसरममलं तारकपटलं नखपदशशिभूषिते ॥ ३ ॥**

घटयति सु-घने कुच-युग-गगने मृग-मद-रुचि-रूषिते ।
मणि-सरम् अ-मलम् तारक-पटलम् नख-पद-शशि-भूषिते ॥ ३ ॥

हिचें वक्षस्थळ आकाशाच्या घुमटासारखें उंच, वाटोळें आणि विशाल आहे. फक्त आकाशाचा निळसर रंग तेवढ्या या गोऱ्या गोऱ्या स्तनमंडलांत कमी होता. कस्तुरीचा लेप लावून कृष्ण इथें निळा रंग भरीत आहे. आतां या निळ्या आकाशांत तो नखांनीं अर्धचंद्राकार खुणा करून चंद्राची स्थापना करीत आहे. आणि चंद्राभोंवतीं आतां तारका हव्यात म्हणून चमकदार तेजस्वी मोत्यांचा हार तो त्या स्तनमंडलावरील नखचंद्राभोंवतीं रचीत आहे.

**जितबिसशकले मृदुभुजयुगुले करतलनलिनीदले ।**
**मरकतवलयं मधुकरनिचयं वितरति हिमशीतले ॥ ४ ॥**

जित-बिस-शकले मृदु-भुज-युगुले कर-तल-नलिनी-दले ।
मरकत-वलयम् मधुकर-निचयम् वितरति हिम-शीतले ॥ ४ ॥

हिचे लाल कोवळे तळव लाल कमलासारखे नाजूक आणि सुरेख आहेत. तिच्या भुजा-सुद्धां कमलनालांनीं लाजावें अशा कोमल आहेत. या हातांचा स्पर्श त्याला हिमकणांप्रमाणें शीतल वाटत आहे. सुखशीतल अशा या करकमलांच्या सौंदर्यांत फक्त भ्रमरांचीच उणीव आहे असे वाटून निळ्या तेजाचा मयसभा निर्माण करणाऱ्या इंद्रनीलाचीं कंकणें तो या हातांत घालीत आहे.

**रतिगृहजघने विपुलापघने मनसिजकनकासने ।**
**मणिमयरसनं तोरणहसनं विकिरति कृतवासने ॥ ५ ॥**

रति-गृह-जघने विपुल-अपघने मनसिज-कनक-आसने ।
मणिमय-रसनम् तोरण-हसनम् विकिरति कृत-वासने ॥ ५ ॥

तिचा अतिशय विस्तीर्ण असा जघनप्रांत प्रीतींतील तृप्तीच्या मंदिरासारखा दिसत आहे. मदनराजाचें वैभवशाली असें सुवर्ण-सिंहासन तें हेंच आहे. हिनें मदनाच्या महोत्सवासाठीं

हें सिंहासन धूपानें सुगंधित केलें आहे. मला सोडून कृष्ण हिला वश झाला तें उगाच नाहीं. सुगंधानें उत्तेजित झाल्यावर कोणता कामुक वश होणार नाहीं? या गंधोद्दाम सिंहासनाभोंवतीं तोरणांची उणीव आहे. त्यामुळेंच जणू आपल्या भरदारपणानें तोरणांना हसणारी ही रत्नकांची कृष्ण या आसनाभोंवतीं बांधत आहे. बांधतां बांधतां त्याच्या हाताचा तिच्या जघनाला स्पर्श झाल्यामुळें त्याच्या हाताला कंप सुटत आहे, आणि त्यामुळें या मेखलेचा बंध नीट बसत नाहीं.

**चरणकिसलये कमलानिलये नखमणिगणपूजिते ।**
**बहिरपवरणं यावकभरणं जनयति हृदि योजिते ॥ ६ ॥**

चरण-किसलये कमला-निलये नख-मणि-गण-पूजिते ।
बहिः अपवरणम् यावक-भरणम् जनयति हृदि योजिते ॥ ६ ॥

आतां याला काय म्हणूं? प्रत्यक्ष लक्ष्मी जिथें राहते त्या आपल्या हृदयावरच कृष्णानें या नटमोगरीचीं पावलें उचलून धरलीं आहेत. हीं पावलें कोवळ्या पालवीसारखीं लालसर आणि रसरशीत आहेत. माणकांसारख्या लाल लाल नखांनीं तीं अधिकच सुंदर दिसत आहेत. आतां हा कामुक तिच्या पायांवरचें आवरण दूर करीत आहे आणि अळित्याच्या रसानें त्या पायांवर आकृति चितारीत आहे.

**रमयति सुदृशं काममपि सुभृशं खलहलधरसोदरे ।**
**किमफलमवसं चिरमिह विरसं वद सखि विटपोदरे ॥ ७ ॥**

रमयति सु-दृशम् कामम् अपि सु-भृशम् खल-हल-धर-सोदरे ।
किम् अफलम् अवसम् चिरम् इह वि-रसम् वद सखि विटप-उदरे ॥७॥

तिच्या सुंदर डोळ्यांतील आमंत्रणाला भुलून बलरामाचा हा कपटी भाऊ आतां तिच्याशीं आवेगानें रतिलीला करीत आहे. यानें माझा पुरता विरस केला आहे. आतां मी या लताकुंजांत वशासाठीं अधिक वेळ थांबूं? सांग. सखी सांग.

**इह रसभणने कृतहरिगुणने मधुरिपुपदसेवके ।**
**कलियुगरचितं न वसतु दुरितं कविनृपजयदेवके ॥ ८ ॥**

इह रस-भणने कृत-हरि-गुणने मधु-रिपु-पद-सेवके ।
कलि-युग-रचितम् न वसतु दुरितम् कवि-नृप-जयदेवके ॥ ८ ॥

कवींचा राजा जयदेव यानें हें अत्यंत रसाळ गीत रचिलेलें आहे. कृष्णाच्या चरणीं शरण जाऊन त्यानें यांत त्याच्या लीला वर्णन केल्या आहेत. कलियुगानें उत्पन्न केलेलीं दुःखें या गीतांतील माधुरीपुढें टिकणार नाहींत.

*पंधरावी अष्टपदी समाप्त*

**नायातः सखि निर्दयो यदि शठस्त्वं दूति किं दूयसे**
**स्वच्छन्दं बहुवल्लभः स रमते किं तत्र ते दूषणम् ।**
**पश्याद्य प्रियसङ्गमाय दयितस्याकृष्यमाणं गुणै-**
**रुत्कण्ठार्तिभरादिव स्फुटदिदं चेतः स्वयं यास्यति ॥ २ ॥**

न आयातः सखि निर्दयः यदि शठः त्वम् दूति किम् दूयसे
स्वच्छन्दम् बहु-वल्लभः स रमते किम् तत्र ते दूषणम् ।
पश्य अद्य प्रिय-सङ्गमाय दयितस्य आकृष्यमाणम् गुणैः
उत्कण्ठा-आर्ति-भरात् इव स्फुटत् इदम् चेतः स्वयम् यास्यति ॥२॥

सखी, कृष्ण येतो म्हणून सांगूनहि आला नाहीं. ही त्याची लबाडी. हा त्याचा निर्दयपणा. तूं करावयाचे ते सारे प्रयत्न केलेस. आतां तूं कां खंत करतेस. अनेक स्त्रिया त्याच्यावर लुब्ध आहेत. तो मन मानेल तिच्या संगतींत सुख भोगतो ही का तुझी चूक आहे? त्यानें माझी अशी वंचना केली असली तरी माझें मन त्याच्यावरच लोभलेलें आहे. गळ्यांत दोरी बांधून कुणीं ओढावें तसें कृष्णाच्या गुणांनीं बांधलें गेलेलें तें चित्त त्याच्याकडे ओढलें जात आहे. तूं पाहाच तर खरी ! उत्कंठेची वेदना अनावर झाल्यानें तें आतां माझ्या देहांतून बाहेर पडेल आणि त्या प्रियकराचा सहवास उपभोगण्यासाठीं त्याच्याकडे आपण होऊन जाईल.

*पंधरावा प्रबंध समाप्त*

# प्रबंध सोळावा

**सखि या रमिता वनमालिना ॥ ध्रु० ॥**

सखे, कृष्णानें या सुंदरीला रतिसुख दिलें.

## अष्टपदी सोळावी

राग–देशांक : ताल–रूपक

**अनिलतरलकुवलयनयनेन ।**
**तपति न सा किसलयशयनेन ॥ १ ॥**

अनिल-तरल-कुवलय-नयनेन ।
तपति न सा किसलय-शयनेन ॥ १ ॥

कृष्णाचे नेत्र कमलासारखे सुंदर आहेत. वाऱ्यानें हलून कमल थरथरावें तसे कृष्णाचे हे नयन प्रणयभावनेनें थरारून चंचल झाले. ती प्रणयभावना या गोपीसाठीं होती. त्यामुळें तिला किसलयांची शय्या टोंचत नाहीं. ( मला मात्र ती टोंचत आहे. )

**विकसितसरसिजललितमुखेन ।**
**स्फुटति न सा मनसिजविशिखेन ॥ २ ॥**

विकसित-सरसिज-ललित-मुखेन ।
स्फुटति न सा मनसिज-विशिखेन ॥ २ ॥

कृष्णाचें वदन पूर्ण उमललेल्या कमलाप्रमाणें सुंदर आहे. या वदनाचा आस्वाद तिला मिळाला. तिला आतां मदनाचें बाण छळूं शकत नाहींत. ( ते मला छळतात. )

**अमृतमधुरमृदुतरवचनेन ।**
**ज्वलति न सा मलयजपवनेन ॥ ३ ॥**

अमृत-मधुर-मृदुतर-वचनेन ।
ज्वलति न सा मलयज-पवनेन ॥ ३ ॥

कृष्णाच्या प्रीतिवचनांची गोडी अमृताहूनहि अधिक आहे. तीं वचनें तिनें ऐकिलीं. आतां मलयाचलाचा वारा तिला जाळूं शकत नाहीं. ( तो मला जाळतो. )

**स्थलजलरुहरुचिकरचरणेन ।**
**लुठति न सा हिमकरकिरणेन ॥ ४ ॥**

स्थल-जल-रुह-रुचि-कर-चरणेन ।
लुठति न सा हिम-कर-किरणेन ॥ ४ ॥

कृष्णाचे हातपाय निळ्या भुईकमलाप्रमाणें कोमल आणि सुखस्पर्शी आहेत. यांचा वेढा तिनें अनुभविला. आतां चंद्रकिरण तिला वेदना देत नाहींत. ( ते मला वेदना देतात. )

**सजलजलदसमुदयरुचिरेण ।**
**दलति न सा हृदि चिरविरहेण ॥ ५ ॥**

सजल-जलद-समुदय-रुचिरेण ।
दलति न सा हृदि चिर-विरहेण ॥ ५ ॥

कृष्णाचें अंग जलभऱ्या मेघांच्या समुदायाप्रमाणें सुनील आहे. त्या अंगाचा स्पर्श तिला मिळाला. आतां ती अतूट विरहानें जळत नाहीं. ( मी जळतें. )

**कनकनिकषरुचिशुचिवसनेन ।**
**श्वसिति न सा परिजनहसनेन ॥ ६ ॥**

कनक-निकष-रुचि-शुचि-वसनेन ।
श्वसिति न सा परिजन-हसनेन ॥ ६ ॥

सोन्याच्या वर्णाशीं खुशाल तुलना करावी असा तेजाळ पीतांबर कृष्ण नेसला आहे. त्याचा झुळझुळीत स्पर्श तिला कळला. आतां तिला सख्या हसत नाहींत. शोकाचे निःश्वास तिला टाकावे लागत नाहींत. ( मला मात्र सख्या हसत आहेत आणि मी विरहानें व्यथित आहे. )

**सकलभुवनजनवरतरुणेन ।**
**वहति न सा रुजमतिकरुणेन ॥ ७ ॥**

सकल-भुवन-जन-वर-तरुणेन ।
वहति न सा रुजम् अति-करुणेन ॥ ७ ॥

कृष्ण पृथ्वींतील सर्वश्रेष्ठ तरुण पुरुष आहे. त्याची प्रीति तिला लाभली. त्यामुळें अतिशय दयनीय असें विरहदु:ख तिला सोसावें लागत नाहीं. ( तें मला सोसावें लागतें. )

**श्रीजयदेवभणितवचनेन ।**
**प्रविशतु हरिरपि हृदयमनेन ॥ ८ ॥**

श्री-जयदेव-भणित-वचनेन ।
प्रविशतु हरि: अपि हृदयम् अनेन ॥ ८ ॥

जयदेव कवीनें हें गीत गाइलें आहे. या गीतामुळें रसिकांच्या हृदयांत कृष्णप्रीतीचा उदय होवो.

*सोळावी अष्टपदी समाप्त*

**मनोभवानन्दनचन्दनानिल प्रसीद रे दक्षिण मुञ्च वामताम् ।**
**क्षणं जगत्प्राण विधाय माधवं पुरो मम प्राणहरो भविष्यसि ॥ १ ॥**

मन:-भव-आनन्दन-चन्दन-अनिल प्रसीद रे दक्षिण मुञ्च वामताम् ।
क्षणम् जगत्-प्राण विधाय माधवम् पुर: मम प्राण-हर: भविष्यसि ॥१॥

हे मलयानिला, तूं चंदनाच्या झाडांवरून वाहतोस, त्यामुळें सुगंधी आहेस. गंधलोलुप मदनाला तूं आनंद देतोस; तूं त्याचा मित्र आहेस. पण म्हणून का विरहिणींना छळण्याची ही वांकडी वाट तुला धरायलाच हवी ? जरा दाक्षिण्य दाखव ना ! हा खट्याळ तिढेपणा सोड ना ! हें तुला होत नसेल तर निदान क्षणभर थांब. मला एकदा कृष्णाचें दर्शन घडूं दे. जगाचेच प्राण तुझ्या हातांत असल्यानें माझे प्राण क्षणभर वांचविणें तुला कठीण नाहीं. एकदा मला कृष्णाचें दर्शन घडलें म्हणजे मग खुशाल माझे प्राण हरण कर.

**रिपुरिव सखीसंवासोऽयं शिखीव हिमानिलो**
**विषमिव सुधारश्मिर्दूरं दुनोति मनो गते ।**
**हृदयमदये तस्मिन्नेवं पुनर्वलते बलात्**
**कुवलयदृशां वाम: कामो निकामनिर शः ॥ २ ॥**

रिपुः इव सखी-संवासः अयम् शिखी इव हिम-अनिलः
विषम् इव सुधा-रश्मिः दूरम् दुनोति मनः गते।
हृदयम् अ-दये तस्मिन् एवम् पुनः वलते वलात्
कुवलय-दृशाम् वामः कामः निकाम-निरङ्कुशः ॥ २ ॥

माझ्या साऱ्या सख्या माझ्याभोंवतीं आहेत. पण त्या माझा उपहास करीत असल्यानें माझ्या वैरिणी झाल्या आहेत. थंड वारे वाहात आहेत. पण ते मला अग्नीप्रमाणें जाळीत आहेत. अमृतासारखें चांदणें पसरलें आहे तें मला विषासारखें वाटत आहे. कृष्ण मला सोडून दुसरीकडे गेला म्हणून माझी अशी अवस्था होत आहे. तरीसुद्धां माझें मन पुन्हां पुन्हां त्याच निर्दय कृष्णाकडे जोमानें ओढ घेत आहे. खरोखर बायकांचें प्रेम हें वेडें असतें. निरंकुश हत्तीप्रमाणें अनावर असतें आणि म्हणूनच व्यथाकर असतें.

**बाधां विधेहि मलयानिल पञ्चबाण**
**प्राणान् गृहाण न गृहं पुनराश्रयिष्ये।**
**किं ते कृतान्तभगिनि क्षमया तरङ्गै-**
**रङ्गानि सिञ्च मम शाम्यतु देहदाहः ॥ ३ ॥**

बाधाम् विधेहि मलय-अनिल पञ्चबाण
प्राणान् गृहाण न गृहम् पुनः आश्रयिष्ये।
किम् ते कृतान्त-भगिनि क्षमया तरङ्गैः
अङ्गानि सिञ्च मम शाम्यतु देह-दाहः ॥ ३ ॥

हे मलयानिला, दे. दे. मला आणखी त्रास दे. पंचबाण मदना, सोड. तुझे बाण सोड आणि माझे प्राण हरण कर. उपेक्षित प्रणयिनीच्या अवमानाचें ओझें घेऊन मी आतां घरीं जाणार नाहीं. यमुने, तूं यमाची बहीण. तुला अशी शांत वृत्ति शोभत नाहीं. तूं आपल्या भावाला मदत कर. प्रचंड लाटांनीं उसळ आणि मला ओढून ने. त्या लाटांचा वर्षाव झाला म्हणजे त्यानें तरी ही माझ्या देहाची आग थंड होवो.

पुढें सर्गाच्या शेवटचें आशीर्वचन आहे.

**प्रातर्नीलनिचोलमच्युतमुरः संवीतपीतांशुकं**
**राधायाश्चकितं विलोक्य हसति स्वैरं सखीमण्डले।**

**व्रीडाचञ्चलमञ्चलं नयनयोराधाय राधानने**
**स्वादुस्मेरमुखोऽयमस्तु जगदानन्दाय नन्दात्मजः ॥ ४ ॥**

प्रातः नील-निचोलम् अ-च्युतम् उरः संवीत-पीत-अंशुकम्
राधायाः चकितम् विलोक्य हसति स्वैरम् सखी-मण्डले ।
व्रीडा-चञ्चलम् अञ्चलम् नयनयोः आधाय राधा-आनने
स्वादु-स्मेर-मुखः अयम् अस्तु जगत्-आनन्दाय नन्द-आत्मजः ॥४॥

सकाळ झाली. सख्या जाग्या होऊन पाहतात तों त्यांना काय दिसलें? जें निळें वस्त्र नेसून राधा रात्रीं आली होती तें पांघरून कृष्ण झोंपला होता. कृष्णाचा पीतांबर राधेच्या वक्षस्थलावर पसरला होता. हें पाहतांच सख्या एकीकडे आश्चर्यानें थक्क झाल्या. दुसरीकडे त्यांना हसूं आवरेना. तेव्हां कृष्ण जागा झाला आणि वस्त्रांच्या गडबडीमुळें गोंधळलेल्या राधेकडे मिस्किल नजरेनें पाहूं लागला. नंदनंदन कृष्णाचें हास्यामुळें गोड दिसणारें तें मुखकमल जगांत आनंदाची वाढ करो.

*सोळावा प्रबंध समाप्त*

*सातवा सर्ग समाप्त*

# सर्ग आठवा : विलक्षलक्ष्मीपती (चमत्कारिक वेषांतील कृष्ण)

## प्रबंध सतरावा

**अथ कथमपि यामिनीं निनीय स्मरशरजर्जरितापि सा प्रभाते।**
**अनुनयवचनं वदन्तमग्रे प्रणतमपि प्रियमाह साभ्यसूयम् ॥ १ ॥**

अथ कथम् अपि यामिनीम् निर्नीय
स्मर-शर-जर्जरिता अपि सा प्र-भाते ।
अनुनय-वचनम् वदन्तम् अग्रे
प्रणतम् अपि प्रियम् आह स-अभ्यसूयम् ॥ १ ॥

राधा मदनबाणांनीं जर्जर झाली होती. तिची ती रात्र मोठ्या कष्टानेंच कशीबशी पार पडली. सकाळ झाली तेव्हां कृष्ण आला. त्यानें तिच्या चरणांवर लोटांगण घातलें. लाडी-गोडीचीं वचनें बोलून तो तिचा अनुनय करूं लागला. तेव्हां राधा अत्यंत तीव्र मत्सरानें त्याला म्हणाली.

## अष्टपदी सतरावी

राग–भैरव : ताल–रूपक.

**हरि हरि याहि माधव याहि केशव मा वद कैतववादम् ।**
**तामनुसर सरसीरुहलोचन या तव हरति विषादम् ॥ ध्रु० ॥**

हरि हरि याहि माधव याहि केशव मा वद कैतव-वादम् ।
ताम् अनुसर सरसी-रुह-लोचन या तव हरति विषादम् ॥ ध्रु० ॥

कृष्णा, जा तूं. माधवा, पुरे पुरे. निदान आतां या थापा तरी मारूं नकोस. जा तूं. जा. तूं चंचल लक्ष्मीचाच नवरा. रोज नवा आसरा शोधणाऱ्या चवचाल स्त्रियाच तुला रुचणाऱ्याच्या. जा. तूं, तिकडेच जा. तुझ्या कमलनयनांतील व्यथा ओळखून त्यांवर उपचार करणारी जी कुणी आहे, तिच्याकडे जा.

**रजनिजनितगुरुजागररागकषायितमलसनिमेषम् ।**
**वहति नयनमनुरागमिव स्फुटमुदितरसाभिनिवेशम् ॥ १ ॥**

रजनि-जनित-गुरु-जागर-राग-कषायितम् अलस-निमेषम् ।
वहति नयनम् अनुरागम् इव स्फुटम् उदित-रस-अभिनिवेशम् ॥१॥

अरे झोंपेनं जडावलेल्या तुझ्या डोळ्यांची पापणीसुद्धां तुला उचलत नाहीं. माझ्या-विषयींचें प्रेम उतू जात आहे असा अभिनिवेश तूं करीत आहेस. पण सारी रात्र तिच्यासह केलेल्या धमाल जागरणानें तुझे डोळे तारवटलेले आहेत. जणू तो डोळ्यांचा लाल रंग माझ्या प्रीतीमुळेंच आलेला असेल. नाहीं ?

**कज्जलमलिनविलोचनचुम्बनविरचितनीलिमरूपम् ।**
**दशनवसनमरुणं तव कृष्ण तनोति तनोरनुरूपम् ॥ २ ॥**

कज्जल-मलिन-विलोचन-चुम्बन-विरचित-नीलिम-रूपम् ।
दशन-वसनम् अरुणम् तव कृष्ण तनोति तनोः अनुरूपम् ॥ २ ॥

आजवर तुझें अंगच काळें होतें. पण निदान ओंठ तरी लाल होता. पण आतां तोहि तुझ्या अंगानुरुप काळा झालेला आहे. काजळानें भरलेल्या तिच्या सुंदर डोळ्यांचीं चुंबनें घेऊन घेऊन तो पार बवरलेला आहे. आणि त्याच ओंठांनीं तूं मला थापा मारीत आहेस.

**वपुरनुवहति तव स्मरसङ्गरखरनखरक्षतरेखम् ।**
**मरकतशकलकलितकलधौतलिपेरिव रतिजयलेखम् ॥ ३ ॥**

वपुः अनुवहति तव स्मर-सङ्गर-खर-नखर-क्षत-रेखम् ।
मरकत-शकल-कलित-कलधौत-लिपेः इव रति-जय-लेखम् ॥ ३ ॥

तुझ्या रात्रींच्या प्रीतियुद्धांतील प्रतिपक्षाण मोठी खंदी योद्धी असावी. तिनें आपल्या तीक्ष्ण नखांनीं तुला चांगलेंच ओरखडून काढलेलें आहे. तुझें अंग आधींच निळ्या रत्नाच्या

शिळेसारखें. त्यावर सोन्याच्या अक्षरांत कोरलेला हा विजयी सेनापतीचा जयलेख मोठा छान दिसत आहे. काय रे? हे ओरखडे तूं रात्रीं माझ्याकडे येतांना करवंदीच्या जाळींत अडकलास तेव्हां झाले असतील? नाहीं?

( ओरखड्यांचा रंग लाल. सुवर्णाचा रंग पिवळा. परंतु तें सोनें प्रेमाच्या उष्ण आंचेंत घालून तापविल्यामुळें लाल झालें आहे. अजून तें वितळलेल्या लाल रंगांतच आहे. ओरखडे गरम ताजे आहेत. )

**चरणकमलगलदलक्तकसिक्तमिदं तव हृदयमुदारम्।**
**दर्शयतीव बहिर्मदनद्रुमनवकिसलयपरिवारम् ॥ ४ ॥**

चरण-कमल-गलत्-अलक्तक-सिक्तम् इदम् तव हृदयम् उदारम्।
दर्शयति इव बहिः मदन-द्रुम-नव-किसलय-परिवारम् ॥ ४ ॥

बरें. ओरखडे करवंदीचे. आणि हे छातीवरचे दुसरे लाल डाग? रात्रीं तिचे पाय छातीवर घेऊन तूं बसलास तेव्हां हे तिच्या तळपायांवरील अळित्याचे ठसे तुझ्या छातीवर उठलेले आहेत. मला वाटतें तुझ्या या विशाल हृदयांत माझ्याविषयींच्या प्रीतीचा वृक्ष पालवत आहे. त्याचे हे कोवळे लाल अंकुरच तुझी छाती फोडून बाहेर डोकावत असतील?

**दशनपदं भवदधरगतं मम जनयति चेतसि खेदम्।**
**कथयति कथमधुनापि मया सह तव वपुरेतदभेदम् ॥ ५ ॥**

दशन-पदम् भवत्-अधर-गतम् मम जनयति चेतसि खेदम्।
कथयति कथम् अधुना अपि मया सह तव वपुः एतत् अभेदम् ॥५॥

कृष्णा, ती तुझ्या ओंठांना कडकडून चावली. त्याची ही खूण उठून दिसत आहे. कृष्णा, फार दुखत असेल नाहीं? मला खूप खूप वाईट वाटतेंय रे! तुझें शरीर माझ्या शरीराशीं अजूनहि किती एकरूप आहे त्याची कहाणीच आहे ही! हा व्रण कदाचित् तूं माझ्यासाठीं कमळें आणावयास गेलास तेव्हां भुंगा चावल्यामुळेंहि झाला असेल नाहीं का?

**बहिरिव मलिनतरं तव कृष्ण मनोऽपि भविष्यति नूनम्।**
**कथमथ वञ्चयसे जनमनुगतमसमशरज्वरदूनम् ॥ ६ ॥**

बहि: इव मलिनतरं तव कृष्ण मन: अपि भविष्यति नूनम् ।
कथम् अथ वञ्चयसे जनम् अनुगतम् अ-सम-शर-ज्वर-दूनम् ।। ६ ।।

कृष्णा, तुझें अंगच काळें असें मी आजवर मानीत होतें. पण तुझें अंत:करण त्याहूनहि काळें आहे. तुझ्यांत मन गुंतवून तुझ्यासाठीं झुरतां झुरतां रात्रीं मदनाच्या बाणांनीं माझा जीव घेतला तेव्हां तुला माझी आठवण झाली नाहीं ती नाहींच. पण त्यांत आणखी आतां खोटें बोलून तूं माझी वंचना करीत आहेस

**भ्रमति भवानबलाकवलाय वनेषु किमत्र विचित्रम ।**
**प्रथयति पूतनिकेव वधूवधनिर्दयबालचरित्रम् ॥ ७॥**

भ्रमति भवान् अबला-कवलाय वनेषु किम् अत्र विचित्रम् ।
प्रथयति पूतनिका इव वधू-वध-निर्दय-बाल-चरित्रम् ।। ७ ।।

तूं कृष्ण कसला ? तूं यम आहेस यम. तुझ्यावर विश्वास टाकणाऱ्या बापुड्या अबलांचे प्राण हरण करीत तूं या वनांत फिरत आहेस. आणि यांत नवल तें काय ? मुलाचे पाय पाळण्यांत दिसतात. एवढासा होतास तेव्हां तूं पूतनेचा प्राण घेतलास. बायकांचा निर्दयपणें जीव घेणें हेंच तर तुझें सारें चरित्र आहे.

**श्रीजयदेवभणितरतिवञ्चितखण्डितयुवतिविलापम् ।**
**शृणुत सुधामधुरं विबुधा विबुधालयतोऽपि दुरापम् ॥ ८ ॥**

श्री-जयदेव-भणित-रति-वञ्चित-खण्डित-युवति-विलापम् ।
शृणुत सुधा-मधुरम् विबुधा: विबुध-आलयत: अपि दुरापम् ।। ८ ।।

जयदेवानें या गीतांत प्रियकरानें रतीचें आश्वासन देऊन फसविलेल्या खंडिता नायिकेचा विलाप वर्णिलेला आहे. सुज्ञ सज्जनांनीं हें अमृतासारखें मधुर गीत या इथें भूलोकींच ऐकून घ्यावें. आपल्या पुण्यानें ते स्वर्गांत जातील तेव्हां त्यांना अमृत मिळेल. असें काव्य ऐकावयास मिळणार नाहीं.

*सतरावी अष्टपदी समाप्त*

**तवेदं पश्यन्त्याः प्रसरदनुरागं बहिरिव**
**प्रियापादालक्तच्छुरितमरुणद्योतिहृदयम् ।**
**ममाद्य प्रख्यातप्रणयभरभंगेन कितव**
**त्वदालोकः शोकादपि किमपि लज्जां जनयति ॥ २ ॥**

तव इदम् पश्यन्त्याः प्रसरत्-अनुरागम् बहिः इव
प्रिया-पाद-अलक्त-छुरित-अरुण-द्योति-हृदयम् ।
मम अद्य प्र-ख्यात-प्रणय-भर-भंगेन कितव
त्वत्-आलोकः शोकात् अपि किम् अपि लज्जाम् जनयति ॥ २ ॥

कृष्णा, तिच्या तळपायांवरील अळित्याच्या लालसर खुणांनीं रंगलेलें तुझें हृदय निळ्या आभाळांत उगवणाऱ्या अरुणाच्या रंगाप्रमाणें शोभत आहे. तुझें आणि माझें प्रेम ही चवाठ्यावरची जाहीर गोष्ट झाली त्याची मीं भीति बाळगली नाहीं, लाज बाळगली नाहीं. पण त्या प्रेमाच्या वंचनेची ही लाल पताका तुला निर्लज्जपणें उरावर फडकवितांना पाहून मात्र मला प्रेमनिराशेचें दुःख वाटण्याऐवजीं माझ्या विटंबनेची शरम वाटत आहे.

पुढील श्लोकांत सर्गाच्या अखेरीचें आशीर्वचन आहे.

**अन्तर्मोहनमौलिघूर्णनचलन्मन्दारविस्रंसन-**
**स्तब्धाकर्षणदृष्टिहर्षणमहामन्त्रः कुरङ्गीदृशाम् ॥**
**दृप्यद्दानवदूयमानदिविसद्दुर्वारदुःखापदां**
**भ्रंशः कंसरिपोर्व्यपोहयतु वः श्रेयांसि वंशीरवः ॥ ३ ॥**

अन्तः मोहन-मौलि-घूर्णन-चलन्-मन्दार-विस्रंसन
स्तब्ध-आकर्षण-दृष्टि-हर्षण-महा-मन्त्रः कुरङ्गी-दृशाम् ॥
दृप्यत्-दानव-दूयमान-दिवि-सत्-दु-र्वार-दुःख-आपदाम्
भ्रंशः कंस-रिपोः व्यपोहयतु वः श्रेयांसि वंशी-रवः ॥ ३ ॥

कृष्णाची मुरली वाजत आहे. तिची मोहिनी गोपींच्या अंतःकरणांवर पडत आहे. गीतांत रंगून त्या माना डोलवीत आहेत. त्यामुळें त्यांच्या वेण्या झुलत असून त्यांत गुंफलेलीं मंदाराचीं फुलें खालीं ओघळत आहेत. प्रणयिनी आहेत त्यांची गोष्टच सोडा. ज्या तटस्थ होत्या त्यांचींहि मनें ओढाळ होत आहेत. त्यांचे नेत्र हर्षानें भरत आहेत. हा मुरलीनाद

म्हणजे नुसत्या गोपींच्या जीवनानंदाचाच महामंत्र आहे असें नव्हे, तर उन्मत्त दानवांकडून छळल्या जाणाऱ्या देवाच्या अनावर मनोवेदनांचा शेवट करणारा हा महान् उतारा आहे. कंसाचा वध करणाऱ्या कृष्णाच्या मुरलीचा हा नाद तुमचेंहि कल्याण करो.

*सतरावा प्रबंध समाप्त*
*आठवा सर्ग समाप्त*

# सर्ग नववा : मुग्ध मुकुंद

## प्रबंध अठरावा

**अथ तां मन्मथखिन्नां रतिरसभिन्नां विषादसम्पन्नाम् ।**
**अनुचिन्तितहरिचरितां कलहान्तरितामुवाच रहसि सखी ॥ १ ॥**

अथ ताम् मन्मथ-खिन्नाम् रति-रस-भिन्नाम् विषाद-सम्पन्नाम् ।
अनु-चिन्तित-हरि-चरिताम् कलह-अन्तरिताम् उवाच रहसि सखी ॥१॥

राधेनें कृष्णाशीं भांडण केलें आहे. तो दूर निघून गेला आहे. मनोभंग झाल्यामुळें ती खिन्न झाली आहे. विरहाची आर्तता आणि वंचित प्रीतीचा विषाद यांनीं तिचें चित्त भरून गेलेलें आहे. क्षणभर प्रणयाची भावना दूर ठेवून ती कृष्णाच्या वर्तनाचा विचार करीत आहे. अशा राधेची एकान्तांत समजूत करीत तिची सखी त्या कलहान्तरितेला म्हणत आहे.

## अष्टपदी अठरावी

राग—गुर्जरी : ताल-यती.

**माधवे मा कुरु मानिनि मानमये ॥ ध्रु० ॥**

माधवे मा कुरु मानिनि मानम् अये ।

हे मानिनी राधे, तूं कृष्णावर राग धरूं नकोस.

**हरिरभिसरति वहति मधुपवने ।**
**किमपरमधिकसुखं सखि भवने ॥ १ ॥**

हरिः अभिसरति वहति मधु-पवने ।
किम् अपरम् अधिक-सुखम् सखि भवने ॥ १ ॥

सुखदायक वारा वाहात आहे. कृष्ण तुला शरण घेण्यासाठीं तुझ्याकडे आला आहे. जगन्माता लक्ष्मीचा पति स्वतः तुझ्यामागें यावा याहून दुसरें कोणतें सुख अधिक श्रेष्ठ आहे ?

**तालफलादपि गुरुमतिसरसम् ।**
**किं विफलीकुरुषे कुचकलशम् ॥ २ ॥**

ताल-फलात् अपि गुरुम् अति-सरसम् ।
किम् विफलीकुरुषे कुच-कलशम् ॥ २ ॥

राधे, ताडाच्या फळाहूनहि मोठें असणारें तुझें स्तनमंडल त्या फलांपेक्षांहि कठीण असलें तरी तें प्रीतीच्या मधुर रसानें भरलेलें आहे. कृष्णाच्या स्पर्शानें या पूर्णकलशांतील रस साकार होणार आहे. मग तूं हा क्षण रागावून रुसून कां बरें फुकट घालवीत आहेस ?

**कति न कथितमिदमनुपदमचिरम् ।**
**मा परिहर हरिमतिशयरुचिरम् ॥ ३ ॥**

कति न कथितम् इदम् अनुपदम् अचिरम् ।
मा परिहर हरिम् अतिशय-रुचिरम् ॥ ३ ॥

वेडे, तूं शहाणी आहेस. मी इथें किती वेळ तुझी अशी समजूत काढीत आहें. आतां रुसवा सोड. सर्व सुखाचें आगर असा कृष्ण दाराशीं आला असतां त्याला परत धाडूं नकोस.

**किमिति विषीदसि रोदिषि विकला ।**
**विहसति युवतिसभा तव सकला ॥ ४ ॥**

किम् इति विषीदसि रोदिषि विकला
विहसति युवति-सभा तव सकला ॥ ४ ॥

दारांत आलेल्या कृष्णाला परत पाठवून तूं आतां उगाच दुःख करीत आहेस. विकल होऊन अश्रु ढाळीत आहेस. तुझ्या ओळखीच्या साऱ्या तरुणी तुला हसत आहेत. प्रियकर शरण आला म्हणजे कसें वागावें ही कला त्यांना अवगत आहे. ती तूं अजूनहि शिकली नाहींस म्हणून त्या तुझा उपहास करीत आहेत.

**मृदुनलिनीदलशीतलशयने ।**
**हरिमवलोकय सफलय नयने ॥ ५ ॥**

मृदु-नलिनी-दल-शीतल-शयने ।
हरिम् अवलोकय सफलय नयने ॥ ५ ॥

आतां राग सोड. कमलिनीच्या ओल्या ओल्या मऊ विस्तृत पानांची शीतल शय्या तूं तयार कर. तुझ्या नयनांचें पारणें फेडण्यासाठीं आतां कृष्ण केव्हांहि इथें येईल. त्याचें त्या शयनावर तूं स्वागत कर.

**जनयसि मनसि किमिति गुरुखेदम् ।**
**शृणु मम वचनमनीहितभेदम् ॥ ६ ॥**

जनयसि मनसि किम् इति गुरु खेदम् ।
शृणु मम वचनम् अन्-ईहित-भेदम् ॥ ६ ॥

एकटीनें मनांतल्या मनांत किती शोक करावयाचा ? मीं तुझें कधीं वाईट केलें आहे का ? उठ. माझें म्हणणें ऐक.

**हरिरुपयातु वदतु बहु मधुरम् ।**
**किमिति करोषि हृदयमतिविधुरम् ॥ ७ ॥**

हरिः उपयातु वदतु बहु मधुरम् ।
किम् इति करोषि हृदयम् अति-विधुरम् ॥ ७ ॥

कृष्णाला जवळ येऊं दे. लाडें लाडें बोलूं दे. कारण नसतां आपल्या हृदयाला कां त्रास देत आहेस ?

**श्रीजयदेवभणितमतिललितम् ।**
**सुखयतु रसिकजनं हरिचरितम् ॥ ८ ॥**

श्री-जयदेव-भणितम् अति-ललितम् ।
सुखयतु रसिक-जनम् हरि-चरितम् ॥ ८ ॥

जयदेवानें हें अतिशय ललितमधुर असें गीत गाइलें आहे. कृष्णलीलेचें हें वर्णन काव्याचा रस जाणूं शकणाऱ्या रसिकांना सौख्य देवो.

*अठरावी अष्टपदी समाप्त*

**स्निग्धे यत्परुषासि यत्प्रणमति स्तब्धासि यद्रागिणि**
**द्वेषस्थासि यदुन्मुखे विमुखतां यातासि तस्मिन् प्रिये ।**
**तद्युक्तं विपरीतकारिणि तव श्रीखण्डचर्चाविषं**
**शीतांशुस्तपनो हिमं हुतवहः क्रीडामुदो यातनाः ॥ २ ॥**

स्निग्धे यत् परुषा असि यत् प्रणमति स्तब्धा असि यत् रागिणि
द्वेष-स्था असि यत् उन्मुखे विमुखताम् याता असि तस्मिन् प्रिये ।
तत् युक्तम् विपरीत-कारिणि तव श्री-खण्ड-चर्चा-विषम्
शीत-अंशुः तपनः हिमम् हुतवहः क्रीडा-मुदः यातनाः ॥ २ ॥

कृष्ण प्रेमानें मवाळ झाला आहे. तू असूयेनें कठोर झाली आहेस. तो शरण येऊन प्रार्थना करीत आहे. तूं कांहीं बोलतहि नाहींस. तो प्रेमानें ओथंबला आहे. तूं द्वेषानें खदखदत आहेस. तो समोर येत आहे. तूं पाठ फिरवीत आहेत. प्रियकराशीं वागण्याची का ही रीत? तूं अशी विपरीत वागत आहेस म्हणून जगहि तुला विपरीत दिसत आहे. चंदनाचा लेप थंड. तो तुला विषासारखा दाहक वाटत आहे. चंद्र तुला सूर्यासारखा उष्ण वाटत आहे. हिमकण तुला अग्नीसारखे जाळीत आहेत. रतिक्रीडांच्या आठवणीनें आनंद व्हावा तर तुला यातना होत आहेत तूं प्रियकराला सामोरी जाशील तर या साऱ्यांपासून तुला सुखच होईल.

शेवटीं सर्गसमाप्तीचें आशीर्वचन.

**सान्द्रानन्दपुरन्दरादिदिविसद्वृन्दैरमन्दादरा-**
**दानम्रैर्मुकुटेन्द्रनीलमणिभिः सन्दर्शितेन्दीवरम् ।**
**स्वच्छन्दं मकरन्दसुन्दरगलन्मन्दाकिनीमेदुरं**
**श्रीगोविन्दपदारविन्दमशुभस्कन्दाय वन्दामहे ॥ ३ ॥**

सान्द्र-आनन्द-पुरन्दर-आदि-दिवि-सत्-वृन्दैः अ-मन्द-आदरात्
आनम्रैः मुकुट-इन्द्र-नील-मणिभिः सन्दर्शित-इन्दीवरम् ।
स्वच्छन्दम् मकरन्द-सुन्दर-गलन्-मन्दाकिनी-मेदुरम्
श्री-गोविन्द-पद-अरविन्दम् अशुभ-स्कन्दाय वन्दामहे ॥ ३ ॥

श्रीकृष्णाच्या चरणकमलाला आम्ही वंदन करतों. कमल मकरंदाच्या बिंदूंनीं ओलावलेलें असतें. कृष्णाचे हे चरण मकरन्दाहूनहि मधुर अशा गंगेच्या स्वैर उधळणाऱ्या पाण्यानें

ओलावले आहेत. कमलाभोंवतीं जसे भुंगे नाचत असतात तसे या कृष्णाच्या चरणांभोंवतीं आनंदानें त्याला शरण आलेल्या इंद्र वगैरे देवांच्या मस्तकावरील मुकुटांतल्या इंद्रमण्याचे निळे किरण नाचत आहेत. हे चरणकमळ आमच्या कल्याणाची निर्मिती करोत.

*अठरावा प्रबंध समाप्त*

*नववा सर्ग समाप्त*

# सर्ग दहावा : चतुर चतुर्भुज

## प्रबंध एकोणिसावा

**अथान्तरे मसृणरोषवशामसीम-**
**निःश्वासनिःसहमुखीं सुमुखीमुपेत्य ।**
**सव्रीडमीक्षितसखीवदनां दिनान्ते**
**सानन्दगद्गदपदं हरिरित्युवाच ॥ १ ॥**

अथ अन्तरे मसृण-रोष-वशाम् अ-सीम-
निः-श्वास-निः-सह-मुखीम् सु-मुखीम् उपेत्य ।
स-व्रीडम् ईक्षित-सखी-वदनाम् दिन-अन्ते
स-आनन्द-गद्गद-पदम् हरिः इति उवाच ॥ १ ॥

म्हणतां म्हणतां सूर्यास्ताचा समय झाला आहे. सखीनें सारखी समजूत केल्यामुळें आतां राधेचा रोष किंचित् मवाळ झाला आहे. विरहानें सतत निघालेल्या उष्ण निश्वासांनीं तिचे ओठ सुकलेले आहेत. तिचा अनुनय पुन्हां करण्यासाठीं कृष्ण तिच्याजवळ आलेला आहे. लाजऱ्या अपेक्षेनें आतां राधेचे डोळे सखीकडे वळत आहेत. कृष्ण जवळ येऊन राधेला म्हणत आहे.

## अष्टपदी एकोणिसावी

राग–देशवराडी : ताल–अष्टताल

**प्रिये चारुशीले**
**मुञ्च मयि मानमनिदानम् ।**
**सपदि मदनानलो दहति मम मानसं**
**देहि मुखकमलमधुपानम् ॥ ध्रु० ॥**

प्रिये चारु-शीले
मुञ्च मयि मानम् अ-निदानम् ।
सपदि मदन-अनलः दहति मम मानसम्
देहि मुख-कमल-मधु-पानम् ॥ ध्रु० ॥

प्रिये, सुशीले, माझ्यावरचा हा अकारण राग आतां सोड ना ! तुझी प्रत्येक हालचाल सुंदर असते म्हणून तुला चारुशीला म्हणतात तें शोभतें. हा असुंदर राग तुला शोभत नाहीं. मदनाची बाधा माझ्या मनाला जाळीत आहे. तुझ्या ओंठांतील गोड मध हेंच त्याच्यावर औषध आहे. मला तें पिऊं दे.

**वदसि यदि किञ्चिदपि दन्तरुचिकौमुदी**
**हरति दरतिमिरमतिघोरम् ।**
**स्फुरदधरसीधवे तव वदनचन्द्रमा**
**रोचयति लोचनचकोरम् ॥ १ ॥**

वदसि यदि किञ्चित् अपि दन्त-रुचि-कौमुदी
हरति दर-तिमिरम् अति-घोरम् ।
स्फुरत्-अधर-सीधवे तव वदन-चन्द्रमा
रोचयति लोचन-चकोरम् ॥ १ ॥

अशी गप्प कां ? कांहींतरी बोल. लाडके शब्द बोलायचे नसतील तर रागाचे शब्द बोल. तूं बोलतांना ओंठ विलग झाले कीं दांतांच्या आड दडलेलें चांदणें ओघळेल. त्यामुळें माझ्या भोंवतींचा हा निराशेचा घोर अंधार उजळून जाईल. तुझ्या वदनांतील अमृतमधुर ओलावा मला दिसेल. शीतल चांदण्याच्या दर्शनानें चकोराचें पारणें फिटावें तसें त्या अधरसुधेच्या दर्शनानें माझें पारणें फिटेल.

**सत्यमेवासि यदि सुदति मयि कोपिनी**
**देहि खरनखरशरघातम् ।**
**घटय भुजबन्धनं जनय रदखण्डनं**
**येन वा भवति सुखजातम् ॥ २ ॥**

सत्यम् एव असि यदि सु-दति मयि कोपिनी
देहि खर-नखर-शर-घातम् ॥
घटय भुज-बन्धनम् जनय रद-खण्डनम्
येन वा भवति सुख-जातम ॥ २ ॥

तूं खरंच का माझ्यावर रागावली आहेस. मग उशीर कां? अपराधी मी हा तुझ्यापुढें शरणागत आहें. मला दंड कर ना. बाणांसारख्या कुठोर नखांनी तूं मला टोंच. या तुझ्या भुजांनीं मला बांधून टाक. तुझ्या दांतांनीं मला चाव. जो जो दंड करावासें वाटेल तो तो तूं कर. कुठूनहि तूं सुखी झालीस कीं पुरें.

**त्वमसि मम भूषणं त्वमसि मम जीवनं**
**त्वमसि मम भवजलधिरत्नम् ।**
**भवतु भवतीह मयि सततमनुरोधिनी**
**तत्र मम हृदयमतियत्नम् ॥ ३ ॥**

त्वम् असि मम भूषणम् त्वम् असि मम जीवनम्
त्वम् असि मम भव-जलधि-रत्नम् ।
भवतु भवती इह मयि सततम् अनुरोधिनी
तत्र मम हृदयम् अति-यत्नम् ॥ ३ ॥

राधे, माझें जीवनच तूं आहेस. तूं दूर असल्यामुळें मी मृतवत् आहें. तूं माझा अलंकार आहेस. तुझ्याशिवाय मी निस्तेज आहें. तूं या संसारसागरांत माझ्या हाताला महाभाग्यानें लागलेलें रत्न आहेस. एक तूं माझ्यावर सतत अनुरक्त असावीस यासाठींच माझें हृदय सतत कासावीस होतें.

**नीलनलिनाभमपि तन्वि तव लोचनं**
**धारयति कोकनदरूपम् ।**
**कुसुमशरबाणभावेन यदि रञ्जयसि**
**कृष्णमिदमेतदनुरूपम् ॥ ४ ॥**

नील-नलिन-आभम् अपि तन्वि तव लोचनम्
धारयति कोकनद-रूपम् ।

कुसुम-शर-त्राण-भावेन यदि रञ्जयसि
कृष्णम् इदम् एतत् अनुरूपम् ॥ ४ ॥

सुंदरी, तुझे नेत्र नेहमीं निळ्या कमलांप्रमाणें शोभत असतात. ते या वेळीं रागानें लाल कमलांसारखे दिसत आहेत. यांतून कटाक्षांचे मदनबाण माझ्यावर मारून तूं मला व्रण केलेस तर माझ्या अंगांतून रक्तहि निघेल. आणि मुळांत तुझ्या डोळ्यांप्रमाणेंच निळा असलेला मी आतां ते दिसत आहेत तसा लाल होईन. खरें म्हणजे रक्तानें लाल होण्या-ऐवजीं प्रीतीनें लाल व्हावें अशी माझी इच्छा. पण जाऊं दे. कुठूनहि माझेंच रूप तुझ्या डोळ्यांत दिसावें अशी माझी ओढ आहे. तूं रागानें लाल झाली आहेस. त्यामुळें मी रक्तानें लाल झालों तर तें शोभूनच दिसेल. असा दंड तूं मला कर ना.

**स्फुरतु कुचकुम्भयोरुपरि मणिमञ्जरी**
**रञ्जयतु तव हृदयदेशम् ।**
**रसतु रशनापि तव जघनघनमण्डले**
**घोषयतु मन्मथनिदेशम् ॥ ५ ॥**

स्फुरतु कुच-कुम्भयोः उपरि मणि-मञ्जरी
रञ्जयतु तव हृदय-देशम् ।
रसतु रशना अपि तव जघन-घन-मण्डले
घोषयतु मन्मथ-निदेशम् ॥ ५ ॥

तूं अशी अचल कां ? तुझ्या स्तनकलशांवरील मोत्यांची माळ स्थिर आहे. ती थरथरूं लागली कीं, तुझें वक्षस्थळ अधिक शोभतें. तशीच तुझ्या पुष्ट नितंबमंडलावरील कांची. ती जेव्हां आपल्या रुणझुणणाऱ्या शब्दांत ‘ चल. ये ’ अशी मदनदेवाची आज्ञा बोलत असते तेव्हांच सुंदर दिसते. तिला आतां बोलती कर ना.

**स्थलकमलगञ्जनं मम हृदयरञ्जनं**
**जनितरतिरङ्गपरभागम् ।**
**भण मसृणवाणि करवाणि चरणद्वयं**
**सरसलसदलक्तकरागम् ॥ ६ ॥**

स्थल-कमल-गञ्जनम् मम हृदय-रञ्जनम्
जनित-रति-रङ्ग परभागम् ।
भण मसृण-वाणि करवाणि चरण-द्वयम्
सरस-लसत्-अलक्तक-रागम् ।। ६ ।।

मंजुभाषिणी, तुझे हे चरण भुईकमळाप्रमाणें कोमल आहेत. हे माझ्या हृदयावर असतात तेव्हांच तें शोभून दिसतें. प्रीतीच्या गहिऱ्या रंगाची शोभा तेव्हांच पराकोटीला जाते. तूं नुसतें हो म्हण. मी हे तुझे चरण लसलशीत ओल्या अळित्यानें रंगवितों.

**स्मरगरलखण्डनं मम शिरसि मण्डनं**
**धेहि पदपल्लवमुदारम् ।**
**ज्वलति मयि दारुणो मदनकदनानलो**
**हरतु तदुपाहितविकारम् ।। ७ ।।**

स्मर-गरल-खण्डनम् मम शिरसि मण्डनम्
धेहि पद-पल्लवम् उदारम् ।
ज्वलति मयि दारुणः मदन-कदन-अनलः
हरतु तत् उपाहित-विकारम् ।। ७ ।।

मदनाचे विष माझ्या सर्वांगांत भिनून माझ्या डोक्यांत चढलें आहे. तूं या विषाचा उतारा जाणणारी गारुडी आहेस. गारुडी सापाचें मस्तक आपल्या टांचेखालीं दाबून त्यावर ताबा मिळवितो. तूंहि तुझें हें सुंदर पाऊल माझ्या मस्तकांत चढलेल्या मदनसापावर ठेव. म्हणजे माझें मस्तक जें सूर्याप्रमाणें तापलेल्या दारुण मदनबाधेनें संतप्त झालेलें आहे तें तुझ्या शीतल चरणकमलांच्या सावलींत आलें कीं जरा शांत होईल.

**इति चटुलचाटुपटुचारु मुरवैरिणो**
**राधिकामधि वचनजातम् ।**
**जयति जयदेवकविभारतीभूषितं**
**मानिनीजनजनितशातम् ।। ८ ।।**

इति चटुल-चाटु-पटु-चारु मुर-वैरिणः
राधिकाम् अधि वचन-जातम् ।

जयति जयदेव-कवि-भारती-भूषितम्
मानिनी-जन-जनित-शातम् ॥ ८ ॥

साहित्यदेवतेचा अलंकारच असें हें सुंदर गीत जयदेव कवि गात आहे. कृष्ण प्रीतीनें भरलेल्या कोमल सुरांत मनोवेधक अशीं चतुर अनुनयवचनें राधेला ऐकवीत आहे. त्या मानिनीचें अंतःकरण कृष्णाच्या या गीतामुळें सुखावत आणि पाझरत आहे. हें गीत सदाविजयी आहे.

*एकोणिसावी अष्टपदी समाप्त*

**परिहर कृतातङ्के शङ्कां त्वया सततं घन-**
**स्तनजघनयाऽऽक्रान्ते स्वान्ते परानवकाशिनि ।**
**विशति वितनोरन्यो धन्यो न कोऽपि ममान्तरं**
**स्तनभरपरीरम्भारम्भे विधेहि विधेयताम् ॥ २ ॥**

परिहर कृत-आतङ्के-शङ्काम् त्वया सततम् घन-
स्तन-जघनया आक्रान्ते स्वान्ते पर-अनवकाशिनि ।
विशति वितनोः अन्यः धन्यः न कः अपि मम अन्तरम्
स्तन-भर-परीरम्भ-आरम्भे विधेहि विधेयताम् ॥ २ ॥

हे कुपिते, माझ्या हृदयांत दुसरी कोणी स्त्री लपली आहे ही शंकाच तूं सोड. तूंच विचार कर. तुझे हे भरीव स्तन आणि ठाशीव नितंब माझ्या टीचभर हृदयांत दाटीवाटीनें घुसल्यावर तिथें दुसऱ्या कशाला म्हणून लपावयास जागा राहील काय ? मदनाची गोष्ट वेगळी. त्याला देहच नाहीं म्हणून जागा लागत नाहीं. तो तेवढा तुझ्यासह माझ्या हृदयांत राहतो आणि तुझ्या सहवासानें धन्य होतो. त्याशिवाय दुसरीच कुणी भाग्यवती माझ्या हृदयांत आहे ही शंका सोड. राग सोड. तुझ्या या भरदार स्तनांचें ओझें, वाहण्यासाठीं माझ्या हृदयावर ठेव. मी तुझा आज्ञांकित भारवाहक आहे याची तूं आलिंगन देऊन खात्री करून घे.

**मुग्धे विधेहि मयि निर्दयदन्तदंश-**
**दोर्वल्लिबन्धनिबिडस्तनपीडनानि ।**
**चण्डि त्वमेव मुदमञ्चय पञ्चबाण-**
**चण्डालकाण्डदलनादसवः प्रयान्ति ॥ ३ ॥**

मुग्धे विदेहि मयि निर्दय-दन्त-दंश-
दोः-वल्लि-बन्ध-निबिड-स्तन-पीडनानि ॥
चण्डि त्वम् एव मुदम् अञ्चय पञ्च-बाण-
चण्डाल-काण्ड-दलनात् असवः प्रयान्ति ॥ ३ ॥

वेडे, तुला तुझेंच हिताहित कळत नाहींसें दिसतें. मी अपराधी असेन तर हा इथें तुला शरण आहेंना ? मग मला दंड कर. माझ्या ओंठांचे निर्दय चावे घे. मला या करांनीं बांधून टाक. मला या स्तनांच्या वजनाखालीं चुरड. त्यांनींच टोंचून मला व्रण कर. आतां उशीर करूं नकोस. या चांडाळ मदनाच्या बाणांच्या वेदनांनीं माझे प्राण जात आहेत. मी याच्याशीं संग्राम करावयास समर्थ नाहीं. दंड करून का होईना तूं मला आपला म्हण. तूं रणचंडी आहेस. माझा स्वीकार करून तूं माझ्या साहाय्यास आलीस मग याचें काय चालणार आहे ? तूंच याचें निर्दाळण करून मला वांचव आणि तुझ्या जयानंदाचा उद्घोष कर.

**शशिमुखि तव भाति भंगुरभ्रूर्युवजनमोहकरालकालसर्पी ।**
**तदुदितभयभञ्जनाय यूनां त्वदधरसीधुसुधैव सिद्धमन्त्रः ॥ ४ ॥**

शशि-मुखि तव भाति भंगुर-भ्रूः युव-जन-मोह-कराल-काल-सर्पी ।
तत् उदित-भय-भञ्जनाय यूनाम् त्वत्-अधर-सीधु-सुधा इव सिद्ध-मन्त्रः ॥४॥

चंद्रमुखी, तूं रागावूं नकोस बरें. पुन्हां सांगतों. रागावल्यावर तुझी ही भ्रुकुटी ताणते. तेव्हां ती माझ्यासारख्या बिचाऱ्या प्रणयी तरुणांना आपल्या विषानें गुंग करणारी महाभयानक कालसर्पिणी ठरते. एकदां तिच्या दंशानें प्राणभय उत्पन्न झालें कीं, मग मात्र तुझ्या ओंठांवरील अमृत पिणें हा एकच उतारा त्यावर उपयोगी पडतो. तूं रागावलीस, मला त्या भ्रूनागिणीचा दंश झाला, म्हणजे मग मात्र मला नाइलाज म्हणून प्राणरक्षणासाठीं तुझ्या ओंठींचें अमृत प्यावेंच लागेल बरें. आधीं सांगून ठेवतों.

**व्यथयति वृथा मौनं तन्वि प्रपञ्चय पञ्चमं**
**तरुणि मधुरालापैस्तापं विनोदय दृष्टिभिः ।**
**सुमुखि विमुखीभावं तावद्विमुञ्च न वञ्चय**
**स्वयमतिशयस्निग्धो मुग्धे प्रियोऽहमुपस्थितः ॥ ५ ॥**

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ............... दि: ......................
क्रमांक ....................... मोर दि ..............



व्यथयति वृथा मौनम् तन्वि प्रपञ्चय पञ्चमम्
तरुणि मधुर-आलापैः तापम् विनोदय दृष्टिभिः ।
सु-मुखि विमुखीभावम् तावत् विमुञ्च न वञ्चय
स्वयम् अतिशय-स्निग्धः मुग्धे प्रियः अहम् उपस्थितः ॥ ५ ॥

राधे, प्रसन्न हो. तुझें हें अकारण मौन मला व्यथा देत आहे. तुझ्या गोड पंचम स्वरानें गाइलेल्या गीताचे मधुरस्वर मला ऐकव. सुंदरी, माझ्याकडे प्रेमानें भरलेल्या दृष्टीनें पाहा आणि माझ्या मदनसंतापाला विरंगुळा आण. तूं सुमुखी आहेस. तूंच विमुख व्हावें हें बरें का? अशी पाठ फिरवूं नकोस. मी तुझा लाडका कृष्ण प्रेमानें दीन होऊन तुझ्यासमोर उभा आहें. लाडके, आतां मला दूर लोटून माझी वंचना करूं नकोस.

**बन्धूकद्युतिबान्धवोऽयमधरः स्निग्धो मधूकच्छवि-**
**र्गण्डश्चण्डि चकास्ति नीलनलिनश्रीमोचनं लोचनम् ।**
**नासाऽभ्येति तिलप्रसूनपदवीं कुन्दाभदन्ति प्रिये**
**प्रायस्त्वन्मुखसेवया विजयते विश्वं स पुष्पायुधः ॥ ६ ॥**

बन्धूक-द्युति-बान्धवः अयम् अधरः स्निग्धः मधूक-छविः
गण्डः चण्डि चकास्ति नील-नलिन-श्री-मोचनम् लोचनम् ।
नासा अभ्येति तिल-प्रसून-पदवीम् कुन्द-आभ-दन्ति प्रिये
प्रायः त्वत्-मुख-सेवया विजयते विश्वम् स पुष्प-आयुधः ॥ ६ ॥

हे रागिणी, रागानें फुललेला तुझा हा अधरोष्ठ दुपारीच्या फुलाप्रमाणें लालभडक दिसत आहे. तुझे गाल मोहाच्या फुलाप्रमाणें मोहक आहेत. तुझे नेत्र निळ्या प्रकाशाची शोभा उधळणाऱ्या कमलांना मागें सारीत आहेत. पांढऱ्या तिळांच्या लांबट फुलाप्रमाणें तुझें नाक सरळ आणि रेखीव आहे. तुझ्या दांतांत कुंदकळ्यांचें तेज आहे. प्रिये, तुझ्या मुखावरील या पुष्पसैन्यानें मला पार जिंकून टाकलें आहे. या फुलांचा पराक्रम पाहूनच मदनानें जग जिंकण्यासाठीं फुलांचीं आयुधें निवडलीं असावीं.

**दृशौ तव मदालसे वदनमिन्दुमत्यास्पदम्**
**गतिर्जनमनोरमा विजितरम्भमूरुद्वयम् ।**
**रतिस्तव कलावती रुचिरचित्रलेखे भ्रुवौ**
**अहो विबुधयौवतं वहसि तन्वि पृथ्वीगता ॥**

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१६७०२
अ. क्र.

दृशौ तव मदालसे वदनम् इन्दुमति आस्पदम्
गतिः जन-मनोरमा विजित-रम्भम् ऊरु-द्वयम् ।
रतिः तव कलावती रुचिर-चित्र-लेखे भ्रुवौ
अहो विबुध-यौवतम् वहसि तन्वि पृथ्वी-गता ॥ ७ ॥

राधे, तूं पृथ्वीवर राहात असलीस तरी स्वर्गांतील देवयुवतींचा सारा सौंदर्यसंभार इथें तुझ्यांत एकवटला आहे. प्रीतीच्या उन्मादानें जड झालेले तुझे डोळे मदालसा अप्सरेच्या डोळ्यांप्रमाणें आहेत. चंद्रासारखें सुंदर दिसणारें तुझें वदन इंदुमती अप्सरेच्या वदनसौंदर्याला लाजविणारें आहे. लोकांच्या डोळ्यांत ठसणारी आणि मनांत रमणारी तुझी सुडौल गति मनोरमा या देवांगनेच्या गतीप्रमाणें आहे. माजलेल्या केळीसारख्या दिसणाऱ्या तुझ्या मांड्या रंभा या अप्सरेच्या मांड्यांप्रमाणें आहेत. प्रेम करण्याची तुझी रीत कलावती या रतिकलाचतुर आकाशवनितेच्या रीतीसारखी आहे. तुझ्या रेखीव चित्रासारख्या सुंदर भुंवया चित्रलेखा या स्वर्गांगनेच्या भुंवयांसारख्या आहेत. एका एका सौंदर्यगुणानें विख्यात झालेल्या या देवांगनांचे ते ते गुण एकट्या तुझ्यांत एकवटले आहेत.

( यापुढें सर्गांतींचें आशीर्वचन आहे. )

**स प्रीतिं तनुतां हरिः कुवलयापीडेन सार्धं रणे**
**राधापीनपयोधरस्मरणकृत्कुम्भेन सम्भेदवान् ।**
**यत्र खिद्यति मीलति क्षणमथ क्षिप्ते द्विपे तत्क्षणात्**
**व्यामोहेन जितं जितं जितमभूत्कंसस्य कोलाहलः ॥ ८ ॥**

स प्रीतिम् तनुताम् हरिः कुवलय-आपीडेन सार्धम् रणे
राधा-पीन-पयोधर-स्मरण-कृत् कुम्भेन सम्भेदवान् ।
यत्र खिद्यति मीलति क्षणम् अथ क्षिप्ते द्विपे तत्-क्षणात्
व्यामोहेन जितम् जितम् जितम् अभूत् कंसस्य कोलाहलः ॥ ८ ॥

कंसानें कृष्णाच्या वधाची तयारी केली तेव्हां रणांगणांत मद्य पिऊन माजलेला कुवलयापीड हत्ती कृष्णावर चालून आला. परंतु तो हत्ती पाहतांच कृष्ण मुळींच भ्याला नाहीं. राधेच्या स्तनांसारखें दिसणारें त्या हत्तीचें गंडस्थळ पाहून त्याला राधेचीच आठवण झाली आणि त्याच्या अंगावर प्रीतीचे रोमांच फुलले. ते रोमांच भीतीचे आहेत अशा भ्रमानें कंस

' जिंकिलें ' असें ओरडला. परंतु राधेचे स्तन दिसतांच त्यांवर झेंप घेऊन त्यांचें मर्दन करण्याची कृष्णाला संवय असल्यानें तो त्याच स्तनांसारख्या दिसणाऱ्या हत्तीच्या गंड-स्थलावर आरोहण करून गेला आणि त्यानें हत्तीचें मर्दन करून त्याला भूमीवर पाडलें. हें इतक्या झटपट झालें कीं, कोण जिंकलें कोण हरलें याचें भान विसरून कंस पुन्हां ' जिंकिलें, जिंकिलें ' असें दोनदा ओरडला आणि विजयाचा मोठा कोलाहल उडाला. राधेच्या प्रीतीनें महान् पराक्रम करणारा तो कृष्ण तुमच्या जीवनांत प्रीतीचें साम्राज्य फुलवो.

*एकोणिसावा प्रबंध समाप्त*

*दहावा सर्ग समाप्त*

दृशौ तव मदालसे वदनम् इन्दुमति आस्पदम्
गतिः जन-मनोरमा विजित-रम्भम् ऊरु-द्वयम् ।
रतिः तव कलावती रुचिर-चित्र-लेखे भ्रुवौ
अहो विबुध-यौवतम् वहसि तन्वि पृथ्वी-गता ॥ ७ ॥

राधे, तूं पृथ्वीवर राहात असलीस तरी स्वर्गांतील देवयुवतींचा सारा सौंदर्यसंभार इथें तुझ्यांत एकवटला आहे. प्रीतीच्या उन्मादानें जड झालेले तुझे डोळे मदालसा अप्सरेच्या डोळ्यांप्रमाणें आहेत. चंद्रासारखें सुंदर दिसणारें तुझें वदन इंदुमती अप्सरेच्या वदनसौंदर्याला लाजविणारें आहे. लोकांच्या डोळ्यांत ठसणारी आणि मनांत रमणारी तुझी सुडौल गति मनोरमा या देवांगनेच्या गतीप्रमाणें आहे. माजलेल्या केळीसारख्या दिसणाऱ्या तुझ्या मांड्या रंभा या अप्सरेच्या मांड्यांप्रमाणें आहेत. प्रेम करण्याची तुझी रीत कलावती या रतिकलाचतुर आकाशवनितेच्या रीतीसारखी आहे. तुझ्या रेखीव चित्रासारख्या सुंदर भुंवया चित्रलेखा या स्वर्गांगनेच्या भुंवयांसारख्या आहेत. एका एका सौंदर्यगुणानें विख्यात झालेल्या या देवांगनांचे ते ते गुण एकट्या तुझ्यांत एकवटले आहेत.

( यापुढें सर्गांतीचें आशीर्वचन आहे. )

**स प्रीतिं तनुतां हरिः कुवलयापीडेन सार्धं रणे**
**राधापीनपयोधरस्मरणकृत्कुम्भेन सम्भेदवान् ।**
**यत्र खिद्यति मीलति क्षणमथ क्षिप्ते द्विपे तत्क्षणात्**
**व्यामोहेन जितं जितं जितमभूत्कंसस्य कोलाहलः ॥ ८ ॥**

स प्रीतिम् तनुताम् हरिः कुवलय-आपीडेन सार्धम् रणे
राधा-पीन-पयोधर-स्मरण-कृत् कुम्भेन सम्भेदवान् ।
यत्र खिद्यति मीलति क्षणम् अथ क्षिप्ते द्विपे तत्-क्षणात्
व्यामोहेन जितम् जितम् जितम् अभूत् कंसस्य कोलाहलः ॥ ८ ॥

कंसानें कृष्णाच्या वधाची तयारी केली तेव्हां रणांगणांत मद्य पिऊन माजलेला कुवलयापीड हत्ती कृष्णावर चालून आला. परंतु तो हत्ती पाहतांच कृष्ण मुळींच भ्याला नाहीं. राधेच्या स्तनांसारखें दिसणारें त्या हत्तीचें गंडस्थळ पाहून त्याला राधेचीच आठवण झाली आणि त्याच्या अंगावर प्रीतीचे रोमांच फुलले. ते रोमांच भीतीचे आहेत अशा भ्रमानें कंस

'जिंकिलें' असें ओरडला. परंतु राधेचे स्तन दिसतांच त्यांवर झेंप घेऊन त्यांचें मर्दन करण्याची कृष्णाला संवय असल्यानें तो त्याच स्तनांसारख्या दिसणाऱ्या हत्तीच्या गंड-स्थलावर आरोहण करून गेला आणि त्यानें हत्तीचें मर्दन करून त्याला भूमीवर पाडलें. हें इतक्या झटपट झालें कीं, कोण जिंकलें कोण हरलें याचें भान विसरून कंस पुन्हां 'जिंकिलें, जिंकिलें' असें दोनदा ओरडला आणि विजयाचा मोठा कोलाहल उडाला. राधेच्या प्रीतीनें महान् पराक्रम करणारा तो कृष्ण तुमच्या जीवनांत प्रीतीचें साम्राज्य फुलवो.

*एकोणिसावा प्रबंध समाप्त*

*दहावा सर्ग समाप्त*

# सर्ग अकरावा : सामोद दामोदर

## प्रबंध विसावा

**सु-चिरमनुनयेन प्रीणयित्वा मृगाक्षीं**
**गतवति कृतवेशे केशवे कुञ्जशय्याम् ।**
**रचितरुचिरभूषां दृष्टिमोषे प्रदोषे**
**स्फुरति निरवसादां कापि राधां जगाद ॥ १ ॥**

सु-चिरम् अनुनयेन प्रीणयित्वा मृग-अक्षीम्
गतवति कृत-वेशे केशवे कुञ्ज-शय्याम् ।
रचित-रुचिर-भूषाम् दृष्टि-मोषे प्र-दोषे
स्फुरति निः-अवसादाम् का अपि राधाम् जगाद ॥ १ ॥

प्रदोषकाल पुढारला. दृष्टीला विफल करणारा अंधार दाटत चालला. कितीतरी वेळ गोड अनुनय केल्यावर राधा प्रसन्न झाली हें पाहून कृष्णानें सुंदर वेषभूषा केली आणि तो लता-कुंजांतील पुष्पशय्येकडे गेला. कृष्ण आपला बहुमान करीत नाहीं या खोट्या कल्पनेमुळें राधेला वाटणारा खेद आतां संपला आहे व मनोहर अलंकार आणि वेषभूषा धारण करून ती प्रणयलीलेला उन्मुख होत आहे हें तिच्या सखीनें पाहिलें आणि ती राधेला म्हणाली.

## अष्टपदी विसावी

राग–वसंत : ताल रूपक

**मुग्धे मधुमथनमनुगतम्**
**अनुसर राधिके ॥ ध्रु० ॥**

मुग्धे मधु-मथनम् अनु-गतम्
अनुसर राधिके ॥ ध्रु० ॥

राधिके, कृष्ण तुला शरण आला. वेडे, आतां उशीर न करतां तूं त्याच्याकडे जा.

**विरचितचाटुवचनरचनं चरणे रचितप्रणिपातम् ।**
**सम्प्रति मञ्जुलवञ्जुलसीमनि केलिशयनमनुयातम् ॥ १ ॥**

विरचित-चाटु-वचन-रचनम् चरणे रचित-प्रणिपातम् ।
सम्प्रति मञ्जुल-वञ्जुल-सीमनि केलि-शयनम् अनुयातम् ॥ १ ॥

गोड गोड बोलून त्यानें तुला संतुष्ट केलें. तुझ्या चरणांवर त्यानें लोटांगण घातलें. तो आतां वेतांच्या मनोहर कुंजांत प्रणयलीलेसाठीं रचिलेल्या शयनावर जाऊन तुझी वाट पाहात आहे.

**घनजघनस्तनभारभरे दरमन्थरचरणविहारम् ।**
**मुखरितमणिमञ्जीरमुपैहि विधेहि मरालविकारम् ॥ २ ॥**

घन-जघन-स्तन-भार-भरे दर-मन्थर-चरण-विहारम् ।
मुखरित-मणि-मञ्जीरम् उपैहि विधेहि मराल-विकारम् ॥ २ ॥

राधे, तुझा भरदार पार्श्वभाग राजहंसीप्रमाणें डौलदार आहे. त्यांत आणखी दाटलेल्या स्तनांच्या भाराची भर पडली आहे. तुझ्या चरणांची गतिहि राजहंसीच्या गतीप्रमाणें ठुमकती आणि मदमंथर झाली आहे. या गतीच्या तालावर तुझ्या कांचींतील सुवर्णाच्या घंटिका राजहंसीच्याच कलरवाप्रमाणें रुणझुणत आहेत. राधे, जा. आतां कृष्णाला भेट. कमलांच्या ताटव्यांत रतिसुख भोगण्याचें सुगंधी भाग्यहि राजहंसीच्याच वांट्याला येतें. तें भाग्य तूं कमलांच्या शय्येवर कृष्णाच्या सहवासांत आपलेंसें कर.

**शृणु रमणीयतरं तरुणीजनमोहनमधुरिपुरावम् ।**
**कुसुमशरासनशासनवन्दिनि पिकनिकरे भज भावम् ॥ ३ ॥**

शृणु रमणीयतरम् तरुणी-जन-मोहन-मधु-रिपु-रावम् ।
कुसुम-शर-आसन-शासन-बन्दिनि पिक-निकरे भज भावम् ॥ ३ ॥

तरुणींच्या चित्ताला भूल पाडणारा हा मुकुंदाच्या मुरलीचा मादक मधुर नाद ऐकू यत आहे. तो ऐक. फुलांचें धनुष्य वापरणाऱ्या मदनाच्या आज्ञेचे बंदिवान असणारे कोकिलांचे समुदाय गोड आवाजांत तुला हांका देत आहेत. त्या ऐक.

**अनिलतरलकिसलयनिकरेण करेण लतानिकुरम्बम् ।**
**प्रेरणमिव करभोरु करोति गतिं प्रति मुञ्च विलम्बम् ॥ ४ ॥**

अनिल-तरल-किसलय-निकरेण करेण लता-निकुरम्बम् ।
प्रेरणम् इव करभ-ऊरु करोति गतिम् प्रति मुञ्च विलम्बम् ॥ ४ ॥

वेलींचे कोंवळे शेंडे वाऱ्यावर तरल हेलकावे खात आहेत असें तुला दिसत. पण ते हेलकावे खात नसून तुला चल, चल, लौकर चल, अशी प्रेरणा देत आहेत. तुझ्या मांड्या हत्तीच्या पिलाच्या सोंडेप्रमाणें भरदार असल्यानें तुला लौकर लौकर चालतां येत नाहीं हें खरें. पण तरीहि तूं जरा लौकर चाल. उशीर करूं नकोस.

**स्फुरितमनङ्गतरङ्गवशादिव सूचितहरिपरिरम्भम् ।**
**पृच्छ मनोहरहारविमलजलधारममुं कुचकुम्भम् ॥ ५ ॥**

स्फुरितम् अनङ्ग-तरङ्ग-वशात् इव सूचित हरि-परिरम्भम् ।
पृच्छ मनोहर-हार-विमल-जलधारम् अमुम् कुच-कुम्भम् ॥ ५ ॥

तुझ्या स्तनांच्या अग्रांवरून खालीं लोंबणारा हा मोत्यांचा हार कलशाच्या मुखांतून गोल थेंबांनीं उतूं जाणाऱ्या गंगेच्या धारेप्रमाणें शोभत आहे. तुझ्या मनांत प्रीतीच्या लाटा नाचत आहेत. त्यांच्या धडकांनीं हे स्तनकलश डुचमळत आहेत. त्याच तालावर हा हारहि थरथरत आहे. ही थरथर म्हणजे कृष्णाच्या आगामी आलिंगनाची सूचना देणारा शुभशकून आहे कीं नाहीं हें तूं त्या थरथरणाऱ्या स्तनांनाच विचार.

**अधिगतमखिलसखीभिरिदं तव वपुरपि रतिरणसज्जम् ।**
**चण्डि रणितरशनारवडिण्डिममभिसर सरसमलज्जम् ॥ ६ ॥**

अधिगतम् अखिल-सखीभिः इदम् तव वपुः अपि रति-रण-सज्जम् ।
चण्डि रणित-रशना-रव-डिण्डिमम् अभिसर स-रसम् अलज्जम् ॥६॥

सखी, रतिशय्येवर जो संग्राम व्हावयाचा आहे त्याला दचकूं नकोस. सैनिकांनीं सेनापतीला रणासाठीं सजवावें तसें तुझ्या सख्यांनीं तुला प्रसाधनाच्या हत्यारांनीं सजवून

प्रणयाच्या युद्धाला सुसज्ज केलें आहे. आतां तूं प्रणयरणांत चण्डीप्रमाणें विजयी होणार आहेस. रणदुंदुभींच्या तालावर चालत सेनापति रणांत उडी घेतो तशी तूं या छुमछुमणाऱ्या मेखलेच्या आवाजाच्या तालावर चालत शय्यारणांत निःसंकोच रसरशीनें प्रवेश कर.

**स्मरशरसुभगनखेन सखीमवलम्ब्य करेण सलीलम् ।**
**चलवलयक्वणितैरवबोधय हरिमपि निजगतिशीलम् ॥ ७ ॥**

स्मर-शर-सुभग-नखेन सखीम् अवलम्ब्य करेण स-लीलम् ।
चल-वलय-क्वणितै अवबोधय हरिम् अपि निज-गति-शीलम् ॥ ७ ॥

मदनयुद्धांत पराक्रम करणारीं टोंकदार सुंदर नखें असलेला तुझा हात हलकेंच माझ्या खांद्यावर ठेव. माझा आधार घेऊन लौकर लौकर चल. लतामंडपाच्या दारांत पोहोंचतांच हात अशा कौशल्यानें खालीं घे कीं, त्यांतील कंकणें हालून त्यांचा आवाज होईल आणि तूं दारापर्यंत येऊन पोहोंचलीस हें कृष्णाला न सांगतां कळेल.

**श्रीजयदेवभणितमधरीकृतहारमुदासितवामम् ।**
**हरिविनिहितमनसामधितिष्ठतु कण्ठतटीमविरामम् ॥ ८ ॥**

श्रीजयदेव-भणितम् अधरीकृत-हारम् उदासित-वामम् ।
हरि-विनिहित-मनसाम् अधितिष्ठतु कण्ठ-तटीम् अविरामम् ॥ ८ ॥

जयदेव कवीनें हें गीत गाइलेलें आहे. वेंचीव शब्दांच्या योजनेमुळें तें मोत्यांच्या हाराहून अधिक रचनामधुर झालें आहे. रसिकांना याच्याच रसाची गोडी लागल्यामुळें सुंदर वामलोचना स्त्रियांकडे कोणी पाहात नाहीं म्हणून त्या उदास झाल्या आहेत. ज्यांचें मन कृष्णाच्या गुणगायनांत रंगलेलें आहे त्यांच्या कंठांत हें गीत सतत वसो.

*विसावी अष्टपदी समाप्त*

**सा मां द्रक्ष्यति वक्ष्यति प्रियकथां प्रत्यङ्गमालिङ्गनैः**
**प्रीतिं यास्यति रंस्यते सखि समागत्येति चिन्ताकुलः ।**
**स त्वां पश्यति वेपते पुलकयत्यानन्दति स्विद्यति**
**प्रत्युद्गच्छति मूर्च्छति स्थिरतमः पुञ्जे निकुञ्जे प्रियः ॥ २ ॥**

सा माम् द्रक्ष्यति वक्ष्यति प्रिय-कथाम् प्रत्यङ्गम् आलिङ्गनैः
प्रीतिम् यास्यति रंस्यते सखि समागत्य इति चिन्ता-आकुलः ।
स त्वाम् पश्यति वेपते पुलकयति आनन्दति स्विद्यति
प्रति-उद्गच्छति मूर्च्छति स्थिरतमः पुञ्जे निकुञ्जे प्रियः ॥ २ ॥

आतां ती येईल. ती माझ्याकडे पाहील. ती माझ्याशीं प्रीतीच्या गोष्टी बोलेल. मला सर्वांगानें आलिंगन देऊन ती प्रणय फुलवील. ती माझ्याशीं रतिलीला करील. अशा चिंतनानें कृष्ण अधीर झाला आहे. तूं दिसलीस असा भ्रम त्याला क्षणोक्षणीं होत आहे. तो थरथरत आहे. रोमांचांचे शहारे त्याच्या अंगावर फुटत आहेत. प्रणयलीला पुरी झाल्याच्या भासानें तो आनंदित होत आहे. श्रमांच्या भासानें त्याला घाम फुटत आहे. कृतज्ञतेनें तुला धन्यवाद देऊन तुला पोंचविण्यासाठीं तो निघत आहे आणि मग इतका वेळ या अंधाऱ्या लताकुंजांत आपण एकटेच होतों याची जाणीव त्याला होऊन तो मूर्च्छित पडत आहे.

**अक्ष्णोर्निक्षिपदञ्जनं श्रवणयोस्तापिच्छगुच्छावलिं**
**मूर्ध्नि श्यामसरोजदामकुचयोः कस्तूरिकापत्रकम् ।**
**धूर्तानामभिसारसंभ्रमजुषां विष्वङ् निकुञ्जे सखि**
**ध्वान्तं नीलनिचोलचारु सुदृशां प्रत्यङ्गमालिङ्गति ॥ ३ ॥**

अक्ष्णोः निक्षिपत् अञ्जनम् श्रवणयोः तापिच्छ-गुच्छ-आवलिम्
मूर्ध्नि श्याम-सरोज-दाम कुचयोः कस्तूरिका-पत्रकम् ।
धूर्तानाम् अभिसार-संभ्रम-जुषाम् विष्वङ् निकुञ्जे सखि
ध्वान्तम् नील-निचोल-चारु सु-दृशाम् प्रति-अङ्गम् आलिङ्गति ॥३॥

राधे, खरेंच सगळा थाट अगदीं सुंदर जमला आहे. आणि एखादी गोष्ट राहिली म्हणून का थबकून वेळ काढावयाचा ? चलाख स्त्रिया चोरट्या प्रेमासाठीं जातांना लगबग करून संकेताचा वेळ साधतात. निळ्या वस्त्राच्या रूपानें आसमंत व्यापणारा अंधार त्या सुनयनांची अडचण ओळखतो. तोच त्यांच्या सर्वांगाला आलिंगन दिल्याप्रमाणें वेढून टाकतो. त्यांचा शृंगार अपुरा असेल तर तोच पुरा करतो. त्यांच्या डोळ्यांतील काजळ तोच होतो. त्यांच्या केसांतील निळ्या कमलांची माला तोच होतो. त्यांच्या कानांतील निळ्या तमाल पुष्पांचे गुच्छ तोच बनतो. त्यांच्या स्तनांवरील निळ्या कस्तुरीचा लेपहि तोच होतो.

**काश्मीरगौरवपुषामभिसारिकाणा-**
**माबद्धरेखमभितो मणिमञ्जरीभिः ।**
**एतत्तमालदलनीलतमं तमिस्रं**
**तत्प्रेमहेमनिकषोपलतां तनोति ॥ ४ ॥**

काश्मीर-गौर-वपुषाम् अभिसारिकाणाम्
आबद्ध-रेखम् अभितः मणि-मञ्जरीभिः ॥
एतत् तमाल-दल-नील-तमम् तमिस्रम्
तत्-प्रेम-हेम-निकष-उपलताम् तनोति ॥ ४ ॥

अंधारांत चोहीकडे प्रकाशशलाका चमकत आहेत. हे तुझ्या सवतींच्या अंगावरील हिऱ्यांचे अलंकार होत. या साऱ्या गोपी केशरासारख्या तकतकीत अंगकांतीच्या सुंदरी आहेत. त्या साऱ्याजणी अभिसार करण्यासाठीं कृष्णाला शोधीत आहेत. अंधार निळ्या तमालपत्रांच्या राशीसारखा दाटला आहे. तो तुझ्यावरील कृष्णाच्या प्रेमाचा कस पाहण्यासाठीं त्याला कसोटीचा दगड लावीत आहे. त्यानेंच या साऱ्या प्रणयिनींना बाहेर पडण्याची संधि दिलेली आहे. आणि या साऱ्या इथें हाताशीं प्राप्त असतांना कृष्ण तुझी वाट पाहात आहे हीच तुझ्यावरील त्याच्या सुवर्णशुद्ध प्रेमाची कसोटी आहे.

*विसावा प्रबंध समाप्त*

## प्रबंध एकविसावा

**हारावलीतरलकाञ्चनकाञ्चिदाम-**
**केयूरकङ्कणमणिद्युतिदीपितस्य ।**
**द्वारे निकुञ्जनिलयस्य हरिं निरीक्ष्य**
**व्रीडावतीमथ सखी निजगाद राधाम् ॥ १ ॥**

हार-आवली-तरल-काञ्चन-काञ्चि-दाम-
केयूर-कङ्कण-मणि-द्युति-दीपितस्य ।
द्वारे निकुञ्ज-निलयस्य हरिम् निरीक्ष्य
व्रीडावतीम् अथ सखी निजगाद राधाम् ॥ १ ॥

हळूहळू राधा आणि सखी लतामंडपाच्या दाराशी आल्या. राधेच्या कंठांतल्या हारांतील कौस्तुभमणि, नितंबावरील रत्नखचित सुवर्ण मेखला, पायांतील रत्नजडित नूपुर, करांतील रत्नकंकणें, दंडांतील हिऱ्यामाणकांच्या वांकी यांच्या प्रकाशाच्या झळाळीनें लतामंडपाचें दार उजळलें. त्या दारांत राधेची वाट पाहात कृष्ण उभा होता. त्याच्या दृष्टीला दृष्टि भिडतांच शालीन राधा विनीत लज्जेनें फुलली. तेव्हां तिला तिची सखी म्हणाली,

## अष्टपदी एकविसावी

राग–वराडी : ताल रूपक

**प्रविश राधे माधवसमीपमिह ॥ ध्रु० ॥**

प्रविश राधे माधव समीपम् इह ॥ ध्रु० ॥

राधे, आंत प्रवेश कर. माधवाजवळ जा.

**मञ्जुतरकुञ्जतलकेलिसदने ।**
**विलस रतिरभसहसितवदने ॥ १ ॥**

मञ्जु-तर-कुञ्ज-तल-केलि-सदने ।
विलस रति-रभस-हसित-वदने ॥ १ ॥

रतिसुखाच्या अपेक्षित आनंदाच्या छटा तुझ्या गालांवर फुलत आहेत. रतिसुखासाठींच योजिलेल्या या मनोहर लताकुंजांच्या भूमीवर अंथरलेल्या किसलय शयनावर तूं आतां कृष्णासह रतिविलास कर.

**नवभवदशोकदलशयनसारे ।**
**विलस कुचकलशतरलहारे ॥ २ ॥**

नव-भवत्-अशोक-दल-शयन-सारे ।
विलस कुच-कलश-तरल-हारे ॥ २ ॥

तुझ्या कलशाकार स्तनांवरील हार थरथरत आहे. अशोकाच्या नुकत्याच उगवलेल्या कोंवळ्या पालवीची सुखद शय्या या कुंजांत आहे. तिच्यावर विलास करून तूं ही थरथर थांबव.

**कुसुमचयरचितशुचिवासगेहे ।**
**विलस कुसुमसुकुमारदेहे ॥ ३ ॥**

कुसुम-चय-रचित-शुचि-वास-गेहे ।
विलस कुसुम-सु-कुमार-देहे ॥ ३ ॥

तुझी तनु कुसुमासारखी सुकुमार आहे. प्रीतीच्या या पवित्र मंदिरांतसुद्धां तुझ्या तनूला सुखद व्हाव्या अशा फुलांच्या पायघड्या घातल्या आहेत. तुझ्या कोमल तनूला कष्ट होतील अशी शंका न घेतां तूं इथें विशुद्ध प्रीतीचे विलास अनुभव.

**मृदुचलमलयपवनसुरभिशीते ।**
**विलस मदनशरनिकरभीते ॥ ४ ॥**

मृदु-चल-मलय-पवन सुरभि-शीते ।
विलस मदन-शर-निकर-भीते ॥ ४ ॥

मदनाच्या तापाला तूं आतां कां भितेस ? इथें मलयाचलावरील मंद वायुलहरी वाहात आहेत. त्यांनीं हा प्रीतिमंडप सुगंधित आणि शीतल झाला आहे. तुझ्या साऱ्या तापांवर उतारा देणारे विलास तूं इथें कर.

**विततबहुवल्लिनवपल्लवघने ।**
**विलस चिरमलसपीनजघने ॥ ५ ॥**

वितत-बहु-वल्लि-नव-पल्लव-घने ।
विलस चिरम् अलस-पीन-जघने ॥ ५ ॥

तुझे पुष्ट नितंब रतीच्या ओढीनें आणि अभिसाराच्या शिणानें जडावले आहेत. या प्रेमसदनांत कोमल वेलींच्या कोंवळ्या पालवीची दाट, मऊ, उंच शय्या आहे. त्या शय्येवर या नितंबांना विसावून तूं आतां रतिविलास कर.

**मधुमिलितमधुपकुलकलितरावे ।**
**विलस मदनरभसरसभावे ॥ ६ ॥**

मधु-मिलित-मधुप-कुल-कलित-रावे ।
विलस मदन-रभस-रस-भावे ।। ६ ।।

तुझ्या अंतःकरणांत प्रीतिभावनेच्या रसाला उधाण आलें आहे. मध पिऊन मत्त झालेले भुंगे या कुंजांत गुंजारव करीत आहेत. यांच्या गुंजनाच्या तालावर तूं प्रणयविलासांचें गुंजन कर.

**मधुतरलपिकनिकरनिनदमुखरे ।**
**विलस दशनरुचिरुचिरशिखरे ॥ ७ ॥**

मधु-तरल-पिक-निकर-निनद-मुखरे ।
विलस दशन-रुचि-रुचिर-शिखरे ।। ७ ।।

कोकिळांच्या अतिशय मधुर अशा कुहूगीतानें हा मंडप निनादत आहे. कुंदकळ्यांप्रमाणें सुंदर अशा दांतांनीं शोभणाऱ्या तुझ्या वदनांतून तसेच मधुर सीत्काररव काढीत तूं इथें प्रीतीचे रंग उधळ.

**विहितपद्मावतीसुखसमाजे ।**
**भणति जयदेवकविराजराजे ॥ ८ ॥**

विहित-पद्मावती-सुख-समाजे ।
भणति जयदेव-कवि-राज-राजे ।। ८ ।।

कमलमुखी अशा राधेच्या सुखविलासाचें हें गीत जयदेव कविराज गात आहे. या गीतानें जयदेवाची पत्नी पद्मावती हिच्या जीवनांत सुखाचें वैभव फुलविलें आहे.

*एकविसावी अष्टपदी समाप्त*

**त्वां चित्तेन चिरं वहन्नयमतिश्रान्तो भृशं तापितः**
**कन्दर्पेण च पातुमिच्छति सुधासम्बाधबिम्बाधरम् ।**
**अस्याङ्कं तदलङ्कुरु क्षणमिह भ्रूक्षेपलक्ष्मीलव-**
**क्रीतो दास इवोपसेवितपदाम्भोजे कुतः सम्भ्रमः ॥ २ ॥**

मधु-मिलित-मधुप-कुल-कलित-रावे ।
विलस मदन-रभस-रस-भावे ॥ ६ ॥

तुझ्या अंतःकरणांत प्रीतिभावनेच्या रसाला उधाण आलें आहे. मध पिऊन मत्त झालेले भुंगे या कुंजांत गुंजारव करीत आहेत. यांच्या गुंजनाच्या तालावर तूं प्रणयविलासांचें गुंजन कर.

**मधुतरलपिकनिकरनिनदमुखरे ।**
**विलस दशनरुचिरुचिरशिखरे ॥ ७ ॥**

मधु-तरल-पिक-निकर-निनद-मुखरे ।
विलस दशन-रुचि-रुचिर-शिखरे ॥ ७ ॥

कोकिळांच्या अतिशय मधुर अशा कुहूगीतानें हा मंडप निनादत आहे. कुंदकळ्यांप्रमाणें सुंदर अशा दांतांनीं शोभणाऱ्या तुझ्या वदनांतून तसेच मधुर सीत्काररव काढीत तूं इथें प्रीतीचे रंग उधळ.

**विहितपद्मावतीसुखसमाजे ।**
**भणति जयदेवकविराजराजे ॥ ८ ॥**

विहित-पद्मावती-सुख-समाजे ।
भणति जयदेव-कवि-राज-राजे ॥ ८ ॥

कमलमुखी अशा राधेच्या सुखविलासाचें हें गीत जयदेव कविराज गात आहे. या गीतानें जयदेवाची पत्नी पद्मावती हिच्या जीवनांत सुखाचें वैभव फुलविलें आहे.

*एकविसावी अष्टपदी समाप्त*

**त्वां चित्तेन चिरं वहन्नयमतिश्रान्तो भृशं तापितः**
**कन्दर्पेण च पातुमिच्छति सुधासम्बाधबिम्बाधरम् ।**
**अस्याङ्कं तदलङ्कुरु क्षणमिह भ्रूक्षेपलक्ष्मीलव-**
**क्रीतो दास इवोपसेवितपदाम्भोजे कुतः सम्भ्रमः ॥ २ ॥**

त्वाम् चित्तेन चिरम् वहन् अयम् अति-श्रान्तः भृशम् तापितः
कंदर्पेण च पातुम् इच्छति सुधा-सम्बाध-बिम्ब-अधरम् ।
अस्य अङ्कम् तत् अलङ्कुरु क्षणम् इह भ्रू-क्षेप-लक्ष्मी-लव-
क्रीतः दास इव उपसेवित पद-अम्भोजे कुतः सम्भ्रमः ॥ २ ॥

राधे, वजनानें भारावलेले तुझे पुष्ट अवयव, तुझ्या अंगावर आहेत खरे. पण त्यांचें खरें ओझें आपल्या चित्तांत सदाचें वाहून हा कृष्ण अतिशय दमलेला आहे. दमलेला असतांनाच याच्यावर बाण मारून मारून मदन याला व्याकूळ करीत आहे. तुझ्या सुंदर ओठांवरील थोडेसें अमृत पिऊन या व्याधींतून उतारा पावावा अशी त्याची इच्छा आहे. खरें म्हणजे तुझ्या नेत्रांच्या कटाक्षांतील थोड्याशा सौंदर्याचें मोल देऊन तूं या दासाला तुझ्या चरणांची सेवा करण्यासाठीं विकत घेतलेलें आहे. हा दासच असल्यानें याच्या मांडीचें आसन तें आतां तुझ्याच मालकीचें आहे. तूं आतां त्या आसनावर बसून क्षणभर ती मांडी शोभव. आणि तुझाच भार वाहून थकलेल्या या दासाला तकवा येण्यासाठीं थोडेंसें अधरामृत त्याला दे. आतां विचार आणि संभ्रम कशाला हवा !

*एकविसावा प्रबंध समाप्त*

## प्रबंध बाविसावा

**सा ससाध्वससानन्दं गोविन्दे लोललोचना ।**
**सिञ्जाना मञ्जुमञ्जीरं प्रविवेश निवेशनम् ॥ १ ॥**

सा स-साध्वस-स-आनन्दम् गोविन्दे लोल-लोचना ।
सिञ्जाना मञ्जु-मञ्जीरम् प्रविवेश निवेशनम् ॥ १ ॥

राधेचे नेत्र गोविंदावर जडलेले होते. सखीचा आग्रह ऐकून किंचित् भीतीनें — किंचित् आनंदानें, किंचित् संभ्रमानें — किंचित् प्रीतीनें तिनें त्या लतामंडपांत टाकण्यासाठीं पाऊल उचललें. तेव्हां तिच्या पायांतील नूपुर मंजुळ झंकारांत निनादले.

# अष्टपदी बाविसावी

राग–वराडी : ताल–रूपक

**हरिमेकरसं**
**चिरमभिलषितविलासम् ।**
**सा ददर्श गुरुहर्षवशंवद-**
**वदनमनङ्गनिवासम् ॥ ध्रु० ॥**

हरिम् एक रसम्
चिरम् अभिलषित-विलासम् ॥
सा ददर्श गुरु-हर्ष-वशंवद-
वदनम् अनङ्ग-निवासम् ॥ ध्रु० ॥

कृष्णाला एक राधेचाच ध्यास लागलेला. राधेलाहि एका कृष्णाचीच प्रीति वाटत असलेली. परस्परांशीं रतिविलास घडावा ही त्यांची किती काळची अभिलाषा. राधा ओढीनें आंत आलेली दिसतांच आनंदातिशयानें कृष्णाचें वदन प्रफुल्ल झालें. राधेला तो मूर्तिमंत मदनासारखा सुंदर दिसला.

**राधावदनविलोकनविकसितविविधविकारविभङ्गम् ।**
**जलनिधिमिव विधुमण्डलदर्शनतरलिततुङ्गतरङ्गम् ॥ १ ॥**

राधा-वदन-विलोकन-विकसित-विविध-विकार-विभङ्गम् ।
जल-निधिम् इव विधु-मण्डल-दर्शन-तरलित-तुङ्ग-तरङ्गम् ॥ १ ॥

चंद्रमंडलाच्या दर्शनानें सागराच्या हृदयांत प्रेम उचंबळावें आणि तें त्याच्या पृष्ठभागावर उंच उंच लाटांनीं उसळावें तसे प्रीतींत होकार सुचविणाऱ्या राधेच्या लज्जारंगित वदनाच्या दर्शनानें कृष्णाच्या मनांत नाना प्रकारच्या उन्मेषांत विकसित होणारे प्रणयविकार उचंबळले आणि ते सारे सरसर त्याच्या नयनांत तरळून गेले.

**हारममलतरतारमुरसि दधतं परिलम्बितदूरम् ।**
**स्फुटतरफेनकदम्बकरंबितमिव यमुनाजलपूरम् ॥ २ ॥**

हारम् अमल-तर-तारम् उरसि दधतम् परिलम्बित-दूरम् ।
स्फुटतर-फेन-कदम्ब-करम्बितम् इव यमुना-जल-पूरम् ॥ २ ॥

अतिशय निर्मळ शुभ्र मौक्तिकांचा गुढघ्यापर्यंत पोहोंचणारा हार त्यानें कंठांत घातलेला होता. सर्वांगीं उसळणाऱ्या शुभ्रधवल फेसांच्या लाटांनीं निळ्या यमुनेचा पूर सुंदर दिसावा तसा मनांत प्रेमाचा पूर आलेला निळा कृष्ण त्या धवल हारानें शोभत होता.

**श्यामलमृदुलकलेवरमण्डनमधिगतगौरदुकूलम् ।**
**नीलनलिनमिव पीतपरागपटलभरवलयितमूलम् ॥ ३ ॥**

श्यामल-मृदुल-कलेवर-मण्डनम् अधिगत-गौर-दुकूलम् ।
नील-नलिनम् इव पीत-पराग-पटल-भर-वलयित-मूलम् ॥ ३ ॥

त्याची श्यामल आणि कोमल तनु रेशमाच्या मुलायम स्पर्शाच्या पिवळ्या वस्त्रांत वेढल्यामुळें शोभत होती. सायंकालीं सूर्यविकासी कमलें मलूल होतांना त्यांच्या पिवळ्या परागांच्या राशी ओघळाव्या आणि त्या जलपृष्ठावर तरंगत तरंगत नुकत्याच उमलणाऱ्या चंद्रविकासी नीलकमलाच्या देंठाभोंवतीं फेर धरून जमा व्हाव्या तसा तो कृष्ण सुंदर दिसत होता. जणू गोपींच्या जीवनांत प्रणयाचा सुगंध ओतणारे कृष्णाच्या चित्तांतील सारे भावकण आतां एकसंध झाले होते आणि त्यांतून राधेविषयींच्या प्रणयभावाचें नीलकमल त्याच्या हृदयांत प्रफुल्ल डंवरलें होतें.

**तरलदृगञ्चलचलनमनोहरवदनजनितरतिरागम् ।**
**स्फुटकमलोदरखेलितखञ्जनयुगमिव शरदि तडागम् ॥ ४ ॥**

तरल-दृक्-अञ्चल-चलन-मनोहर-वदन-जनित-रति-रागम् ।
स्फुट-कमल-उदर-खेलित-खञ्जन-युगम् इव शरदि तडागम् ॥ ४ ॥

कृष्णाचें सतेज श्यामल वदन स्वच्छ निळसर जलानें अथांग भरलेल्या शरद्ऋतूंतील सरोवराप्रमाणें दिसत होतें. त्याचे निळसर डोळे त्या सरोवरांतील नवोदित कमलाप्रमाणें शोभत होते. त्याच्या पापण्या कमलांच्या पाकळ्यांसारख्या दिसत होत्या आणि त्यांच्या कडांचे केस मकरंदाच्या गाभ्याभोंवतींच्या पराग केसरासारखे दिसत होते. त्यामुळें त्याच्या तरल बाहुल्यांना पाहतांच कमलांत प्रणयनर्तन करणाऱ्या खंजरीट ( ताजवा ) पक्ष्यांचा भास

होत होता. राधेच्या दर्शनाचा मद्य पिऊन हे पक्षी उन्मत्त झालेले होते आणि थयथया नृत्य करीत होते. तें कटाक्षनृत्य पाहून राधेची प्रणयभावना उतू आली.

**वदनकमलपरिशीलनमीलितमिहिरसमकुण्डलशोभम् ।**
**स्मितरुचिरुचिरसमुल्लसिताधरपल्लवकृतरतिलोभम् ॥ ५ ॥**

वदन-कमल-परिशीलन-मीलित-मिहिर-सम-कुण्डल-शोभम् ।
स्मित-रुचि-रुचिर-समुल्लसित-अधर-पल्लव-कृत-रति-लोभम् ॥ ५ ॥

कृष्णाच्या वदनाचा सहवास घडावा म्हणून सूर्यमंडलांनीं हिऱ्यांचें रूप घेतलेलें होतें आणि कुंडलें बनून तीं त्याच्या कानांत लोंबत होतीं. प्रियतमेच्या स्वागतासाठीं स्मितहास्य करतांना किंचित विलग झालेल्या त्याच्या अधरोष्ठाचा रसरसित ओलेपणा आणि चंचल थरथर पाहून त्या ओंठाच्या आस्वादाचा लाभ आपणांस घडावा अशी अभिलाषा राधेच्या चित्तांत उगवली.

**शशिकिरणच्छुरितोदरजलधरसुन्दरकुसुमसुकेशम् ।**
**तिमिरोदितविधुमण्डलनिर्मलमलयजतिलकनिवेशम् ॥ ६ ॥**

शशि-किरण-च्छुरित-उदर-जल-धर-सुन्दर-कुसुम-सुकेशम् ।
तिमिर-उदित-विधु-मण्डल-निर्मल-मलय-ज-तिलक-निवेशम् ॥ ६ ॥

कृष्णानें त्याच्या विपुल निळ्या केसांत फुलांच्या माळा गुंफलेल्या होत्या. ढगांमागें उगवणाऱ्या चंद्राचे किरण त्या ढगांमधील फटींतून बाहेर यावे तशा त्या फुलमाला शोभत होत्या. त्यानें आपल्या विशाल ललाटावर लावलेला शुभ्र धवल चंदनाचा वाटोळा टिळा अंधाऱ्या निळ्या रात्रींतून दिशेच्या विशाल भालप्रदेशावर नुकत्याच उगवलेल्या पौर्णिमेच्या गरगरित वाटोळ्या तेजनिर्मल चंद्रबिंबाप्रमाणें शोभत होता.

**विपुलपुलकभरदन्तुरितं रतिकेलिकलाभिरधीरम् ।**
**मणिगणकिरणसमूहसमुज्ज्वलभूषणसुभगशरीरम् ॥ ७ ॥**

विपुल-पुलक-भर-दन्तुरितम् रति-केलि-कलाभिः अधीरम् ।
मणि-गण-किरण-समूह-समुज्ज्वल-भूषण-सुभग-शरीरम् ॥ ७ ॥

त्याच्या अंगावरील अलंकारांत नाना रत्नें होतीं. त्याच्या समुदायांतून प्रकाशकिरण उसळत होते. त्यांच्या उजळ्यामुळें त्याचें सुंदर शरीर झळाळत होतें. त्याच्या सर्वांगावर रोमांचांचा कांटा फुलला होता. राधेशीं मोठ्या कलात्मकतेनें रतिविलास करावयास तो आतां अधीर झाला होता हें त्या रोमांचामुळें प्रकट होत होतें.

**श्रीजयदेवभणितविभवद्विगुणीकृतभूषणभारम् ।**
**प्रणमत हृदि प्रणिधाय हरिं सुचिरं सुकृतोदयसारम् ॥ ८ ॥**

श्री-जयदेव-भणित-विभव-द्विगुणीकृत-भूषण-भारम् ।
प्रणमत हृदि प्रणिधाय हरिम् सु-चिरम् सुकृत-उदय-सारम् ॥ ८ ॥

जयदेवानें हें अतिशय सुंदर गीत गाइलें आहे. आधींच कृष्ण सुंदर. त्यांत त्याचे अलंकारहि सुंदर. पण जयदेवाच्या या गीतामुळें त्या सौंदर्याची प्रचीति दुप्पट झाली आहे. कृष्णाचें हें दर्शन पूर्व पुण्याच्या फलाप्रमाणें मनोहर आहे. रसिकांनीं हें दर्शन चिरकाल हृदयांत धारण करावें.

*बाविसावी अष्टपदी समाप्त*

**अतिक्रम्यापाङ्गं श्रवणपथपर्यन्तगमन-**
**प्रयासेनेवाक्ष्णोस्तरलतरतारं पतितयोः ।**
**इदानीं राधायाः प्रियतमसमालोकसमये**
**पपात स्वेदाम्बुप्रसर इव हर्षाश्रुनिकरः ॥ २ ॥**

अतिक्रम्य अपाङ्गम् श्रवण-पथ-पर्यन्त-गमन-
प्रयासेन इव अक्ष्णोः तरलतर-तारम् पतितयोः ।
इदानीम् राधायाः प्रियतम-समालोक-समये
पपात स्वेद-अम्बु-प्रसर इव हर्ष-अश्रु-निकरः ॥ २ ॥

अतिशय लाडक्या अशा प्रियतमाच्या समागमाचा समय आतां जवळ आला होता. राधेच्या भावनांना अनावर पूर आला आणि तिच्या नयनांतून एकाएकीं आनंदाश्रूंचा पूर वाहूं लागला. जणू त्या नयनांतील बाहुल्या कृष्णाला एकदमच सगळीकडून पाहून घेण्यासाठीं वेगानें फिरूं लागल्या. जणू ते डोळे साऱ्या कृष्णाला एकदम आपणांत सामावून

होत होता. राधेच्या दर्शनाचा मद्य पिऊन हे पक्षी उन्मत्त झालेले होते आणि थयथया नृत्य करीत होते. तें कटाक्षनृत्य पाहून राधेची प्रणयभावना उतूं आली.

**वदनकमलपरिशीलनमीलितमिहिरसमकुण्डलशोभम् ।**
**स्मितरुचिरुचिरसमुल्लसिताधरपल्लवकृतरतिलोभम् ॥ ५ ॥**

वदन-कमल-परिशीलन-मीलित-मिहिर-सम-कुण्डल-शोभम् ।
स्मित-रुचि-रुचिर-समुल्लसित-अधर-पल्लव-कृत-रति-लोभम् ॥ ५ ॥

कृष्णाच्या वदनाचा सहवास घडावा म्हणून सूर्यमंडलांनीं स्त्रियांचें रूप घेतलेलें होतें आणि कुंडलें बनून तीं त्याच्या कानांत लोंबत होतीं. प्रियतमेच्या स्वागतासाठीं स्मितहास्य करतांना किंचित विलग झालेल्या त्याच्या अधरोष्ठाचा रसरसित ओलेपणा आणि चंचल थरथर पाहून त्या ओंठाच्या आस्वादाचा लाभ आपणांस घडावा अशी अभिलाषा राधेच्या चित्तांत उगवली.

**शशिकिरणच्छुरितोदरजलधरसुन्दरकुसुमसुकेशम् ।**
**तिमिरोदितविधुमण्डलनिर्मलमलयजतिलकनिवेशम् ॥ ६ ॥**

शशि-किरण-च्छुरित-उदर-जल-धर-सुन्दर-कुसुम-सुकेशम् ।
तिमिर-उदित-विधु-मण्डल-निर्मल-मलय-ज-तिलक-निवेशम् ॥ ६ ॥

कृष्णानें त्याच्या विपुल निळ्या केसांत फुलांच्या माळा गुंफलेल्या होत्या. ढगांमागें उगवणाऱ्या चंद्राचे किरण त्या ढगांमधील फटींतून बाहेर यावे तशा त्या फुलमाला शोभत होत्या. त्यानें आपल्या विशाल ललाटावर लावलेला शुभ्र धवल चंदनाचा वाटोळा टिळा अंधाऱ्या निळ्या रात्रींतून दिशेच्या विशाल भालप्रदेशावर नुकत्याच उगवलेल्या पौर्णिमेच्या गरगरित वाटोळ्या तेजनिर्मल चंद्रबिंबाप्रमाणें शोभत होता.

**विपुलपुलकभरदन्तुरितं रतिकेलिकलाभिरधीरम् ।**
**मणिगणकिरणसमूहसमुज्ज्वलभूषणसुभगशरीरम् ॥ ७ ॥**

विपुल-पुलक-भर-दन्तुरितम् रति-केलि-कलाभिः अधीरम् ।
मणि-गण-किरण-समूह-समुज्ज्वल-भूषण-सुभग-शरीरम् ॥ ७ ॥

त्याच्या अंगावरील अलंकारांत नाना रत्नें होतीं. त्याच्या समुदायांतून प्रकाशकिरण उसळत होते. त्यांच्या उजळ्यामुळें त्याचें सुंदर शरीर झळाळत होतें. त्याच्या सर्वांगावर रोमांचांचा कांटा फुलला होता. राधेशीं मोठ्या कलात्मकतेनें रतिविलास करावयास तो आतां अधीर झाला होता हें त्या रोमांचामुळें प्रकट होत होतें.

**श्रीजयदेवभणितविभवद्विगुणीकृतभूषणभारम् ।**
**प्रणमत हृदि प्रणिधाय हरिं सुचिरं सुकृतोदयसारम् ॥ ८ ॥**

श्री-जयदेव-भणित-विभव-द्विगुणीकृत-भूषण-भारम् ।
प्रणमत हृदि प्रणिधाय हरिम् सु-चिरम् सुकृत-उदय-सारम् ॥ ८ ॥

जयदेवानें हें अतिशय सुंदर गीत गाइलें आहे. आधींच कृष्ण सुंदर. त्यांत त्याचे अलंकारहि सुंदर. पण जयदेवाच्या या गीतामुळें त्या सौंदर्याची प्रचीति दुप्पट झाली आहे. कृष्णाचें हें दर्शन पूर्व पुण्याच्या फलाप्रमाणें मनोहर आहे. रसिकांनीं हें दर्शन चिरकाल हृदयांत धारण करावें.

*बाविसावी अष्टपदी समाप्त*

**अतिक्रम्यापाङ्गं श्रवणपथपर्यन्तगमन-**
**प्रयासेनेवाक्ष्णोस्तरलतरतारं पतितयोः ।**
**इदानीं राधायाः प्रियतमसमालोकसमये**
**पपात स्वेदाम्बुप्रसर इव हर्षाश्रुनिकरः ॥ २ ॥**

अतिक्रम्य अपाङ्गम् श्रवण-पथ-पर्यन्त-गमन-
प्रयासेन इव अक्ष्णोः तरलतर-तारम् पतितयोः ।
इदानीम् राधायाः प्रियतम-समालोक-समये
पपात स्वेद-अम्बु-प्रसर इव हर्ष-अश्रु-निकरः ॥ २ ॥

अतिशय लाडक्या अशा प्रियतमाच्या समागमाचा समय आतां जवळ आला होता. राधेच्या भावनांना अनावर पूर आला आणि तिच्या नयनांतून एकाएकीं आनंदाश्रूंचा पूर वाहूं लागला. जणू त्या नयनांतील बाहुल्या कृष्णाला एकदमच सगळीकडून पाहून घेण्या-साठीं वेगानें फिरूं लागल्या. जणू ते डोळे साऱ्या कृष्णाला एकदम आपणांत सामावून

घेण्याच्या खटाटोपांत त्यांच्या मर्यादा ओलांडून कानांपर्यंत जाऊं लागले. यामुळें ते श्रमले आणि त्यांतून श्रमजलाचाच महापूर अश्रूंच्या रूपानें बाहेर उसळला.

**भजन्त्यास्तल्पान्तं कृतकपटकण्डूतिपिहित-**
**स्मितं याते गेहाद् बहिरवहितालीपरिजने ।**
**प्रियास्यं पश्यन्त्याः स्मरशरवशाकूतसुभगं**
**सलज्जा लज्जापि व्यगमदिव दूरं मृगदृशः ॥ ३ ॥**

भजन्त्याः तल्प-अन्तम् कृत-कपट-कण्डूति-पिहित-
स्मितम् याते गेहात् बहिः अवहित आली-परिजने ।
प्रिय-आस्यम् पश्यन्त्याः स्मर-शर-वश-आकूत-सुभगम्
सलज्जा लज्जा अपि व्यगमत् इव दूरम् मृगदृशः ॥ ३ ॥

राधा जाऊन शयनाच्या कडेला बसली. प्रेमविहारासाठीं आतुर झालेल्या कृष्णाच्या नयनांतील आर्जवी आवाहन ती पाहूं लागली. तिच्या सख्या सावध आणि चतुर होत्या. आतां समय आला हें त्यांनीं ओळखलें. राधेच्या या उतावळीमुळें त्यांना पूर्वीचा तिचा रुसवा आठवून हसूं येऊं लागलें. पण मोठ्या चातुराईनें न खाजणारा कान खाजविण्याच्या मिषानें त्यांनीं कानांत बोटें घातलीं आणि आपले भाव लपवून त्या बाहेर गेल्या. राधा आणि कृष्ण या दोघांत आतां आपलीच अडचण आहे हें तिच्या लज्जेच्या ध्यानांत आलें आणि प्रणयमीलनांत अडथळा आणणाऱ्या आपल्या निर्लज्जपणाची लाज वाटून ती लाज राधेला सोडून गेली.

या पुढील तीन श्लोकांत सर्गांतीचें आशीर्वचन आहे.

**जयश्रीविन्यस्तैर्महित इव मन्दारकुसुमैः**
**स्वयं सिन्दूरेण द्विपरणमुदा मुद्रित इव ।**
**भुजापीडक्रीडाहतकुवलयापीडकरिणः**
**प्रकीर्णासृग्बिन्दुर्जयति भुजदण्डो मुरजितः ॥ ४ ॥**

जय-श्री-विन्यस्तैः महित इव मन्दार-कुसुमैः
स्वयम् सिन्दूरेण द्विप-रण-मुदा मुद्रितः इव ।

भुज-आपीड-क्रीडा-हत-कुवलय-आपीड-करिण:
प्रकीर्ण-असृक्-विन्दु: जयति भुज-दण्ड: मुर-जित: ॥ ४ ॥

कृष्णावर कुवलयापीड हत्ती चालून आला तेव्हां कृष्णानें नुसत्या आपल्या भुजदंडानं त्याला ठार मारलें. त्या वेळीं हत्तीच्या मस्तकांतून रक्ताचे शिंतोडे उडाले आणि त्यांनीं कृष्णाचा तो हात रंगून गेला. तेव्हां असें वाटलें कीं, कृष्णासारख्या उमद्या शत्रूची रणांत गांठ पडली म्हणून कुवलयापीडाला वाटलेला रणानंद साकार झाला व त्यानें सिंदूर उधळून कृष्णाची पूजा केली. स्वतः जयदेवतेनें मंदार सुमनांची उधळण करून गौरविल्याप्रमाणें तो हात दिसत होता. मुरारींचा तो भुजदंड विजयी असो.

**सानन्दं नन्दसूनुर्दिशतु मितपरं सम्मदं मन्दमन्दम्**
**राधामाधाय वाह्वोर्विवरमनु दृढं पीडयन्प्रीतियोगात् ।**
**तुङ्गौ तस्या उरोजावतनु वरतनोर्निर्गतौ मा स्म भूताम्**
**पृष्ठं निर्भिद्य तस्माद्बहिरिति वलितग्रीवमालोकयन्वः ॥ ५ ॥**

सानन्दम् नन्द-सूनु: दिशतु मित-परम् सम्मदम् मन्द-मन्दम्
राधाम् आधाय वाह्वो: विवरम् अनु दृढम् पीडयन् प्रीतियोगात् ।
तुङ्गौ तस्या: उरोजौ: अ-तनु वर-तनो: नि:-गतौ मा स्म भूताम्
पृष्ठं निर्भिद्य तस्मात् वहि: इति वलित-ग्रीवम् आलोकयन् व: ॥५॥

आनंदित झालेला नंदनंदन कृष्ण सुकुमार राधेला अतिशय हळुवारपणें आपल्या बाहूंच्या विळख्यांत घेत आहे. परंतु त्याची हळुवारता तत्क्षणीं प्रीतीच्या ओघांत बुडून जात आहे. त्यामुळें तिला वेदना होतील अशा कठोरपणें तो तिला आपल्या छातीशीं आवळीत आहे. ज्यानें हळुवार व्हावें तोच आडदांड झाला; ज्यानें कुरवाळावें तोच कुसकरूं लागला; तेव्हां आतां या सुकुमार अबलेचें रक्षण कोण करणार अशा काळजीनें तिच्या हृदयांतील उबेवर पोसलेले राधेचे टणक स्तन कृष्णाच्या प्रतिकारासाठीं उंचावत आहेत. कृष्णाला भास होत आहे कीं, त्यांचे भाले त्याची छाती पोखरून पाठींतून बाहेर येत आहेत. हा भास खरा तर नाहींना अशा विस्मयानें तो मान वळवून मागें पाहात आहे. आलिंगनांतील वेदना-सुखाचा आगळा अनुभव उपभोगणारा हा कृष्ण रसिकांच्या जीवनांत प्रणयानंदाचें अपार विश्व उत्पन्न करो.

**सौन्दर्यैकनिधेरनङ्गललनालावण्यलीलाजुषो**
**राधाया हृदि पल्वले मनसिजक्रीडैकरङ्गस्थले ।**
**रम्योरोजसरोजखेलनरसित्वादात्मनः ख्यापयन्**
**ध्यातुर्मानसराजहंसनिभतां देयान्मुकुंदो मुदान् ॥ ६ ॥**

सौन्दर्य-एक-निधेः अनङ्ग-ललना-लावण्य-लीला-जुषः
राधायाः हृदि पल्वले मनसिज-क्रीडा-एक-रङ्ग-स्थले ।
रम्य-उरोज-सरोज-खेलन-रसित्वात् आत्मनः ख्यापयन्
ध्यातुः मानस-राज-हंस-निभताम् देयान् मुकुन्दः मुदान् ॥ ६ ॥

राधा ही जणू सौंदर्याचा एकमेव सांठाच आहे. मदनाची पत्नी रती हिच्या लीलाललित सौंदर्यालाहि राधेनें जिंकिलें आहे. या राधेचें विशाल वक्षस्थल म्हणजे जणू मदनानें आपल्या क्रीडा खेळण्यासाठीं निवडलेला विस्तृत असा एकमेवाद्वितीय रंगमंच आहे. सरोवरासारख्या विशाल अशा या वक्षप्रदेशावर उमललेल्या स्तनकमलांशीं खेळण्यांत कृष्ण पार रंगून गेलेला आहे. राधेप्रमाणें जे त्याचें एकाग्रपणें ध्यान करतात त्याच भक्तांच्या वक्षकमलांत राजहंसाप्रमाणें विहार करणें हीच आपणाला सर्वाधिक प्रिय गोष्ट आहे असें तो या स्तनलालनानें प्रकट करीत आहे. हा कृष्ण मुकुंद त्या भक्तांना आनंददायी ठरो.

*बाविसावा प्रबंध समाप्त*

*अकरावा सर्ग समाप्त*

# सर्ग बारावा : सुप्रीतपीतांबर

## प्रबंध तेविसावा

**गतवति सखीवृन्दे मन्दत्रपाभरनिर्भर**
**स्मरशरवशाकूतस्फीतस्मितस्नपिताधराम् ।**
**सरसमनसं दृष्ट्वा राधां मुहुर्नवपल्लव-**
**प्रसवशयने निक्षिप्ताक्षीमुवाच हरिः प्रियाम् ॥ १ ॥**

गतवति सखी-वृन्दे मन्द-त्रपा-भर-निर्भरः
स्मर-शर-वश-आकूत-स्फीत-स्मित-स्नपित-अधराम् ।
सरस-मनसम् दृष्ट्वा राधाम् मुहुः नव-पल्लव-
प्रसव-शयने निक्षिप्त-अक्षीम् उवाच हरिः प्रियाम् ॥ १ ॥

सख्यांचा समुदाय निवून गेला. राधेच्या मनावरील लज्जेचा भार ओसरला आणि प्रणयाचा बहर फुलला. वासनावशतेतून फुलणाऱ्या आमंत्रक हास्यांत तिचा अधरोष्ठ न्हाऊन निघाला. कोवळ्या फुलांपानांच्या शयनाकडे ती सूचकपणें सारखी सारखी पाहूं लागली. तेव्हां तिची वासना आतां पाडाला आली हें ओळखून कृष्ण त्या आपल्या प्रियतमेला प्रणयोत्सुक वृत्तीनें म्हणाला,

## अष्टपदी तेविसावी

राग–विभास : ताल–एकताल

**क्षणमधुना नारायणमनुगतमनुसर माराधिके ॥ ध्रु० ॥**

क्षणम् अधुना नारायणम् अनुगतम् अनुसर मार-अधिके ॥ ध्रु० ॥

हे प्रणयविव्हल सुंदरी, मी नारायण तुला शरण आलों आहें. आतां तूं क्षणभरतरी माझी हो.

**किसलयशयनतले कुरु कामिनि चरणनलिनविनिवेशम् ।**
**तव पदपल्लववैरिपराभवमिदमनुभवतु सुवेशम् ॥ १ ॥**

किसलय-शयन-तले कुरु कामिनि चरण-नलिन-विनिवेशम् ।
तव पद-पल्लव-वैरि-पराभवम् इदम् अनुभवतु सुवेशम् ॥ १ ॥

हे प्रणयोत्सुके, तुझे चरण कमलिनीसारखे कोमल आहेत. तूं यांना फुलांच्या या कोमल शय्येवर ठेव. ज्यांची शय्या बनविली आहे ते हे वृक्षांकुर तुझ्या पायांच्या कोवळेपणाशीं स्पर्धा करतात. म्हणून ते या पायांचे प्रतिस्पर्धीच आहेत. त्यांना खालीं घालून त्यांचा पराभव करण्याचें सुख तुझ्या या मृणालकोमल पावलांना लाभूं दे.

**करकमलेन करोमि चरणमहमागमिताऽसि विदूरम् ।**
**क्षणमुपकुरु शयनोपरि मामिव नूपुरमनुगतिशूरम् ॥ २ ॥**

कर-कमलेन करोमि चरण-महम् आगमिता असि विदूरम् ।
क्षणम् उपकुरु शयन-उपरि माम् इव नूपुरम् अनुगति-शूरम् ॥ २ ॥

राधे, तूं माझ्यासाठीं इतक्या दूर आलीस. तुझे पाय श्रमले असतील. ये. मी माझ्या नाजुक हातांनीं तुझी चरणसेवा करतों. तुझ्या पायाचे दास म्हणून हे नूपुर तुझ्या बरोबर जातात. त्यांना तूं तुझ्या पायांना मिठी मारूं देतेस. मीसुद्धां तुझ्या पायांची सेवा घडावी म्हणून वाटेल तो पराक्रम करून सारे अडथळे दूर करणारा तुझ्या चरणांचा दासच आहे. या शयनावर बसून तुझ्या पायांना मिठी मारण्याचें या नूपुरांचें भाग्य मला दे.

**वदनसुधानिधिगलितममृतमिव रचय वचनमनुकूलम् ।**
**विरहमिवापनयामि पयोधररोधकमुरसि दुकूलम् ॥ ३ ॥**

वदन-सुधा-निधि-गलितम् अमृतम् इव रचय वचनम् अनुकूलम् ।
विरहम् इव अपनयामि पयोधर-रोधकम् उरसि दुकूलम् ॥ ३ ॥

तुझें वदन हें अमृताचा कुंभ आहे. प्रीतीला अनुकूल अशा तुझ्या शब्दांना अमृत-कुंभांतून गळणाऱ्या अमृताची माधुरी आहे. ते शब्द तूं मला ऐकव. स्तनांवर घट्ट बांधलेलें

हें रेशमी वस्त्र त्यांच्या प्रसरणांत अडथळा करीत आहे. आपणांतील विरह आतां या वस्त्रांतच उरला आहे. मी आतां तें वस्त्र आणि आपणांतील विरह एकदमच दूर करणार आहें.

**प्रियपरिरम्भणरभसवलितमिव पुलकितमतिदुरवापम् ।**
**मदुरसि कुचकलशं विनिवेशय शोषय मनसिजतापम् ॥ ४ ॥**

प्रिय-परिरम्भण-रभस-वलितम् इव पुलकितम् अति-दुः-अवापम् ॥
मत्-उरसि कुच-कलशम् विनिवेशय शोषय मनसिज-तापम् ॥ ४ ॥

तुझ्या वक्षस्थलाचें ओझरतें दर्शनसुद्धां मला कधींतरी मोठ्या कष्टानेंच झालें तर घडतें. रोमांचांनीं फुललेल्या अवस्थेंतील त्याचें हें दर्शन मोठें वेधक आहे. लाडक्या मिठींत शिरण्यासाठीं कोणीं उसळी घ्यावी तसे हे तुझे स्तन उभारींत उसळत असतांना दिसत आहेत. राधे, आतां दूर कां? माझ्या उरांत आग भडकली आहे. तुझ्या उरावर भरलेले कुंभ आहेत. आग पेटलेली दिसत असतांनाहि तिच्यावर जलकुंभ उपडे न करणें हें क्रौर्य होय. तूं क्रूर नाहींस. तुझ्या स्तनांचे कुंभ माझ्या छातीवर उपडे करून तूं आतां ही आग विझव.

**अधरसुधारसमुपनय भामिनि जीवय मृतमिव दासम् ।**
**त्वयि विनिहितमनसं विरहानलदग्धवपुषमविलासम् ॥ ५ ॥**

अधर-सुधा-रसम् उपनय भामिनि जीवय मृतम् इव दासम् ।
त्वयि विनिहित-मनसम् विरह-अनल-दग्ध-वपुषम् अ-विलासम् ॥५॥

भामिनी, मी तुझाच दास आतां मेल्यांत जमा आहें. असाध्य दिसणाऱ्या व्याधीनें मला ग्रासलेलें आहे. तुझ्या अधरांतील अमृताचा मात्रास्पर्श हेंच या व्याधीवर औषध आहे. तुझाच मी, तुझ्याशीं विलास करावयास न मिळाल्यानें आर्त आहें. वैद्याला व्यथेची परीक्षा असावी, तशी तुला माझ्या व्यथेची परीक्षा आहे. तुझ्याकडे त्या व्यथेवर औषधहि आहे. माझें मन श्रद्धेनें तुझ्यांतच जडलें आहे. तुझ्याच औषधानें मला उतार पडणार अशी माझी निष्ठा आहे. तरी आतां त्या अधररसाची मात्रा माझ्या जिभेला चाटवून मला जीवदान दे.

**शशिमुखि मुखरय मणिरशनागुणमनुगुणकण्ठनिदानम् ।**
**मम श्रुतियुगले पिकरवविकले शमय चिरादवसादम् ॥ ६ ॥**

शशि-मुखि मुखरय मणि-रशना-गुणम् अनुगुण-कण्ठ-निदानम् ।
मम श्रुति-युगुले पिक-रव-विकले शमय चिरात् अवसादम् ।। ६ ।।

चंद्रमुखी राधिके, तूं मदननृत्य करतेस तेव्हां तुझ्या कमरेवरील मेखला रुणझुणते. तिचा आवाज तुझ्या कण्ठस्वराप्रमाणेंच श्रुतिमधुर असतो. कोकिलांचा कलरव ऐकून ऐकून माझे कान आतां फार वेळ शिणलेले आहेत. त्यांची वेदना उणावण्यासाठीं तूं आतां माझ्याबरोबर मदननृत्य कर आणि मेखलेच्या मणिरव निनादित कर.

**मामतिविफलरुषा विकलीकृतमवलोकितुमधुनेदम् ।**
**लज्जितमिव नयनं तव विरमति सृजसि वृथा रतिखेदम् ।। ७ ।।**

माम् अति-विफल-रुषा विकलीकृतम् अवलोकितुम् अधुना इदम् ।
लज्जितम इव नयनम् तव विरमति सृजसि वृथा रति-खेदम् ।। ७ ।।

राधे, तूं माझ्यावर अकारण रागावलीस. त्यामुळ माझी ही अशी विकल दशा झाली. आतां तुला ती बघवत नाहीं असें दिसतें. माझ्याकडे वळणारी तुझी नजर तुझ्या या क्रूरपणाची तिला लाज वाटते म्हणूनच पुन्हां पुन्हां दूर वळत आहे. मी झालें गेलें विसरलों. तूंहि विसर आणि हा संकोच सोडून दे. कारण त्याच्यामुळें कुणालाच सुख न होतां या क्षणीं जी रतिलीला आपणासमोर आहे तिच्यांत खेदाचे रंग अकारण मिसळत आहेत.

**श्रीजयदेवकवेरिदमनुपदनिगदितमधुरिपुमोदम् ।**
**जनयतु रसिकजनेषु मनोरमरतिरसभावविनोदम ।। ८ ।।**

श्री-जयदेव-कवेः इदम् अनुपद-निगदित-मधु-रिपु-मोदम् ।
जनयतु रसिक-जनेषु मनो-रम-रति-रस-भाव-विनोदम् ।। ८ ।।

जयदेवानें गाइलेल्या अतिमधुर गीताच्या शब्दांशब्दांतून कृष्णाच्या वाढत्या आनंदाचें वर्णन आहे. प्रीतीचे अतिशय मधुर असे अनुभव या गीतांत वर्णिले आहेत. हें गीत रसिकजनांच्या हृदयांत आनंद निर्माण करो.

**प्रत्यूहः पुलकाङ्कुरेण निबिडाश्लेषे निमेषेण च**
**क्रीडाकूतविलोकितेऽधरसुधापाने कथाकेलिभिः ।**

**आनन्दाधिगमेन मन्मथकलायुद्धेऽपि यस्मिन्नभू-**
**दुद्भूतः स तयोर्बभूव सुरतारम्भः प्रियंभावुकः ॥ २ ॥**

प्रत्यूहः पुलक-अङ्कुरेण निविड-आश्लेषे निमेषेण च
क्रीडा-आकूत-विलोकिते अधर-सुधा-पाने कथा-केलिभिः ।
आनन्द-अधिगमेन मन्मथ-कला-युद्धे अपि यस्मिन् अभूत्
उद्भूतः स तयोः बभूव सुरत-आरम्भः प्रियं-भावुकः ॥ २ ॥

नंतर भावविवश अशा त्या प्रेमिकांच्या प्रीतिलीलांना आरंभ झाला. प्रणयाचें हें समर म्हणजे रतिकेलींतील कलांची कसोटीच होती. या कसोटीचें स्वरूप आनंदमय होतें. या आनंदांत अंगांना अंगें भिडलीं तेव्हां मधें फक्त रोमांचांचीच अडचण राहिली. दृष्टीला दृष्टि भिडली तेव्हां मधें खंड फक्त निमिषासाठीं मिटणाऱ्या पापण्यांमुळेंच पडला. अमृताचें पान करण्यासाठीं जुळलेले ओंठ केवळ गुजगोष्टी करण्यासाठींच विलग झाले.

**दोर्भ्यां संयमितः पयोधरभरेणापीडितः पाणिजै-**
**राविद्धो दशनैः क्षताधरपुटः श्रोणीतटेनाहतः ।**
**हस्तेनानमितः कचेऽधरमधुस्यन्देन सम्मोहितः**
**कान्तः कामपि तृप्तिमापतदहो कामस्य वामा गतिः ॥ ३ ॥**

दोर्भ्याम् संयमितः पयोधर-भरेण आपीडितः पाणि-जैः
आविद्धः दशनैः क्षत-अधर-पुटः श्रोणीतटेन आहतः ।
हस्तेन आनमितः कचे अधर-मधु-स्यन्देन सम्मोहितः
कान्तः काम् अपि तृप्तिम् आपतत् अहो कामस्य वामा गतिः ॥३॥

कृष्ण राधेच्या हातांनीं बांधला गेला होता. तिच्या स्तनांच्या ओझ्याखालीं तो चेंगरला होता. तो नखांनीं ओरखडला जात होता; दांतांनीं चावला जात होता; मांड्यांनीं मारला जात होता. त्याचे केस धरून राधा त्याला वाटेल तसा वांकवीत होती. तिच्या ओठांतील मधाचें विष त्याच्या ओठांतून त्याच्या अंगांत भिनत होतें. सगळीकडून अशा तऱ्हेनें मार खात असतांहि तो राधेचा प्रियकर अनुभव मात्र आगळ्याच सुखतृप्तीचा घेत होता. प्रणयाची वाटच वेडी असते म्हणतात ते खरें.

**वामाङ्के रतिकेलिसङ्कुलरणारम्भे तया साहस-**
**प्रायं कान्तजयाय किञ्चिदुपरि प्रारम्भि यत्सम्भ्रमात् ।**
**निष्पन्दा जघनस्थली शिथिलिता दोर्वल्लिरुत्कम्पितं**
**वक्षो मीलितमक्षि पौरुषरसः स्त्रीणां कुतः सिध्यति ॥ ४ ॥**

वाम-अङ्के रति-केलि-सङ्कुल-रण-आरम्भे तया साहस-
प्रायम् कान्त-जयाय किञ्चित् उपरि प्रारम्भि यत् सम्भ्रमात् ।
निष्पन्दा जघन-स्थली शिथिलिता दोः-वल्लिः उत्कम्पितम्
वक्षः मीलितम् अक्षि पौरुष-रसः स्त्रीणाम् कुतः सिध्यति ॥ ४ ॥

प्रीतियुद्धाला आरंभ झाला तेव्हां त्या हातघाईच्या संभ्रमांत कृष्णावर आपण विजय मिळवावा असें साहस राधेला सुचलें. तेव्हां ती कृष्णाच्या डाव्या अंगाला होती ती हें साहस सुचतांच एकदम वरचढ झाली. पण तिच्या शौर्याचा हा आवेश लौकरच संपला. हातांत जोर उरला नाहीं म्हणून ते शिथिल झाले. शरीराची हालचाल थांबली. ऊर धपापूं लागलें आणि डोळे श्रमानें मिटले. बायका त्या बायकाच. त्यांनीं पुरुषाचें मोठें सोंग आणलें म्हणून त्यांना पुरुषांचा पराक्रम थोडाच साध्य होणार आहे ?

**तस्याः पाटलपाणिजांकितमुरो निद्राकषाये दृशौ**
**निर्धूतोऽधरशोणिमा विलुलितस्रस्तस्रजो मूर्धजाः ।**
**काञ्चीदामदरश्लथाञ्चलमिति प्रातर्निखातैर्दृशो-**
**रेभिःकामशरैस्तदद्भुतमहो पत्युर्मनः कीलितम् ॥ ५ ॥**

तस्याः पाटल-पाणिज-अंकितम् उरः निद्रा-कषाये दृशौ
निर्धूतः अधर-शोणिमा विलुलित-स्रस्त-स्रजः मूर्ध-जाः ।
काञ्ची-दाम-दर-श्लथ-अञ्चलम् इतिः प्रातः निखातैः दृशोः
एभिः काम-शरैः तत् अद्भुतम् अहो पत्युः मनः कीलितम् ॥ ५ ॥

पहाट झाली. राधा जिंकली गेली होती. तिच्या वक्षभागावर कृष्णाच्या कमलकरांच्या नखांच्या खुणा होत्या. रात्रभराच्या जागरणानें तिची दृष्टि लाल लाल झाली होती. ओठां-वरील लाली धुतल्यासारखी फिकट झाली होती. विस्कटलेल्या केसांतील सारे पुष्पहार ओघळले होते. बंधन ढिलें झालें असल्यानें कटिवस्त्राची मेखला खालीं घसरली होती. कृष्ण

तिच्याकडे पाहात होता. आणि एकाएकीं मोठा चमत्कार झाला. कमल, आम्रमंजिरी, मोगरा अशा मदनांच्या बाणांनीं जसा पराक्रम केला तसाच पराक्रम राधेच्या उरावरील नखांच्या खुणा, तिच्या नजरेंतील लाली, तिचा फिकट ओठ, तिचा सैल केशसंभार आणि तिचें ढिलावलेलें वस्त्र या पांच बाणांनीं केला. आणि कृष्णाचें मन पुन्हां प्रणयत्रासनेनें व्याकूळ झालें.

**त्वामप्राप्य मयि स्वयम्वरपरां क्षीरोदतीरोदरे**
**शंके सुन्दरि कालकूटमपिबन्मूढो मृडानीपतिः ।**
**इत्थं पूर्वकथाभिरन्यमनसो विक्षिप्य वामाञ्चलं**
**राधायाः स्तनकोरकोपरि लसन्नेत्रो हरिः पातु वः ॥ ६ ॥**

त्वाम् अ-प्राप्य मयि स्वयं-वर-पराम् क्षीर-उद-तीर-उदरे
शंके सुन्दरि कालकुटम् अपिबत् मूढः मृडानी-पतिः ।
इत्थम् पूर्व-कथाभिः अन्य-मनसा विक्षिप्य वाम-अञ्चलम्
राधायाः स्तन-कोरक-उपरि लसत्-नेत्रः हरिः पातु वः ॥ ६ ॥

नंतर कृष्ण राधेला म्हणाला,

" लक्ष्मीचें रूप घेऊन तूं क्षीरसागरांतून बाहेर आलीस. बाहेर येतांच स्वतःच्या मनानेंच माझ्याशीं विवाह करण्याचा निर्णय तूं प्रकट केलास. तेव्हां तूं मिळत नाहींस असें पाहूनच त्रागयानें आणि हताशेनें त्या वेड्या शंकरानें हलाहल पिऊन टाकलें असें मला वाटतें."

अशा जुन्या आठवणी कृष्ण काढूं लागला. तेव्हां राधा त्यांत रंगली आणि तिचें भान हरपलें. तेव्हां बोलतां बोलतां हळूच कृष्णानें तिचा पदर दूर केला आणि तिच्या स्तनांच्या कळ्यांवर आपली दृष्टि जडविली. तो कृष्ण तुमचें कल्याण करो.

**व्यालोलः केशपाशस्तरलितमलकैः स्वेदलोलौ कपोलौ**
**स्पष्टा दष्टाधरश्रीः कुचकलशरुचा हारिता हारयष्टिः ।**
**काञ्ची काञ्चिद्गताशा स्तनजघनपदं पाणिनाच्छाद्य सद्यः**
**पश्यन्ती सत्रपा सा तदपि विलुलिता मुग्धकान्तिर्धिनोति ॥ ७ ॥**

व्यालोलः केश-पाशः तरलितम् अलकैः स्वेद-लोलौ कपोलौ
स्पष्टा दष्टा अधर-श्रीः कुच-कलश-रुचा हारिता हार-यष्टिः ।

काञ्ची काञ्चित् गत-आशा स्तन-जघन-पदम् पाणिना आच्छाद्य सद्यः
पश्यन्ती स-त्रपा सा तत् अपि वि-लुलिता मुग्ध-कान्तिः धिनोति ।।७।।

राधेच्या वेणीची वीण उसवली होती. केस वाऱ्यावर भुरभुर उडत होते. गाल घामानं भिजलेले होते. अंगराग वितळला होता. ओठावरचा शृंगार फराटला होता. चोळी असेतोंपर्यंत थोडेतरी सुंदर दिसणारे मोत्याचे हार आतां उघड्या पडलेल्या स्तनाच्या शोभेपुढें निस्तेज दिसत होते. वस्त्रच जाग्यावर नसल्यानं सावरावयाचें तरी काय अशा संभ्रमानें कांची हताश झाली होती. आपलें वक्षस्थल आणि उटीपोट हातांनींच कसेंबसें झांकण्याचा प्रयत्न लज्जाभावनम्रा राधा करीत होती. आपल्या प्रसाधनविरहित मूळ रूपाकडे तिचें चित्त लागलेलें होतं. आणि त्या मुग्धविलोल स्वरूपांत ती कृष्णाला अधिक प्रिय वाटत होती.

**ईषन्मीलितदृष्टिमुग्धविलसत्सीत्कारधारावशात्**
**अव्यक्ताकुलकेलिकाकुविकसद्दन्तांशुधौताधरम् ।**
**शान्तस्तब्धपयोधरं भृशपरिष्वङ्गात्कुरङ्गीदृशो**
**हर्षोत्कर्षविमुक्तनिःसहतनोर्धन्यो धयत्याननम् ॥ ८ ॥**

ईषत्-मीलित-दृष्टि-मुग्ध-विलसत्-सीत्कार-धारावशात्
अव्यक्त-आकुल-केलि-काकु-विकसत्-दन्त-अंशु-धौत-अधरम् ।
शान्त-स्तब्ध-पयोधरम् भृश-परिष्वङ्गात् कुरङ्गी-दृशः
हर्ष-उत्कर्ष-विमुक्त-निःसह-तनोः धन्यः धयति आननम् ।। ८ ।।

राधेचे नयन तृप्तीच्या समाधींत किंचित् मिटलेले होते. अनागस हास्य तिच्या चेहऱ्यावर विलसत होतें. सुखाची पावती देणारे सीत्कार आणि रतिकेलीचा कळस भूषविणारी आकुल कुजबुज करतांना तिच्या दांतांची मंगल प्रभा प्रकाशत होती आणि तिचा ओठ त्या प्रभेच्या सौंदर्यांत न्हाऊन निघत होता. पुन्हां पुन्हां आलिंगनांत चुरडलेले पयोधर आतां शांत होते. त्यांची थरथर संपली होती. उत्कट हर्षाच्या असह्य अनुभूतींतून याच क्षणीं मोकळी झालेली असल्यानं तिची तनू या वेळीं दुसरा कसलाहि स्पर्श सहन करूं शकत नव्हती. या आनंदाच्या अनुभूतीवर तिला नेऊन धन्य झालेला कृष्ण तिच्या वदनाचीं इवलीं इवलीं चुंबनें घेत होता.

**इति च सहसा प्रीतं सुरतान्ते मानितातिखिन्नाङ्गी ।**
**राधा जगाद सादरमिदमानन्देन गोविन्दम् ॥ ९ ॥**

इति च सहसा प्रीतम् सु-रत-अन्ते मानित अति-खिन्न-अङ्गी ।
राधा जगाद सादरम् इदम् आनन्देन गोविन्दम् ॥ ९ ॥

अशा प्रकारें प्रणयक्रीडा पूर्ण झाली. राधेचीं अंगें अगदीं गळून गेलीं होतीं तिच्या शिणलेल्या कायेचा कृष्ण हळुवार प्रीतीनें सन्मान करीत होता. त्याच्या या कोवळ्या समजुतदारपणामुळें राधेचें मन एकाएकी तिच्या लाडक्या गोविंदाविषयीं आदरानें भरून आलें आणि ती आनंदानें त्याच्याशीं बोलूं लागली.

*तेविसावा प्रबंध समाप्त*

# प्रबंध चोविसावा

**अथ निर्गतबाधा सा राधा स्वाधीनभर्तृका ।**
**निजगाद रतिक्लान्तं कान्तं मण्डनवाञ्छया ॥ १ ॥**

अथ निर्गत-बाधा सा राधा स्वाधीनभर्तृका ।
निजगाद रति-क्लान्तम् कान्तम् मण्डन-वाञ्छया ॥ १ ॥

राधेची सारी प्रणयव्यथा आतां संपलेली होती. प्रणयांतील आपल्या कौशल्यानें पतीला तृप्त करून तिनें त्याला आपल्या मुठींत आणलेलें होतें. प्रीतीच्या आनंदानें भारावलेला तिचा प्रियकर तिच्या कुशींतच होता. त्याच्याकडून आपला शृंगार करून घ्यावा अशी हौस राधेच्या मनांत बळावली आणि ती कृष्णाला म्हणाली.

## अष्टपदी चोविसावी

राग–रामकरी : ताल–यति

**निजगाद सा यदुनन्दने क्रीडति हृदयानन्दने ॥ ध्रु० ॥**

निजगाद सा यदु-नन्दने क्रीडति हृदय-आनन्दने ॥ ध्रु० ॥

प्रणयपूर्तीच्या नंतर सहजच घडणारे [illegible] खेळणाऱ्या प्राणप्रिय अशा यदुनंदन कृष्णाला राधा म्हणाली.

**कुरु यदुनन्दन चन्दनशिशिरतरेण करेण पयोधरे ।**
**मृगमदपत्रकमत्र मनोभवमङ्गलकलशसहोदरे ॥ १ ॥**

कुरु यदु-नन्दन चन्दन-शिशिर-तरेण करेण पयोधरे ।
मृग-मद-पत्रकम् अत्र मनोभव-मङ्गल-कलश-सहोदरे ॥ १ ॥

कृष्णा, तुझ्या हातांचा स्पर्श चंदनाच्या स्पर्शाहूनहि अधिक शीतल आहे. माझे स्तन मदनाच्या पूजेंत मांडलेल्या मंगल कलशांप्रमाणें आहेत. प्रणयरणांत आपण आनंदाच्या यशावर चढलों तें या कलशांनीं सहकाराची कृपा केली म्हणूनच. आतां या कलशांची पूजा तूं तुझ्या हातानें कर. तूं तुझ्या हातांनीं कस्तुरी कालव आणि पूजेच्या कलशाभोंवतीं शुभकर अशा आम्रपत्रांची मांडणी असते तशीं पत्रें माझ्या स्तनांवर त्या कस्तुरीनें चितार.

**अलिकुलगञ्जनसञ्जनकं रतिनायकसायकमोचने ।**
**त्वदधरचुम्बनलम्बितकज्जलमुज्ज्वलय प्रियलोचने ॥ २ ॥**

अलि-कुल-गञ्जन-सञ्जनकम् रति-नायक-सायक-मोचने ।
त्वत्-अधर-चुम्बन-लम्बित-कज्जलम् उज्ज्वलय प्रिय-लोचने ॥ २ ॥

प्रणयाच्या रणांत रतिपति मदनाचें बाण सोडण्याचें काम माझ्या या नयनांनीं केलें. तूं चुंबनें घेतलींस तेव्हां त्यांतील सारें काजळ पुसलें गेलेलें आहे. तूं आतां तुझ्या हातांनी माझ्या डोळ्यांत काजळ घाल. तुझ्या प्रीतिपूर्ण करांनीं तें काजळ घातलें कीं तें अधिक उज्ज्वल दिसेल आणि तें पाहून भ्रमरांनाहि त्यांच्या दाट काळ्या रंगाची लाज वाटेल.

**नयनकुरङ्गतरङ्गविलासनिरोधकरे श्रुतिमण्डले ।**
**मनसिजपाशविलासधरे शुभवेष निवेशय कुण्डले ॥ ३ ॥**

नयन-कुरङ्ग-तरङ्ग-विलास-निरोध-करे श्रुति-मण्डले ।
मनसि-ज-पाश-विलास-धरे शुभ-वेष निवेशय कुण्डले ॥ ३ ॥

तुला घायाळ करणाऱ्या माझ्या नयनांतील हरिणींच्या सामर्थ्यविस्ताराला माझ्या कानांनींच मर्यादा घातली. प्रीतीच्या विलासांसाठी माझें वदन जवळ घेतांना तूं तुझें

करपाश माझ्या केशपाशांत गुंतविलेस तेव्हां त्या करांना या कानांनींच आधार दिला. या कानांची आतां तूं पूजा कर. त्यांच्या पाळींत तूं आतां सुवर्णकुंडलें घाल.

**भ्रमरचयं रचयन्तमुपरि रुचिरं सुचिरं मम सम्मुखे ।**
**जितकमले विमले परिकर्मय नर्मजनकमलकं मुखे ॥ ४ ॥**

भ्रमर-चयम् रचयन्तम् उपरि रुचिरम् सुचिरम् मम सम्मुखे ।
जित-कमले विमले परिकर्मय नर्म-जनकम् अलकम् मुखे ॥ ४ ॥

प्राणसख्या, आपल्या प्रणयानंदांत या केसांनीं सहकार दिला. त्यांनीं आनंदांत भरहि घातली. तूं आतां यांची सुंदर वेणी गुंफ. माझें मुखकमल आपल्या विमल सौंदर्यानें कमलाचाहि पराभव करतें असें तूं म्हणतोस. या सौंदर्यांत कमलाभोंवतीं ओळीनें बसलेल्या भ्रमरांच्या सौंदर्याची उणीव आहे. तूं केसांची सुंदर रचना केलीस कीं ती वेणी भ्रमराच्या महिरपीसारखी या वदनाला शोभा देईल.

**मृगमदरसवलितं ललितं कुरु तिलकमलिकरजनीकरे ।**
**विहितकलङ्ककलं कमलानन विश्रमितश्रमशीकरे ॥ ५॥**

मृग-मद-रस-वलितम् ललितम् कुरु तिलकम् अलिक रजनी-करे ।
विहित-कलङ्क-कलम् कमल-आनन-विश्रमित-श्रम-शीकरे ॥ ५ ॥

कमलानना, माझ्या ललाटावर आलेले रतिश्रांतीचे घर्मबिंदु आतां जिराले आहेत. तें आतां चांदण्यांत भिजलेल्या चंद्राप्रमाणें शोभत आहे. फक्त या चंद्रावर कलंकशोभा तेवढी उणी आहे. तूं तुझ्या हातांनीं कस्तुरीचा रस बनव आणि माझ्या ललाटावर रेखीव सुंदर तिलक लाव.

**मम रुचिरे चिकुरे कुरु मानद मनसिजध्वजचामरे ।**
**रतिगलिते ललिते कुसुमानि शिखण्डिशिखण्डकडामरे ॥ ६ ॥**

मम रुचिरे चिकुरे कुरु मान-द मनसि-ज-ध्वज-चामरे ।
रति-गलिते ललिते कुसुमानि शिखण्डि-शिखण्डक-डामरे ॥ ६ ॥

प्रीतीनें माझा बहुमान करणाऱ्या माझ्या जीवा, माझे हे सुंदर केस म्हणजे सिंहासनावर बसलेल्या मदनराजाचीं ध्वज-चामरेंच आहेत. या केसांतील रंगच्छटा पाहून मोरांनाहि

त्यांच्या पिसाऱ्यावरील रंगसंगतीची लाज वाटत आहे. प्रीतियुद्धांत यांचा शृंगार गळाला आहे. तूं यांत आतां फुलांची ललितमनोहर रचना कर.

**सरसघने जघने मम शम्बरदारणवारणकन्दरे ।**
**मणिरशनावसनाभरणानि शुभाशय वासय सुन्दरे ॥ ७ ॥**

सरस-घने जघने मम शम्बर-दारण-वारण-कन्दरे ।
मणि-रशना-वसन-आभरणानि शुभ-आशय वासय सुन्दरे ॥ ७ ॥

हे शुभंकरा, मदनानें शंबरासुराचा वध केल्यावर त्याला विश्रांती घ्यावीसें वाटलें. पर्वतांतील घनदाट, दुर्गम आणि निबिड दरींत गजराज विश्रांतीला जावा तसा मदन माझ्या विस्तृत आणि प्रीतिरसानें रसरसलेल्या उदरमूलांत विश्रांतीसाठीं प्रवेशला. तूं रत्नखचित मेखला, वस्त्रें आणि भूषणें यांनीं माझा हा सुंदर कटिप्रांत सुभूषित कर.

**श्रीजयदेववचसि शुभदे हृदयं सदयं कुरु मण्डने ।**
**हरिचरणस्मरणामृतनिर्मितकलिकलुषज्वरखण्डने ॥ ८ ॥**

श्री-जयदेव-वचसि शुभदे हृदयम् स-दयम् कुरु मण्डने ।
हरि-चरण-स्मरण-अमृत-निर्मित-कलि-कलुष-ज्वर-खण्डने ॥ ८ ॥

जयदेव कवीनें श्रीहरीच्या चरणांचें अमृतासारखें गुणगान या गीतांत केलें आहे. कलियुगांतील दोषांतून उत्पन्न होणाऱ्या कष्टांना विराम पाडून आनंद देण्यास हें गीत समर्थ आहे. रसिकांनीं याच्या गोडीचा आस्वाद हळुवार हृदयानें आणि सदयवृत्तीनें घ्यावा.

*चोवसावी अष्टपदी समाप्त*

**रचय कुचयोः पत्रं चित्रं कुरुष्व कपोलयो-**
**र्घटय जघने काञ्चीं मुग्धस्रजाकबरीभरम् ।**
**कलय वलयश्रेणीं पाणौ पदे कुरु नूपुरा-**
**विति निगदितः प्रीतः पीताम्बरोऽपि तथाऽकरोत् ॥ २ ॥**

रचय कुचयोः पत्रम् चित्रम् कुरुष्व कपोलयोः
घटय जघने काञ्चीम् मुग्ध- स्रज-कबरी-भरम्।

कलय वलय-श्रेणीम् पाणौ पदे कुरु नूपुरौ
इति निगदितः प्रीतः पीत-अम्बरः अपि तथा अकरोत् ॥ २ ॥

" कृष्णा, तूं माझ्या स्तनांवर सुंदर आकृति रंगव. माझ्या गालांवर सुंदर वेलबुट्टी काढ. माझ्या कटिप्रदेशावर वस्त्रांची गांठ बांध. माझ्या केसांची वेणी घालून त्यांत उमलत्या फुलांची माला घाल. माझ्या करांत कंकणें चढव. पायांत रत्नखचित नूपुरें बांध. " असें राधा कृष्णाला म्हणाली. तिच्या प्रीतीनें संतुष्ट झालेल्या कृष्णानें तें तें सारें तसें तसें केलें.

**पर्यङ्कीकृतनागनायकफणाश्रेणीमणीनां गणे**
**सङ्क्रान्तप्रतिबिम्बसङ्कलनया बिभ्रद्विभुर्विक्रियाम् ।**
**पादाम्भोरुहधारिवारिधिसुतामक्ष्णां दिदृक्षुः शतैः**
**कायव्यूहमिवाचरन्नुपचिताकूतो हरिः पातु वः ॥ ३ ॥**

पर्यङ्कीकृत-नाग-नायक-फणा-श्रेणी-मणीनाम् गणे
सङ्क्रान्त-प्रतिबिम्ब-सङ्कलनया बिभ्रत् विभुः विक्रियाम् ।
पाद-अम्भः-रुह-धारि-वारिधि-सुताम् अक्ष्णाम् दिदृक्षुः शतैः
काय-व्यूहम् इव आचरन् उपचित-आकूतः हरिः पातु वः ॥ ३ ॥

आपले पाय मांडीवर घेऊन चुरणाऱ्या लक्ष्मीचें दर्शन दोन डोळ्यांनीं घेऊन भगवंताचें समाधान होईना. म्हणून त्यानें सहस्रफणांच्या नागनायकाला आपला पर्यंक बनविलें. त्यामुळें त्या नागाच्या फणांतील हजार रत्नमण्यांत त्या भगवंताचें प्रतिबिंब पसरलें. मग त्या सहस्र प्रतिबिंबांच्या दोन सहस्र डोळ्यांनीं तो लक्ष्मीचें सौंदर्य पाहूं लागला. आणि तेव्हां अनेक बाजूंनीं दिसणाऱ्या तिच्या अनेकांगी सौंदर्यदर्शनानें तो मदनमोहित झाला. तो भगवान कृष्ण तुमचें कल्याण करो.

**यद्गान्धर्वकलासु कौशलमनुध्यानञ्च यद्वैष्णवं**
**यच्छृङ्गारविवेकतत्त्वरचनाकाव्येषु लीलायितम् ।**
**तत्सर्वं जयदेवपण्डितकवेः कृष्णैकतानात्मनः**
**सानन्दाः परिशोधयन्तु सुधियः श्रीगीतगोविन्दतः ॥ ४ ॥**

यत् गान्धर्व-कलासु कौशलम् अनुध्यानम् च यत् वैष्णवम्
यत् शृङ्गार-विवेक-तत्त्व-रचना-काव्येषु लीलायितम् ।
तत् सर्वम् जयदेव-पण्डित-कवेः कृष्ण-एक-तान-आत्मनः
स-आनन्दाः परिशोधयन्तु सु-धियः श्री-गीत-गोविन्दतः ॥ ४ ॥

कृष्णचरणीं एकात्म झालेल्या जयदेवकवीनें हें काव्य रचिलेलें आहे. नृत्य गीत इत्यादि गंधर्वसुलभ ललितकलांतील कुशलता, कृष्णाविषयीं नितांत प्रीति आणि आदर, आणि काव्यामधें शृंगाररसाच्या गाभ्याचें वर्णन कौशल्यानें करण्याचें रचनासामर्थ्य हे सारे गुण जयदेवांत एकवटले आहेत. जे विदग्ध रसिक आहेत त्यांनीं या सर्व सौंदर्यांचा शोध या काव्यांत घ्यावा.

**साधूनां स्वत एव संमतिरिह स्यादेव भक्त्यार्थिनाम्**
**आलोच्य ग्रथनश्रमं च विदुषामस्मिन्भवेदादरः ॥**
**ये केचित्परकृत्युपश्रुतिपरास्तानर्थये मत्कृतिम्**
**भूयो वीक्ष्य वदन्त्ववद्यमिह चेत्सा वासना स्थास्यति । ५ ॥**

साधूनाम् स्वत एव संमतिः इह स्यात् एव भक्ति-अर्थिनाम्
आलोच्य ग्रथन-श्रमम् च विदुषाम् अस्मिन् भवेत् आदरः ।
ये केचित् पर-कृति-उपश्रुति-पराः तान् अर्थये मत्-कृतिम्
भूयः वीक्ष्य वदन्तु अ-वद्यम् इह चेत् सा वासना स्थास्यति ॥ ५ ॥

जे भक्तियुक्त सज्जन आहेत त्यांना हें काव्य आपोआपच संमत होईल. जे विद्वान् आहेत ते या ग्रंथाच्या रचनेंत ओतलेले परिश्रम पाहून त्याविषयीं आदर बाळगूं लागतील. दुसऱ्यांचें ऐकून एखाद्या गोष्टीविषयीं मत बनविण्याची ज्यांना संवय असते त्यांना माझी अशी प्रार्थना आहे कीं, त्यांनीं हा ग्रंथ स्वतः पुन्हां पुन्हां पाहावा आणि तो पाहूनहि त्याला क्षुद्र म्हणण्याची त्यांची इच्छा कायमच राहिली तर मग त्याला खुशाल क्षुद्र म्हणावें.

**श्रीभोजदेवप्रभवस्य रामादेवीसुतश्रीजयदेवकस्य ।**
**पराशरादिप्रियवर्गकण्ठे श्रीगीतगोविन्दकवित्वमस्तु ॥ ६ ॥**

श्री-भोजदेव-प्रभवस्य रामादेवी-सुत-श्री-जयदेवकस्य ।
पराशर-आदि-प्रिय-वर्ग-कण्ठे श्री-गीतगोविन्द-कवित्वम् अस्तु ॥६॥

श्रीभोजदेव आणि रामादेवी यांचा लाडका पुत्र जयदेव यानें हें गीतगोविंद काव्य रचिलें आहे. जयदेवाचे जे पराशरादि रसिकस्नेही आहेत त्यांच्या कंठांत हें काव्य सदैव निवास करो.

**साध्वी माध्वीकचिन्ता न भवति भवतः शर्करे कर्कशासि**
**द्राक्षे द्रक्ष्यन्ति के त्वाममृतमृतमसि क्षीर नीरं रसस्ते ।**
**माकन्द क्रन्द कान्ताधर धर न तुलां गच्छ यच्छन्ति भावं**
**यावच्छृंगारसारं शुभमिव जयदेवस्य वैदग्ध्यवाचः ॥ ७ ॥**

साध्वी माध्वीक-चिन्ता न भवति भवतः शर्करे कर्कशा असि
द्राक्षे द्रक्ष्यन्ति के त्वाम् अमृत मृतम् असि क्षीर नीरं रसः ते ।
माकन्द क्रन्द कान्ता-अधर धर न तुलाम् गच्छ यच्छन्ति भावम्
यावत् शृंगार-सारम् शुभम् इव जयदेवस्य वैदग्ध्य-वाचः ॥ ७ ॥

जयदेवकवीचें हें विदग्ध असें गीतगोविंद काव्य शृंगाररसाच्या माधुरीनें भरलेलें, म्हणून अतिशय रसाळ असें आहे. श्रीहरींच्या गुणकीर्तनानें भरलेलें म्हणून हें अतिशय कल्याणकर आहे. हें जोंवर अस्तित्वांत आहे तोंवर हे मधा, मी गोड आहें, मला कोणीतरी खाऊन टाकील अशी काळजी करण्याचें तुला कारण नाहीं. साखरे, तुझ्या नांवांतच जिथें कर्कश स्वर आहे तोंवर तुझ्या गोडीची माझ्या काव्याच्या गोडीशीं तुलना कोठून? अरे द्राक्षा, गीतगोविंद असतांना आसवासाठी तुला कोणीहि पिळणार नाहीं. उगाच भिऊं नकोस. अमृता, गीतगोविंदापुढें तुला कोणी विचारणार नाहीं म्हणून तुं मेल्यांत जमा आहेस. क्षीरसागरा, तुझ्यांत तरी गीतगोविंदाइतका रस कुठें आहे? शेवटीं तुझ्यांतील रस म्हणजे नुसतें पाणीच आहे. हे आम्रफला तूं खुशाल रड. गीतगोविंद आहे तोंवर कुणीहि तुझा रस घेणार नाहीं. तरुणींच्या ओठांवरील अमृता, गीतगोविंदाच्या गोडीशी तुझीसुद्धां तुलना होऊं शकणार नाही. कृष्णभक्तांचें राज्य सोडून तूं आतां मन मानेल तिकडे जा.

**इत्थं केलितर्तीर्विहृत्य यमुनाकूले समं राधया**
**तद्रोमावलिमौक्तिकावलियुगे वेणीभ्रमं बिभ्रति ।**

**तत्राल्हादिकुचप्रयागफलयोर्लिप्सावतोर्हस्तयोः**
**व्यापाराः पुरुषोत्तमस्य ददतु स्फीतां मुदां संपदम् ।। ८ ।।**

इत्थम् केलि-ततीः विहृत्य यमुना-कूले समम् राधया
तत् रोम-आवलि-मौक्तिक-आवलि-युगे वेणी-भ्रमम् बिभ्रति ।
तत्र आल्हादि-कुच-प्रयाग-फलयोः लिप्सावतः हस्तयोः
व्यापाराः पुरुष-उत्तमस्य ददतु स्फीताम् मुदाम् संपदम् ।। ८ ।।

अशा प्रकारें कृष्णानें यमुनेच्या तीरावर नानाप्रकारचे विलास केले. राधेच्या नाभींतून वर सरकलेली निळ्या लवेची रेषा हीच जणू यमुना आणि तिच्या गळ्यांतून खालीं उतरलेली मोत्यांची शुभ्र माला हीच जणू गंगा. त्यामुळें त्यांचा संगम झाला त्या स्तनांतळींच्या खळीला प्रयागतीर्थाचें स्वरूप प्राप्त झालें. प्रयागाची तीर्थयात्रा केली कीं हटकून पुण्यफळ ठेवलेलेंच. त्याचप्रमाणें या शृंगाराच्या प्रयागतीर्थांचीं फळेंच असे स्तन या तीर्थक्षेत्रांत उगवले. हीं आनंददायी पुण्यफलें हातांत यावीं म्हणूनच कृष्णाच्या हातांची हालचाल घडते. त्या पुरुषोत्तम कृष्णाच्या हातांची ही हालचाल विपुल आनंदसंपदा उत्पन्न करो.

*चोविसावा प्रबंध समाप्त*

*बारावा सर्ग समाप्त*

ग्रंथ संग्रहालय ठाणे
१६९७२

गीतगोविंद संपूर्ण

REFBK 0016972
REFBK-0016972

ठाणे ग्रंथ संग्रहालय, ठाणे. ग्रंथालय
अनुक्रम ...६५३६७... वि: ...काव्य...
ग्रंथ ...२०१०... नोंद दि ...२८।३।८७